28 MARCH TO 03 APRIL 2022 - Page 1 (CRIME SANDHYA):Layout 1 26/03/2022 10:50 PM Page 1

CMYK

|| जय माता जी ||



|| माता बारोंडादेवी प्रसन्न ||

गुन्हेगारीचा कर्दनकाळ

# क्राईम संध्या

Tread Mark

संपादक : लक्ष्मणराव पाटोळे

वर्ष : १० | अंक : १४ | सोमवार दि. २८ मार्च २०२२ ते रविवार दि. ०३ एप्रिल २०२२ | पाने : ८ | किंमत : ५/- रुपये

www.crimesandhya.com | महाराष्ट्रातील १४ जिल्ह्यांत वितरीत होणारे साप्ताहीक | crimesandhyavasai@gmail.com

ठाणे ■ पालघर ■ मुंबई ■ जळगाव ■ नाशिक ■ धुळे ■ बिड ■ परभणी ■ पुणे ■ औरंगाबाद ■ लातूर ■ उस्मानाबाद ■ सोलापूर ■ नांदेड

## दोन बायका असून तिसरीच्या आहारी गेला दुसरीने सुपारी देऊन पतीचाच गेम केला

बेळगाव/क्राईम रिपोर्टर



कोणताही माणूस किती जरी झोल झपाटे करून लोकांना फसवत असला तरी कधीना कधी त्याच्या पापाचा घडा भरतो आणि त्याच्या जवळच्याच माणसाच्या हातूनच त्याचा शेवट होतो. बांधकाम व्यवसायात भागीदारांकडून मोठी रक्कम उकळून त्यांना फसवणाऱ्या एका बांधकाम व्यावसायिकाचा त्याच्याच दुसऱ्या पत्नीने दहा लाखांची सुपारी देऊन गेम केला आणि तीन बायकांचा ...पान २ वर

## मायेचा लळा लावणारा शेजारी वासनेने पेटला अपंग चिमुकल्यावर अत्याचार करून जीव घेतला



पुणे/परमेश्वर गडदे

समलिंगी आकर्षण हि एक लैंगिक विकृती विकृती आहे. त्यामुळेच अशा लोकांना समाजात फारसे स्थान नाही. असे असतानाही सध्या भारतात समलिंगी स्त्री पुरुषांची संख्या वाढतेय. त्यातच सर्वोच्च न्यायलयाने कलम ३७७ रद्द केल्याने गे आणि लेस्बियन विकृतांना रान मोकळे झाले आहे. मात्र अशा समलिंगी आकर्षणातून गुन्हेगारी घटना वाढीस लागल्या आहेत आणि त्यातूनच लहान मुलांचे लैंगिक शोषण केले जात आहे. कारण माणसांच्या लैंगिक भावना चाळवणाऱ्या अनेक वेबसाईट इंटरनेटवर उपलब्ध आहेत. ज्यात वेगवेगळ्या प्रकारच्या पोनोग्रफिकाल क्लीप आहेत आणि हे सगळ बघूनच माणूस वासनांध बनतोय आणि एकदा का त्याच्या भावना चाळवल्या कि मग त्याला कशाचेच भान राहत नाही. तो राक्षस बनतो आणि सावज हेरत असतो. आजकाल बालात्काराच्या ज्या घटना घडत आहेत त्याला याच गोष्टी कारणीभूत आहेत आणि त्यातून महिलांची जशी सुरक्षा धोक्यात आलेली आहे. तशीच लहान मुलांच्या सुरक्षेचाही गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे.




पुण्याच्या कोथरूडमध्ये अशाच एका विकृत वासनांध इसमाची शेजारच्या १२ वर्षाच्या मुलावर वाईट नजर होती. मात्र तो त्या मुलाशी आपल्याच मुलाप्रमाणे प्रेमाने वागत असल्याने, त्याचे लाड करीत असल्याने, त्याला बाहेर फिरायला नेत असल्याने कुणालाही संशय येत नव्हता. पण त्याच्या साळसूद चेहऱ्याच्या आड एका भयंकर विकृत नराधमाचा चेहरा लपला होता आणि त्या चेहऱ्याची त्या मुलाला किंवा त्यच्या पालकांना जराही कल्पना नव्हती. त्यामुळेच घात झाला आणि एके दिवशी त्याची वासना उफाळून येताच त्या नराधमाने त्या मुलावर लैंगिक अत्याचार करून त्याची हत्या केली आणि आपले पाप लपवण्यासाठी त्या मुलाचा मृतदेह पोत्यात भरून एका महाविद्यालयाच्या मैदानात नेऊन टाकला. विशेष म्हणजे ज्या लहान मुलावर लैंगिक अत्याचार करून त्याची हत्या करण्यात आली. तो अपंग होता. या प्रकरणी पोलिसांनी आरोपीला अटक केली असून त्याला पुणेकरांनी फासावर लात्कण्याची मागणी केली आहे.

दिनांक २४/०३/२०२२ रोजी नेहमीप्रमाणे काही मुलं कोथरुडमधल्या एकलव्य पॉलिटेक्निक कॉलेज मैदानावर क्रिकेट खेळेत होते. संध्याकाळेच सात वाजत होते. अगदी कॉलेजच्या बाजूलाच असलेल्या या मैदानावर परिसरात राहणारे अनेक तरुण खेळण्यासाठी येतात. यादिवशीही मुलांनी हे मैदान गजबजून गेलं होतं. परंतु अंधार पडत असल्यान काही मुलांचा पाय घराकडे वळला होता.

अशातच बाजूलाच असलेल्या एका पोत्याच्या गोणीकडे काही मुलांचं लक्ष गेलं. या गोणीत काही तरी भरलं असल्याचं मुलांच्या लक्षात आलं. जड वस्तू असल्यानं त्यांना उचलता आली नाही परंतु त्या पोत्याचं तोंड उघडलं असता त्या पोत्यातील चित्र पाहून अनेक गजन घाबरुन गेले. काही मुलं तर पळून गेली आणि काही मुलांची बोबडी वळू लागली. अशातच बाजूलाच असणाऱ्या एका तरुणानं पोलिसांना फोन लावला आणि मैदानात पडलेल्या गोणीत एका मुलाचा मृतदेह असल्याचं पोलिसांना सांगितलं. या घटनेचं गांभीर्य लक्षात ...पान २ वर

## विवाहितेला प्रियकरासोबत रंगेहात धरले सासरच्यांनी त्याला घरातच ठार मारले





मयत शिवाजी

जळगाव/क्राईम रिपोर्टर

पहिले प्रेम माणसाला सहजासहजी विसरता येत नाही. करीना हिचे सुद्धा तसेच झाले होते. महाविद्यालयीन शिक्षण घेताना तिचे शिवाजी सोबत प्रेम जुळले. पण नंतर तिचे मुक्ताळ येथील तरुणाशी लग्न झाले. योगायोगाने तिचा पहिला प्रियकर शिवाजी हा मुक्ताळ गावचाच रहिवाशी असल्याने करीना सासुवाशीन म्हणून या गावात लग्नानंतर येताच शिवाजी बरोबर तिचे संबंध सुरु झाले. मात्र एकरात्री दोघांना तिचा पती आणि सासरच्यांनी रंगे हात पकडले आणि मागचा पुढचा जराही विचार न करता शिवाजीला ठार मारून त्याच्या मृतदेहाची परस्पर विल्हेवाट लावली. मात्र पोलिसांनी या प्रकरणातील सर्व आरोपींना अटक केली आहे. यात करीनाच्या आई वडिलांचाही समावेश आहे.

करिना (काल्पनिक नाव) दिसायला देखणी होती. करिना आणि शिवाजी यांची महाविद्यालयीन जीवनापासून मैत्री होती. शिवाजी गोकुळ पारधी हा बोदवड तालुक्यातील मुक्तळ या गावचा रहिवासी होता. करिना ही भुसावळ तालुक्यातील शिंदी येथील रहिवासी होती. महाविद्यालयीन जीवनापासून सुरु असलेली दोघांची मैत्री नंतर देखील कायम राहीली. महाविद्यालयीन शिक्षण पुर्ण झाल्यानंतर करिनाचे लग्न ठरले. शिवाजी रहात असलेल्या गावातील तरुणासोबत तिचे लग्न ठरले. त्यामुळे दोघांच्या भेटी पुन्हा सुरु झाल्या होत्या. महाविद्यालयीन मित्र असलेल्या शिवाजीच्या गावातच तिचे सासर असल्यामुळे तिच्या आनंदाला पारावार राहिला नव्हता. वयाच्या विशीतच करिनाचे लग्न मुक्तळ येथील तरुणासोबत झाले होते. लग्नाच्या वेळी करिना साधारण विशीत होती. विशीतील तिचे तारुण्य वाखाणण्याजोगे होते. मात्र तिच्या पतीचे वय तिच्यापेक्षा सुमारे दहा वर्षांनी जास्त होते. तिच्यावर प्रेम करणारा तिचा महाविद्यालयीन मित्र शिवाजी हा तिच्यापेक्षा सुमारे आठ वर्षांनी मोठा होता. करिना आता विवाहीत झाली होती. विवाहानंतर ती मुक्तळ येथे राहण्यास आल्यामुळे तिची शिवाजीसोबत दररोज नजरानजर होण्यास वेळ लागत नव्हता. दोघे लपून छपून फिरायला देखील जावू लागले. ...पान २ वर

## चारित्र्याच्या संशयाने पतीचे डोके फिरले रागाच्या भरात त्याने पत्नीला ठार मारले

पुणे/क्राईम रिपोर्टर

आजकाल पत्नी सुंदर आणि मन मोकळ्या स्वभावाची असली कि पतीच्या मनात विनाकारण संशय निर्माण होतो आणि याच संशयातून माणसाचे संसार उध्वस्त होतात. कारण एकदा का संशयाचे भूत माणसाच्या मानेवर बसले कि मग त्याचे मानसिक स्वस्थ बिघडून जाते आणि मग त्याचे कशातच लक्ष लागत नाही. आपली बायको दुसऱ्या सोबत आहे. या एकाच विचाराने तो सैरभैर झालेला असतो आणि त्यातून घरात भांडणे सुरु होतात. पुण्याच्या मंतरवाडीत राहणाऱ्या राहुल फडतरे याच्या बाबतीतही असेच झाले होते. पत्नीच्या चारित्र्यावर सतत संशय घेणाऱ्या राहुलने एके दिवशी पत्नीला ठार मारले आणि मृतदेह निर्जन स्थळी फेकून पत्नी बेपत्ता झाल्याची पोलीस ठाण्यात फिर्याद नोंदवली. पण पोलिसांनी त्याचा हा बनाव हाणून पाडला आणि त्याला अटक केली.

पुण्यातील हवेली येथील मंतरवाडी परिसरात राहुल फडतरे हा आपली पत्नी विद्या हिच्याशी राहत होता.त्याच्या लग्नाला सात आठ वर्ष झालेली होती. राहुल हा आपल्या उदरनिर्वाहासाठी एका कंपनीत कामाला जात होता. विद्या ही दिसायला देखणी आणि सुंदर होती. तिचा हसत मुख स्वभाव असल्याने ती बोलताना कोणाशी ही हसत खेळत बोलत होती. नेमकी हिच गोष्ट राहुल याला खटकत होती. अलिकडे तो तिच्या चारित्र्यावर संशय घेऊन तिच्याशी भांडण काढून तिला मारहाण करीत होता. तुझे कुठल्यातरी बाहेर ...पान ६ वर

## उसन्या पैशावरून मोठा वाद झाला मामेभावाने आतेभावाचाच खून केला

जळगाव (जामनेर)/क्राईम रिपोर्टर



मयत शुभम

जामनेर मैत्री आणि नात्यागोत्यात सहसा आर्थिक व्यवहार करू नयेत आणि केले तरी ते वेळच्यावेळी मिटवून टाकावेत. अन्यथा त्यातून मोठे वाद होऊ शकतात आणि अशा वादात मग नात्यागोत्याचा कुणी विचार करीत नाही आणि त्यात एखाद्याचा जीव जाऊ शकतो. बोदवडमध्ये राहणाऱ्या शुभम माळी याच्या बाबतीत असेच झाले. त्याने मामेभावाकडून ४५ हजार उसने घेतले होते. मात्र ते वेळेवर परत केले नाहीत. त्यामुळे दोघांमध्ये मोठा वाद झाला आणि याच वादातून पवन याने शुभमचा खून केला. या प्रकरणी पोलिसांनी आरोपी पवनला अटक केली आहे.





आरोपी पवन

विधवा प्रमिलाबाई नंदु माळी मोलमजुरी करुन आपला चरितार्थ चालवत होती. बोदवड या गावी राहणाऱ्या प्रमिलाबाईला शुभम हा एकुलता एक कमावता मुलगा होता. मुलगा शुभम हा तिचा वृद्धापकाळातील एकमेव सहारा होता. पहुर येथील रेणूकाई ट्रान्सपोर्ट एजन्सीमधे आयशर वाहनावर चालक म्हणून तो कामाला होता. पर जिल्ह्यात, पर राज्यात जिथे वाहतुकीची ट्रीप लागेल त्या गावी तो आयशर वाहन घेऊन जात असे. पहुर येथे ट्रान्सपोर्ट ...पान ६ वर



## सरला नव्हती सावित्री म्हणूनच पाप झाले प्रियकराच्या मदतीने सत्यवानला ठार केले



सांगली/क्राईम रिपोर्टर

अनैतिक संबंधाला चटावलेल्या बाईला पती, मुले किंवा संसाराची अजिबात किमत नसते. तिला फक्त ते सुख हवे असते आणि त्यासाठी तिची कोणत्याही थराला जायची तयारी असते, सरलाने सुद्धा तेच केले. विवाहित असूनही तिचे माहेरच्या तरुणाशी अनैतिक संबंध होते. मात्र पतीला याची माहिती समजताच तो विरोध करू लागला. त्यामुळे अखेर तिने प्रियकराच्या मदतीने पतीचाच गेम केला. मात्र पोलिसांनी सर्व आरोपींना अटक केली आहे.

मंगळवेढा तालुक्यातील शिवनगी येथील सत्यवान मच्छिंद्र कांबळे याचा विवाह गेल्या पाच सहा वर्षांपूर्वी समाजाच्या रितीरिवाजानुसार झाला होता. या दामंप्त्याला दोन मुले ही झाली त्याचा संसार हा सुखा समाधानाने सुरू असताना सरला ही गेल्या दोन वर्षांपासून सारखी आपल्या माहेरी म्हणजे सांगली जवळील कुपवाड येथे जात होती. ती माहेरी जात असल्याने याची शंका सत्यवानाला येत होती. त्यावेळी त्याला समजले की आपल्या पत्नीचे ...पान ६ वर

## रंगपंचमीचा रंग रक्ताने लाल झाला गुंडांच्या हातून निरपराध वाटसरू मेला

उल्हासनगर/किरण तेलगोटे



मयत कुंदनमल

होळी आणि रंगपंचमीच्या दिवशी दारू पिवून राडेबाजी करण्याचे प्रकार अनेक ठिकाणी होत असतात. उल्हासनगरमध्ये धुळवडीच्या दिवशी अशाच एका घटनेत दारूच्या नशेत दोघांनी रस्त्यावरून जाणाऱ्या एका इसमाला शुल्लक बाचाबाची वरून ठार मारले. सुरवातीला मुरुत इसमाच्या भावाच्या फिर्यादीवरून पोलिसांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली होती. पण नंतर शवविच्छेदन अहवालात मृत इसमाच्या डोक्यात गंभीर स्वरुपाची दुखापत झाल्याचे निष्पन्न झाल्याने पोलिसांनी हत्येच्या गुन्ह्याची नोंद केली. या प्रकरणी एका आरोपीला अटक करण्यात आली असून दुसरा फरारी आहे.



उल्हासनगरात धुळवडीच्या दिवशी हत्या झाल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. याप्रकरणी पोलिसांनी सुरुवातीला अकस्मात मृत्युची नोंद केली होती. मात्र तापसानंतर हत्येचा गुन्हा दाखल करून आरोपीला अटक केली. धुळवडीच्या दिवशी रस्त्यातून घरी जाणाऱ्या एका वाटसरूची दोघांनी भरदुपारी ही हत्या केली. त्यानंतर पोलिसांनी सूत्र हलवत मुख्य आरोपीला अटक केली आहे. कुंदनमल सुनगत हा ४१ वर्षीय व्यक्ती धुळवडीच्या दिवशी दुपारच्या सुमारास धोबीघाट परिसरातून घरी निघाला होता. ...पान २ वर

## दारूच्या नशेत दोघेही बेभान झाले एका मजुराने दुसऱ्याला ठार केले

गोवा/क्राईम रिपोर्टर

दारूची नशा एकदा का माणसाच्या डोक्यात गेली कि मग त्याचा स्वतःवर ताबा राहत नाही. त्याच्या हातून काहीही घडू शकते. गोव्यातील एका केळी व्यापाऱ्याकडे काम करणाऱ्या आणि केरळ मधील एकाच गावात राहणाऱ्या दोन मजुरांमध्ये नेहमी दारू प्यायल्यावर नेहमीच भांडणे व्हायची. मालकाने त्यांना तंबी देऊनही ते एकात नव्हते आणि एकेदिवशी दोघेही दारूच्या नशेत असताना अशीच दोघांमध्ये भांडणे झाली आणि त्यात एकाने दुसऱ्यावर कोयत्याने वार करून त्याची हत्या केली. या प्रकरणी पोलिसांनी आरोपीला अटक केली आहे.

घोटगे गावातील पी.मनोज याची केळीची बाग तिलारी धरणाच्या डाव्या कालव्याजवळ आहे. पी.मनोज हे मुळचे केरळचे. ते ही काही वर्षापूर्वी गोव्यात येवून स्थायीक झाले होते. ते केळीचे उत्पादन घेवून त्याची निर्यात करीत होते.त्यामुळे त्याचेकडे अनेक मजूर कामाला होते. अलिकडेच त्यांनी केरळ येथील रेविंद्र केलन आणि आर.मनीकंदन यांना आपल्या केळीच्या बागेत कामाला ठेवून घेतले होते. ते दोघे ही एकाच गावचे असल्याने त्या केळीच्या बागेत ते दोघे ही एक झोपडी बांधून राहत होते.सुरूवातीला त्या दोघांचे मैत्रीपूर्ण संबंध होते. परंतू नंतर त्या दोघात भांडी धुण्यावरून जेवण करण्यावरून दररोज भांडणे होऊ लागली होती. तसे दोघे ही ...पान २ वर

## एकत्र राहणारा सोबती काळ ठरला दारूच्या नशेत त्याने गळा चिरला





वाडा/सोनू जाधव

पोलिसांनी मनावर घेतले तर कुठल्याही गुन्ह्यातील गुन्हेगार किती जरी शातीर दिमाग असला तरी पोलीस त्याच्यापेक्षा दोन पावले पुढे असतात. त्यामुळे तो गुन्हेगार पोलिसांच्या पासून जास्त दिवस लपून राहू शकत नाही आणि आता तर तांत्रिक तपासात पोलिसांनी इतकी प्रगती केली आहे कि खुनासारख्या गंभीर गुन्ह्यातील आरोपीही काही तासात पोलिसांच्या हाती लागतो. वाडा येथील अशाच एका खुनाच्या घटनेचा अवघ्या १२ तासात पोलिसांनी तपास करून बिहारला पळून जाण्याच्या प्रयत्नात असलेल्या आरोपीच्या मुसक्या आवळल्या. त्यामुळे वाडा पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक दशरथ पाटील आणि त्यांच्या सहकाऱ्यांचे वाड्यातील नागरिक कौतुक करीत आहेत.



महाराष्ट्रातील काही कंपन्यांनी त्यांच्याकडे काम करणाऱ्या मजुरांसाठी कंपनीच्या जवळच घरे उपलब्ध करून दिलेली आहेत आणि ...पान २ वर

CMYK

28 MARCH TO 03 APRIL 2022 - Page 2 (CRIME SANDHYA):Layout 1 26/03/2022 10:51 PM Page 1



पान १ वरून....

## दोन बायका असून तिसरीच्या आहारी ...

हा अय्याश व्यावसायिक इतरांना फसवता फसवता आपल्याच बायकोच्या हातून मारला गेला. सुरूवातीला राजू दोडबम्मणावर याची हत्या ही आर्थिक व्यवहारातून झाल्याचा पोलीसांचा संशय होता. त्या दृष्टीने पोलीस तपास करीत असताना राजू याने रियल इस्टेट व्यवसायातून अनेकांची फसवणूक केल्याची माहिती पोलीसाना मिळाली होती. कारण राजू याने आपले जवळचे मित्र शशिकुमार आणि धमेंद्र यांना मागील काही वर्षापूवी गळ घालून आपल्या बांधकाम व्यवसायात भागीदारी करण्यास सांगितले होते. ते ही दोघे नाही होय म्हणत त्याचेबरोबर भागीदारीत व्यवसाय करण्यास तयार झाले त्यावेळी राजू, धमेंद्र आणि शशिकुमार यांनी मिळून ग्लोबल डेव्हलपर्स नावाने कंपनी सुरू करून त्या मार्फत व्यवसाय सुरू केला. हा व्यवसाय सुरू करीत असताना राजू दोडबम्मणावर याने या व्यवसायासाठी दोघांच्या कडून १ कोटी रूपये गुंतवण्यास सांगितले होते. त्यावेळी त्या दोघांनी एका बँकेकडून प्रत्येकी ५०-५० लाखाचे कर्ज घेऊन त्याचेबरोबर भागीदारी केलेली होती. राजू हा सदनिका बांधून विकत असल्याने त्याला त्या व्यवसायातील चांगली माहिती होती. ग्लोबल डेव्हलपर्स तर्फे त्यांनी आपले वेगवेगळे प्रोजेक्ट राबविले होते. त्यातील एक दोन प्रोजक्ट त्यांनी पुर्ण केले परंतू गेल्या दहा वर्षात राजू याने काही प्रोजेक्टचे बांधकाम प्रकल्पच पुर्ण केले नाहीत. आज करतो उदया करतो असे करीत याने व्यवसायातील भागीदरा शाशिकुमार आणि धमेंद्र यानां चांगलेच झुलवत ठेवले होते. त्यामुळे त्या दोघांचे फार मोठे आर्थिक नुकसान होऊ लागले होते. त्या दोघांनी ही याबाबत राजू याला विचारले असता तो त्याना काही ही कारणे सांगत होता. तो सांगत असलेली कारणे त्या दोघांना पटत नव्हती. तो आपल्याला फसवत आहे हे त्याच्या लक्षात आल्यावर त्यांनी त्याला दम देत आपले गुंतविलेली रक्कम परत मागण्यास सुरूवात केली. कारण त्या दोघांनी वेगवेगळ्या बँकेतून ५०-५० लाखांचे कर्ज घेतलेले होते. त्याची परत फेड त्यांनी वेळेत केल्याने त्या बँकांनी त्याना नोटीसा पाठविलेले होते. त्या कर्जवसुलीसाठी बॅकांनी त्याची स्थावर प्रॉप्रटी सील करण्यास सुरूवात केली होती. त्यामुळे ते दोघे ही राजू याचेकडे एक तर प्रोजेक्ट सुरू कर नाहीतर आमचे गुंतवलेली रक्कम परत दे असे सांगत होता.पण या सगळ्या भानगडीत राजू हा देखील आर्थिक कारणातून आणि कौटुंबिक कारणातून अडचणीत आला होता. त्यामुळे त्याला ती रक्कम परत दयायला शक्य होत नव्हते. त्यातून त्यांची भांडणे वाद विवाद होत होता. ते दोघे ही त्याचेवर चिडून होते. अशातच राजू दोडबम्मणावर याची तीन लग्ने झालेली होती. त्याचे पहिले लग्न २२ वर्षापूर्वी झाले होते. त्या पहिल्या पत्नीपासून त्याला दोन मुले झाली होती. ती मुले आज उच्च शिक्षण घेत आहेत. राजू यांचे पहिल्या पत्नीशी पटले नसल्याने त्यांनी तिला सोडून दिले होते. त्यानंतर त्यांनी गुपचुपपणे लातूर येथील किरणशी दुसरे लग्न केले होते. या लग्नानंतर त्या दोघांचे ही फार काळ पटत नव्हते. त्या दोघांत सतत सारखी खटके उडत होते. त्यातच किरण हिला आपला नवरा राजू दोडबम्मणावर याचे पहिले लग्न झाल्याचे समजल्याने ती त्याच्या बरोबर या ही कारणातून भांडत होती. या भांडणातून ती बेळगावातच दुसरीकडे राहत होती. पहिली केली दुसरी गेली म्हणून त्याने आता तिसरे लग्न दीपा नावाच्या तरूणीबरोबर केले होते. ही गोष्ट ज्यावेळी किरणला समजली त्यावेळी ती चांगलीच भडकली होती. त्याने आपल्याला फसविले आहे. उलट तो आता तिसरे लग्न करून निवांत राहत आहे म्हणून ती त्याचेवर चिडली होती. तिने त्याच्यावर कोर्टात घटस्फोटासाठी केस घातलेली होती. घटस्फोट मिळविण्यासाठी ती त्याचेकडून मोठी रक्कम आणि प्रॉप्रटीतील हिस्सा मागत होती. तिने त्याचेवर केस घातल्याने राजूने ही तिच्यावर चारित्र्याचा आरोप करीत तिचे आपल्यां व्यवसायातील भागीदरा शशिकुमार याच्याबरोबर बाहेरख्याली संबंध आहेत असे आरोप लावलेले होते. त्या आरोपामुळे ती त्याचे घरी येवून त्याच्या तिसऱ्या पत्नीबरोबर म्हणजे आपल्या सवतीबरोबर भांडत होती. यातूनच त्याचे कौटूंबिक घडी विस्कटत चालली होती. यातून काहीच मार्ग निघत नव्हता. तर दुसरीकडे त्याचे व्यवसायातील भागीदार त्याला पैशासाठी तगादा लावित होते. तो दोन्हीकडून ही अडचणीत आलेला होता. शिवाय त्याने सदनिका बाधून देतो म्हणून अनेकांची फसवणुक देखील केली होती. शिवाय बांधकाम कंत्राटदार म्हणून काम करीत असताना अनेकांची कामे अर्धवट ठेवलेली होती. एका पोलीस अधिकाऱ्याची ही त्याने फसवणुक केलेली होती. त्या पोलीस अधिकाऱ्याच्या जमीनीवर त्याने फक्त पायाच खोदलेला होता. बांधकाम केले नव्हते. मध्यंतरीच्या काळात त्या पोलीस अधिकाऱ्यांकडून काही मोठी रक्कम बांधकाम करून देतो असे सांगून घेऊन तो गायबच झाला होता. त्या पोलीस अधिकाऱ्याने त्याचे विरोधात संबधित पोलीस स्टेशनला तक्रार दाखल केली होती. त्या प्रकरणात त्याला कोर्टाकडून जामीन दिला होता. त्यातच मंध्यंतरी अथणी पांटबंधारे खात्यात घोटाळा उघडकीस आला होता. त्यात राजू दोडबम्मणावर याने बनावट कागदपत्राच्या अधारे त्या अधिकाऱ्याकडून त्याने बनावट बिले काढून मोठी रक्कम हडप केली होती. सगळा काही फसवणुकीचा मामला होता. इतरांच्या नावे त्यातून करोडो रूपये हडपले होते. हे सगळे त्याची दुसरी पत्नी किरण हिला चांगले माहित होते. आपली फसवणुक करून तो लोकांची ही फसवणुक करीत आहे हे तिच्या लक्षात आल्यावर तिने त्याचा कायमचा काटा काढयाचा असे ठरविले. तिने या संर्दभात नवरा राजू दोडबम्मणावर याचा व्यवसायातील भागीदर शशिकांत याच्याशी संधान साधले. तिने त्याला राजूने तुमची व माझी कशी फसवणुक केली आहे हे पटवून दिले. त्याचा कायमचा बंदोबस्त करण्यासाठी आपल्याकडून १० लाखांची सुपारी दया असे सांगितले. त्या दोघांच्यावर राजू याने बाहेरख्याली संबंधाचा आरोप या आधीच केला असल्याने त्यातच किरणने त्याला मारण्याची सुपारी दया म्हटल्यावर शशिकांत आणि धमेंद्र यांनी त्याचा कायमचा बंदोबस्त करण्यासाठी आपल्या काही मित्रांची मदत घेण्याचे ठरविले. किरण हिला नवरा राजू दोडबम्मणावर हा कधी कोठे जातो हे चांगलेच माहित होते. त्यातच आपली सवत राजू याची तिसरी पत्नी दीपा ही दवाखान्यात उपचारासाठी ॲडमिट आहे हे तिला ही माहित होते. राजू हा तिला सकाळ संध्याकाळ भेटायला जातो हे ही तिला माहित होते. त्यावेळीच त्याचा काटा काढा असे तिने शशिकुमार आणि धमेंद्र यांना सांगितले. मंगळवार दि.१५ मार्च रोजी राजु दोडबम्मणवार हा टिळकवाडी येथून आपल्या राहत्या घरातून सकाळी ६.१५ च्या दरम्यान दवाखान्यात कारने जात होते. त्यावेळी मंडोली जवळील भवानीनगर येथे त्याची कार आली असता त्याच्या कारच्या आडवे दोन बाईकस्वारांनी आडवी आपली बाईक घातली. त्यामुळे राजू याने कार थांबवून काच खाली केली असता समोरच्या पाच सहा जणांनी त्याच्या डोळ्यात मिरची पुड टाकली. त्यासरशी ते डोळे चोळत असताना त्या पाच सहा जणांनी त्यांना कारमधून खाली खेचून मारहाण केली. ते खाली पडले असता त्यातील मारेकऱ्यांनी त्याच्या पाठीवर, अंगावर आपल्याकडील धारदार शस्त्राने वार केले. त्यात ते गंभीर रित्या जखमी झाले. त्याच्या शरीरातून रक्ताताच्या धारा वाहू लागल्या. ते खालीनिपची पडल्यावर परत त्यांनी त्याचेवर वार केले. त्यातच ते जागी निपचिप पडले. त्याची हत्या झाल्याचे लक्षात आल्यावर मारेकऱ्यांनी आपल्या बाईकवरून तेथून पळ काढला. रक्ताच्या थारोळ्यात एक इसम पडलेला बघून मॉर्निंग वॉकला जाणाऱ्यांनी या घटनेची माहिती वडगाव पोलीस ठाण्याला दिली. ही माहिती मिळताच पोलीस स्टेशनचे पोलीस ही तातडीने घटनास्थळी दाखल झाले. घटनास्थळी रस्त्यावर कडेला राजू दोडबम्मणावर हा रक्तातच्या थारोळ्यात पडला होता. बाजूला त्याची कार उभी होती. तर त्याचे शेजारी रक्ताने माखलेले धारदार शस्त्र पडले होते. पोलीसांनी घटनेचा पंचनामा करून मृतदेह शवविच्छेदनासाठी सरकारी रुग्णालयात पाठवून दिला. पोलीस या घटनेचा तपास करीत असताना घटनास्थाळच्या शेजारच्या परिसरातील सीसीटीव्ही फुटेजची पाहणी केली.त्यात दोन बाईकवरून सहा जण घटनास्थळावरून पलून जात असल्याचे दिसत होते. या घटनेची चौकशी मयत राजू याची तिसरी पत्नी दीपा हिच्याकडे चौकशी केली असता तिने पोलीसांना सांगितले की, मयत राजू यांची दुसरी पत्नी किरण हिच्यावर संशय व्यक्त केला.त्यावेळी पोलीसांनी किरण हिच्याकडे चौकशी केली असता ती पोलीसांना उडावाउडवीचे उत्तरे देत होती.तिच्या बोलण्यात पोलीसांना विसंगती आढळून येत असल्याने महिला पोलीसाकरवी तिला बोलते केले असता तिने आपला गुन्हा कबुल करून नवरा राजू दोडबम्मणावर याची हत्या त्याच्या व्यवसायातील भागीदार शशिकुमार व धमेंद्र यांना १० लाखांची सुपारी देवून केल्याचे सांगितले. तिने दिलेल्या माहितीवरून पोलीसांनी या घटनेतील शशिकांत व धमेंद्र यांना ताब्यात घेतले असता त्यांनी ही आपला गुन्हा कबुल करून तो का आणि कशासाठी केला याची माहिती पोलीसांना दिली. या घटनेत आणखी चौघांचा सहभाग असल्याचे निदर्शनास आले होते.पोलीस त्याचा ही कसून शोध घेत होते.पोलीसांनी ताब्यात घेतलेल्या तिघा जणांच्या विरूध्द व शोध घेत असलेल्या आरोपीच्या विरूध्द पोलीसांनी राजू दोडबम्मणावर याच्या हत्येप्रकरणी त्याची पत्नी किरण, शशिकुमार शंकरगौडा व धमेंद्र नामु घंटी यांचे विरोधात आयपीसी कलम ३०२ प्रमाणे गुन्हा नोंद करून त्याना कोर्टासमोर उभे केले असता मा.कोर्टाने त्यांना तीन दिवसाची पोलीस कोठडी सुनवाली. पोलीसांनी पोलीस कोठडी दरम्यान त्याचेकडून गुन्हयात वापरलेले धारदार हत्यार जप्त केले.या घटनेचा पुढील तपास वडगाव पोलीस करीत आहेत.

## मायेचा लळा लावणारा शेजारी वासनेने ...

घेऊन कोथरूड पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरक्षीक महेंद्र जगताप यांनी आपल्या ताफ्यासह तात्काळ घटनास्थळ गाठलं. या गोणीत एका १२ वर्षाच्या मुलाचा मृतदेह आढळल्याने खळबळ उडाली. या मुलाची हत्या करुन त्याचा मृतदेह पोत्यात बांधून ठेवण्यात आला होता. पोलिसांनी मृतदेह शवविच्छेदनासाठी ससून रुग्णालयात पाठविण्यात आला पाठवून तात्काळ परिसरात तपासाची सूत्रे हलवली. गेल्या काही तासापासून करण गोपाळ राठोड (वय १३, रा. म्हातोबानगर, कोथरुड) हा बेपत्ता असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. त्यानंतर पोलिसांनी तात्काळ त्याच्या कुटुंबियांशी संपर्क साधला. आपल्या चिमुरड्याची हत्या झाल्याची माहिती मिळताच त्याच्या आई वडिलांच्या पायाखालची वाळू सरकली. आपला वंशाचा दिवाच गेल्यानं आता काय करायचं असा प्रश्न त्यांना पडत होता. परंतु आपल्या निष्पाष चिमुरड्याची हत्या कोणी केली असावी असा प्रश्न त्यांनाही पडत होता. हकीकत लक्षात घेऊन पोलिसांनी तपासाची सूत्रे हलवली. कसून चौकशी केली असता बाजूलाच राहणाऱ्या इसमावर पोलिसांचा संशय आला.शेजारी राहणाऱ्या पिंटू गौतम या ३५ वर्षीय इसमाची पोलिसांनी चौकशी केली. या चौकशीदरम्यान धक्कादायक माहिती समोर आली. पिंटू गौतम आणि त्याचा लहान भाऊ करणच्या शेजारी राहत होता. करण दररोज त्यांच्या रुममध्ये जाऊन बसत असे. आपल्या मोठ्या भावाप्रमाणे असलेल्या पिंटूसोबत तो दररोज बाहेर फिरायला आणि खेळायला जात असे. दोघांची अगदी घट्ट मैत्री जमली होती. परंतु पिंटूच्या मात्र मनात काही वेगळात सैतान जागा झाला होता. तो मुलगा असला तरी त्याच्याकडे पिसाटलेला पिंटू वासनेच्या भूकेनं पाहत असे. यापूर्वी अनेकवेळा त्याने करणवर अत्याचार करण्याचा पर्यत्न केला. परंतु तो फसत होता. अखेर गुरुवारी त्याला संधी माळाली आणि दिव्यांग असलेल्या करणवर त्याने आजूबाजूला कोणी नसल्याचं पाहून लैंगिक अत्याचार केले. करणनं विरोध केला आणि आरडाओरड करत असल्याचं पाहून पिंटू घाबरून गेला आणि त्याने करणला थेट भिंतीवर ढकलून दिलं. अशातच लहान असलेल्या चिमुरड्याचा जीव निघून गेला. आपण केलेलं कृत्य कोणाला माहित झालं तर आपल्याला पोलीस ताब्यात घेतील या भीतीनं पिंटून बाजूलाच असलेल्या गोणीत करणचा मृतदेह भरला आणि रात्रीच्या दरम्यान तो एकलव्य पॉलिटेक्निक कॉलेज मैदानावर नेऊन टाकला. पोलिसांनी आरोपी पिंटूला ताब्यात घेतलं असून त्याच्यावर पोक्सो अंतर्गत ३०२, २०१, ३६४ कलमान्वये गुन्हा दाखल केलाय. अधिक तपास पुणे पोलिसांकडून सुरु आहे. परदेशातून आलेल्या पिंटूनं केलेलं कृत्य पाहून सर्वानाच आश्चर्याचा धक्का बसलाय. माणुसकीला काळिमा फासणारं कृत्य केलेल्या पिंटूला फासावर लटवण्याची मागणी त्याच्या कुटुंबियांनी केली. या कृत्याची शिक्षा पिंटुला मिळेलही परंतु गेली बारा वर्षापासून तळ हातावरील फोडाप्रमाणे जपलेल्या मोलमजुरी करणाऱ्या आई-वडिल मात्र पोरके झालेत.

## विवाहितेला प्रियकरासोबत रंगेहात...

वास्तविक करिना आता विवाहीत झाली होती. तिचा पती हेच तिचे सर्वस्व होते. मात्र अविवाहीत शिवाजीची प्रणयी नजर तिला स्वस्थ बसू देत नव्हती. लग्नानंतर बघता बघता ती एक वर्षाच्या बाळाची आई झाली. ती आता एकविस वर्षाची झाली होती. विवाहीत करिनाचे सौंदर्य लाजवाब होते. एक वर्षाच्या बाळाची आई आणि वय अवघे एकवीस वर्ष असलेली करिना अजूनही फुल फॉर्मात आणी तरोताजा रहात होती. जळगाव जिल्ह्याच्या बोदवड तालुक्यातील मुक्तळ या छोट्याश्या गावात विवाहीत करिना एकत्रीत कुटूंबात रहात होती. घरात पती, सासु, सासरे, दीर असे सर्वच जण रहात होते. शिवाजी गोकुळ पारधी हा २९ वर्षाचा अविवाहीत आणी उच्च शिक्षीत तरुण एकदम टीपटॉप रहात होत. गावच्या ग्रामपंचायतीचा तो सदस्य म्हणून निवडून आला होता. त्यामुळे गावात त्याचा चांगला मान मरतब होता. वार्डातील समस्या तो शासकीय पातळीवर सोडवत असे. उच्च शिक्षीत तरुण असल्यामुळे साहजीकच त्याचा गावात आणि ग्रामपंचायतीत चांगला वचक होता. कोरोना कालावधीत सामाजीक जाणीवेतून त्याने गाव परिसरातील मुलांना मोफत शिक्षण दिले होते. अविवाहीत शिवाजी आणि विवाहीत करिना यांच्यातील नजरेच्या खेळात दिवसेंदिवस रंगत येत होती. शिवाजीच्या नजरेच्या एका बाणात विवाहीत करिना घायाळ होत असे. करिनाच्या प्रणयी नजरेचा बाण शिवाजीच्या दिलाच्या आरपार निघून जात असे. दोघांची दिल्लगी सुरु असतांना थंडगार वा-याप्रमाणे प्रेमाची शितल झुळूक येण्यास सुरुवात झाली होती. दरम्यान प्रणयाचा धुर निघून वासनेची आग लागण्यास वेळ लागला नाही. एकमेकांच्या बाहुपाशात येण्यास दोघे आतुर झाले होते. विवाहीत प्रेयसी आणि अविवाहीत प्रेमी रहात असलेल्या गावात महावितरणकडून लोडशेडींग सुरु झाले होते. या लोडशेडींग मुळे शेतातील पिकांना पुरेसे पाणी दिले जात नव्हते. बरीच प्रतिक्षा केल्यानंतर रात्री कमी अधिक प्रमाणात विज प्रवाह सुरु होत असे. त्यामुळे रात्री विज आल्यानंतर करिनाचा पती, सासू, सासरे व दिर असे सर्वजण लगबगीने शेतात जात होते. त्या कालावधीत करिना घरी एकटीच रहात होती. या संधीचा फायदा घेत करिनाच्या घरी शिवाजी जात असे. ती रहात असलेल्या घराच्या मागच्या दरवाजाने शिवाजी प्रवेश करत होता. तिचा पती, सासु - सासरे असे सर्वजण घरी येण्याच्या आत दोघे जण आपला कार्यभाग भराभर साध्य करुन घेत होते. आपला कार्यभाग साध्य झाल्यानंतर मागच्या दरवाजानेच शिवाजी पलायन करुन आपल्या घरी परत येत असे. शैय्यासोबतीचा दोघांचा असा चोरटा कार्यक्रम गेल्या कित्येक दिवसापासून अव्याहतपणे सुरु होता. गेल्या कित्येक दिवसांपासून शिवाजी आणि करिना यांच्यातील प्रेमाचा सिलसिला सुरु होता. वारंवार खंडीत होणाऱ्या विज पुरवठ्याचा पुरेपुर फायदा शिवाजी आणि करिना उचलत होते. त्यामुळे दोघांचा रात्रकालीन शय्यासोबतीचा कार्यक्रम बिनदिक्कतपणे सुरु होता. शिवाजीने करिनाला एक मोबाईल सिमकार्ड विकत घेऊन दिले होते. पतीच्या गैरहजेरीत ती तिचे प्रचलीत सिमकार्ड काढून त्यात शिवाजीने दिलेले सिमकार्ड टाकत होती. त्या मोबाईल सिम क्रमांकावरुन दोघे आपसात बोलत असत. शिवाजीने तिच्याकडे केव्हा यावे अथवा येऊ नये, पती घरी आहे अथवा नाही या सर्व प्रश्नांचे उत्तर शिवाजीला त्या सिम क्रमांकाच्या माध्यमातून करिनाकडून समजत होते. ते सिम केवळ शिवाजी आणि करिना यांच्यातील संभाषणासाठीच सुरु होते. ४ मार्च २०२२ हा शुक्रवारचा दिवस उजाडला. या दिवसाचा सुर्योदय आणि सुर्यास्त शिवाजीसाठी अखेरचा ठरला. या रात्री नेहमीप्रमाणे शिवाजीसह घरातील सर्वांनी जेवण वगैरे आटोपले. या रात्री नेहमीप्रमाणे विजपुरवठा सुरु होताच करिनाच्या पतीसह घरातील सर्वाची पिकांना पाणी देण्यासाठी शेतात जाण्याची लगबग सुरु झाली. सर्व जण शेतात पिकांना पाणी देण्यासाठी गेले. त्यानंतर काही वेळाने दुसरा दिवस अर्थात ५ मार्च २०२२ हा दिवस सुरु झाला. मध्यरात्री साडेबारा वाजता शिवाजीचा मोबाईल खणखणला. करिना घरी एकटीच असल्याचे त्याला समजले. तो बोलत बोलत नेहमीप्रमाणे तिच्या घराच्या मागच्या दरवाजाने आत गेला. शिवाजी येण्याची करिना वाटच बघत होती. घरात येताच कमी असलेल्या वेळेच्या मर्यादेचे भान ठेवून दोघांना आपला कार्यभाग साध्य करायचा होता. त्यामुळे दोघांनी पटापट नेहमीप्रमाणे शैय्यासोबतीला सुरुवात केली. दोघांचा शैय्यासोबतीचा कार्यक्रम ऐन रंगात आला होता. संभोगसुखाच्या सर्वोच्च शिखरावर दोघे स्वार झाले असतांना अचानक घरातील विजप्रवाह सुरु झाला. पुढच्याच क्षणी करिनाचा पती घरात दाखल झाला. दोघांना नको त्या अवस्थेत बघून करिनाच्या पतीच्या तळपायाची आग मस्तकात गेली. गेल्या कित्येक दिवसांपासून दोघांच्या संबंधाची गावात चर्चा सुरु होती. त्यामुळे करिना व तिच्या पतीचा वाद सुरु होता. आज मात्र दोघांना त्याने रंगेहाथ पकडले होते. काही वेळातच तिचे सासु-सासरे आणि दीर असे इतर सदस्य देखील घरात हजर झाले. आता सर्वांच्या तावडीत शिवाजी सापडला होता. ग्रामपंचायत सदस्य असलेल्या शिवाजीचा गावात मोठा मान सन्मान होता. मात्र आता तो करिनासोबत बिछान्यावर रंगेहाथ सापडला होता. इच्छा असूनही त्याला पळून जाणे शक्य होत नव्हते. तो सर्वाचा अपराधी बनून गुपचूप बसून होता. करिनाच्या आई वडीलांना आणि नात्यातील जवळच्या नातेवाईकांना तेव्हाच्या तेव्हा रातोरात फोन करुन बोलावून घेण्यात आले. आज शिवाजीला धडा शिकवायचा हे सर्वांनी मनाशी पक्के ठरवले होते. सर्वांनी मिळून शिवाजीला बेदम मारहाण करण्यास सुरुवात केली. मारा .... मारा.. काठ्या आणा.... असा एकच हल्लकल्लोळ माजला. काही वेळाने करिनाचे आई वडील रिक्षा घेऊन आले. करिनाचा पती आणी तिचे वडील यांच्या सामुहीक बेदम मारहाणीत शिवाजी बेशुद्ध पडला. शिवाजी मरण पावला असे सर्वाना वाटले. आता याचे काय करायचे हा प्रश्न सर्वाना सतावू लागला. रात्रीचे - पहाटेचे अडीच वाजले होते. त्यावेळी पुन्हा विज प्रवाह खंडीत झाला. अंधाराचा फायदा घेत आणि शिवाजी मरण पावला असे समजून त्याच्या मृतदेहाची विल्हेवाट लावण्याचे सर्वांनी ठरवले. करिनाचा पती आणी तिचे वडील यांनी बेशुद्ध शिवाजीचे तोंड रुमालाने बांधून ठेवले. दोघांनी उचलून त्याला रिक्षात टाकले. कुणाला काही दिसू नये व समजू नये म्हणून रिक्षा ताडपत्रीने झाकून घेण्यात आली. रिक्षाने नेत त्याला मलकापूर रस्त्यावरील पुलाखाली फेकून देण्यात आले. शिवाजी अजून जीवंत होता. त्याच्या अंगात अजून कमी अधिक प्रमाणात जीव होता. त्यामुळे पुलाखाली फेकल्यानंतर तो किंकाळला. त्याच्या मुखातून एक किंकाळी बाहेर आली. शिवाजीच्या मुखातून जोरात आवाज आल्यामुळे तो जीवंत असल्याचे दोघांच्या लक्षात आले. तेथे जवळच बिअरची एक रिकामी फुटलेली बाटली पडलेली होती. त्या फुटलेल्या बाटलीने त्याच्या मानेवर जबर वार करण्यात आला. फुटलेल्या काचेची धार गळ्यावर बसल्याने कमी अधिक प्रमाणात जीवाची तग धरुन असलेल्या शिवाजीने आपले प्राण काही वेळातच सोडले. गुन्ह्यात वापरलेली रिक्षा करिनाच्या वडीलांनी व्याह्याच्या शेतातील नाल्यात लपवून ठेवली. परत येतांना वाटेत गाडरस्त्यात ताडपत्री, मयताच्या तोंडाला बांधलेला रुमाल व त्याचा मोबाईल जाळून नष्ट करण्यात आला. त्यानंतर दोघे घरी परत आले. ५ मार्च २०२२ चा दुसरा दिवस उजाडला तरी देखील शिवाजी घरी परत आला नाही. त्यामुळे त्याच्या घरातील सदस्य चिंतेत पडले. त्याच्या भावासह नातेवाईकांनी त्याचा सर्वत्र शोध घेतला. मात्र ते शोधकार्य व्यर्थ ठरले. अखेर ६ मार्च रोजी शिवाजीचा भाऊ सुनिल पारधी याने बोदवड पोलिस स्टेशन गाठले. पोलिस निरीक्षक राजेंद्र गुंजाळ यांची भेट घेत त्याने भाऊ शिवाजी बेपत्ता असल्याची व्यथा कथन केली. याप्रकरणी ४/२२ या क्रमांकाने बेपत्ता शिवाजीची मिसींग दाखल करुन घेण्यात आली. मिसींग दाखल झाल्यानंतर देखील सुनिल पारधी व त्याचे नातेवाईक आपल्या पातळीवर शिवाजीचा शोध घेतच होते. दिवसभर शिवाजीचा शोध घेत थकून भागून घरी जात असतांना सुनिल यास सरपंचांचा फोन आला. पलीकडून बोलणारे सरपंच जितेंद्र पाटील यांनी सुनिल यास सांगितले की तुझा भाऊ शिवाजी हा बोदवड - मलकापूर मार्गावरील पुलाच्या खाली मयत अवस्थेत पडलेला आहे. सदर माहिती मिळताच सुनिल हा आपल्या नातेवाईकांसह घटनास्थळी दाखल झाला. त्याठिकाणी त्याला गर्दी दिसून आली. पोलिस निरीक्षक राजेंद्र गुंजाळ हे आपल्या सहकारी कर्मचा-यांसह तेथे अगोदरच हजर होते. पोलिसांनी घटनास्थळावरील मृतदेह सुनिल यास दाखवताच तो धाय मोकलून रडू लागला. तो मृतदेह आपला बेपत्ता भाऊ शिवाजी याचा असल्याचे त्याने रडून कथन केले. शिवाजी याच्या मृतदेहाची दुर्गंधी परिसरात पसरली होती. मृतदेहाची ओळख पटल्यामुळे पोलिस तपासाचा निम्मा ताण कमी झाला होता. घटनास्थळ आणि मृतदेहाचा पंचनामा करण्यात आला. उत्तरीय तपासणीकामी मृतदेह सरकारी दवाखान्यात रवाना करण्यात आला. मयत शिवाजीची हत्या झाल्याचे स्पष्ट झाले होते. त्याच्या गळ्यावर वार करण्यात आले होते. मयत शिवाजीचे गावातील करिनासोबत असलेल्या प्रेम प्रकरणाची कुणकुण पोलिसांना लागलेली होती. त्यामुळे तिच्यासह तिच्या नातेवाईकांवर संशय पोलिसांना सुरुवातीपासून होता. याप्रकरणी मयत शिवाजी पारधी याचा भाऊ सुनिल पारधी याने दिलेल्या फिर्यादीनुसार बोदवड पोलिस स्टेशनला एकुण नऊ संशयितांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. त्या संशयीतांमधे करिनासह तिचा पती, सासरा, दिर, चुलत दिर, सासु, करिनाचे आई-वडील व एक अल्पवयीन मुलगी अशा सर्वाचा समावेश करण्यात आला. बोदवड पोलिस स्टेशनला भाग ५ गु.र.न. २६/२२ भा.द.वि. ३०२, २०१ व ३४ नुसार दाखल करण्यात आलेल्या सदर गुन्ह्याचा तपास पो.नि. राजेंद्र गुंजाळ यांनी सुरु केला. पो.नि. राजेंद्र गुंजाळ यांनी आपली तपासाची चक्रे वेगाने फिरवत आपल्या सहकाऱ्यांच्या मदतीने सर्व संशयीतांना ताब्यात घेत अटक केली. पोलिस अधीक्षक चंद्रकांत गवळी यांनी घटनास्थळी भेट देत पो.नि. गुंजाळ यांना मार्गदर्शन केले. डीवायएसपी डॉ. कुणाल सोनवणे यांनी तपासकामी बोदवड येथे ठाण मांडले होते. त्यामुळे गावातील शांतता प्रस्थापित होण्यास मदत झाली होती. गुन्ह्याच्या तपासकामी ठसे तज्ञ व फॉरेन्सिक लॅब पथकाची मदत घेण्यात आली. अल्पवयीन विधीसंघर्षीत बालिकेस बाल न्यायमंडळात हजर करण्यात आले. इतर सर्व संशयीतांना अटकेनंतर न्यायालयात हजर करण्यात आले. संशयीतांना सुनावण्यात आलेल्या पोलिस कोठडी दरम्यान करिनाचा पती आणि तिचे वडील यांना पोलिसी खाक्या दाखवत गुन्ह्याची माहिती पोलिसांनी घेतली. त्यांनी आपला गुन्हा कबुल केला. गुन्ह्यात वापरलेले तुटलेले सिम कार्ड, मोबाईलचे जळालेले अवशेष, बॅटरी (टॉर्च), रिक्षा, घटनास्थळावरील रक्ताचे नमुने, रक्तमिश्रित माती व बिअरच्या बाटलीचे तुकडे, तुटलेली बिअरची बाटली आदी मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. पोलीस अधिक्षक डॉ. प्रविण मुंढे, अप्पर पोलीस अधिक्षक चंद्रकांत गवळी, उप विभागीय पोलीस अधिकारी कुणाल सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक राजेंद्र गुंजाळ हे पुढील तपास करत आहेत. त्यांना पोलिस उप निरीक्षक शरद माळी, सहायक फौजदार सुधाकर शेजोळे, पो.हे.कॉ. वसंत निकम, पोलिस नाईक शशिकांत महाले, पोलिस नाईक सचिन चौधरी, पो.कॉ. मुकेश पाटील, पो.कॉ. निलेश सिसोदे, पो.कॉ. निखिल नारखेडे, पो.कॉ. दिपक पाटील, पो.कॉ. मनोहर बनसोडे यांचे सहकार्य लाभत आहे. (या कथेतील करिना हे नाव काल्पनिक आहे.)

## रंगपंचमीचा रंग रक्ताने लाल झाला...

याचवेळेस रूपराज पाटील आणि निशांत साठे या दोघांनी कुंदनमलला वाटेत अडवून सिमेंटच्या ब्लॉकनं त्याच्या डोक्यात प्रहार केला. ज्यात कुंदनमल हा गंभीर जखमी झाला. त्यानंतर उपचारासाठी त्याला रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र उपचारपूर्वीच त्याचा मृत्यू झाला. दरम्यान या संदर्भाची माहिती पोलिसांना मिळाल्यानंतर सुरुवातीला कुंदनमलच्या भावानं लोखंडी पाईपवरून पडून भावाचा मृत्यू झाल्याचे पोलिसांना सांगितलं. त्यामुळं त्याच्या फिर्यादीवरून उल्हासनगर पोलिसांनी या प्रकरणी अकस्मात मृत्यूची नोंद केली. दरम्यान, शवविच्छेदनाच्या अहवालात कुंदनमलच्या डोक्यात गंभीर दुखापत झाल्यानं त्याचा मृत्यू झाल्याचं उघड झाले. याशिवाय पोलिसांना काही गोपनीय माहितीद्वारे हा अकस्मात मृत्यू नसून हत्या असल्याची माहिती मिळाली. त्यानुसार दोघी धोबीघाट परिसरातील काही गोपनीय साक्षीदारांच्या मदतीनं पोलिसांनी पुढील चौकशीला सुरुवात केली. त्यानंतर पोलिसांनी हत्येचा गुन्हा दाखल करत याप्रकरणी रूपराज पाटील या रेकॉर्ड वरच्या गुन्हेगाराला अटक केली आहे. तर त्याचा दुसरा साथीदार निशान साठे हा फरार झाल्याची माहिती मिळाली आहे.

## दारूच्या नशेत दोघेही बेभान झाले...

दारूडे असल्याने रात्री जेवणापूर्वी ते आपल्या घशाखाली दारू रिचवूनच जेवण करीत होते. त्याच्या दृष्टीने तो श्रमपरिहार होता. दिवसभर काम करून थकवा आल्याने रात्रीचा दारूचा घोट घेतल्याशिवाय त्या दोघांना ही चैन पडत नव्हती. त्या दोघांची दररोजची भांडणे ही मालक पी.मनोज यांनी बऱ्याचवेळेला मिटवली देखील होती. परंतू तरी ही त्याचे मागचे तसे पुढे याप्रमाणे भांडणे ही ठरलेलीच होती. दोघे ही एकमेकांच्या अंगावर धाव जात मारहाण करणे असा त्यांचा प्रकार नित्याचाच झाला होता. त्यामुळे मालक ही त्यांची भांडणे सोडवून थकले होते. त्या दोघांनाही ही त्यानी सरळ वागण्याचा आणि राहण्याचा सल्ला दिलेला होता. ते सरळ नाही वागले तर त्याना त्यांनी कामावरून काढून टाकण्याची धमकी ही दिली होती. तरी ही त्या दोघातील भांडणे काही कमी झाली नव्हती. त्यातच रेविंद्र केलन याचा स्वभाव तसा रागीट होता. त्याला लवकर राग येत होता. तो रागाच्या भरात आर.मनीकंदनला अर्वाच्च भाषेत शिव्या ही देत होता. त्यामुळे त्याचा ही राग त्याला अनावर होत होता. त्या दोघांची मल्लल्याम भाषा ही मालक पी.मनोज याच्या शिवाय दुसऱ्या कोणाला समजत ही नव्हती आणि कळत ही नव्हती. त्यामुळे तेथे अजापास राहणाऱ्या लोकांना ते कशावरून भांडतात हे समजत नव्हते.रेविंद्र केलन याचे म्हणणे होते की आठवडयातून तीन दिवस आर.मनीकंदन याने जेवण आणि कपडे धुवावेत तर आर.मनीकंदन हा त्याला तू सकाळी जेवण कर मी संध्याकाळी जेवण करतो आणि ज्याचे त्याचे कपडे ज्याचे त्याने धुवावेत असे म्हणणे होते. त्याचे म्हणणे बरोबर होते. शेवटी रेविंद्र केलन हा ज्याचे त्याने कपडे धुवावेत यागोष्टीवर तयार झाला.प ण सकाळचे जेवण तयार करण्याला तो तयार नव्हता. यावरून त्या दोघात वाद हा होत होता. दारू पिल्यानंतर तर तो वाद आणखीच चिघळत होता. दोघांपैकी कुणीच कोणाचे ऐकत नव्हते. मालकाला ही त्याना कामावर ठेवून घ्यायचे का नाही असा प्रश्न पडलेला होता.राग आणि भीक अशी दोघांची होती. गोव्यात ते दोघे ही केरळहून उदरनिर्वाहासाठी आले होते. पण येथे येवून त्याना कामाचे भान न राहता दुसऱ्याच कामावरून त्याचे भांडणे होत होते. गुरूवार दि.१० मार्च रोजी ते दोघे ही काम आटोपून दारू प्यायला बसले होते.झोपडीच्या बाहेर ते दोघे दारू पित असताना दोघांना ही दारूची नशा चढली होती.त्यावेळी देखील त्या दोघात जेवण कोण तयार करणार यावरून वाद होत होता. आर.मनिकंदन याच्या मते सकाळी त्याने जेवण बनवले असल्याने रात्रीचे जेवण रेव्रिंद केलन याने बनवावे तर रेविंद्र याच्या मते तो काही आता जेवण तयार करण्याच्या मुड मध्ये नाही त्याला दारू जास्त झाली आहे. जेवण तयार करण्याऐवजी बाहेरून काही तरी खाण्याचे आणावे यावरून ते दोघे भांडायला लागले होते. रेविंद्र याने जेवण तयार करणार नाही म्हटल्यावर आर.मनिकंदन याला राग आलेला होता. दारूच्या नशेत तो त्याला म्हणाला एक तर तू तुझ्या पैशाने बाहेरचे काही तरी खायाला आण नाही तर तुझ्या बायकोला तरी आण त्याने बायकोचा विषय काढल्यावर रेविंद्र हा त्याचेवर चिडला होता. त्याच्या मनात आपल्या बायकोविषयी काय आहे हे त्याने ओळखले होते. तू येथे माझ्या बायकोचा का विषय काढलास तुला ती त्या कामासाठी पाहिजे आहे म्हणून तू येथे बसून तिचा विषय काढतोस तू गावात असताना देखील सारखा तिच्या मागे मागे करीत होतास.तू माझ्या बायकोवर लाईन मारतोस म्हणून तू येथे तिचा विषय काढला आहेस असे रेंविद्र केलन त्याला म्हणाला आणि त्याला अर्वाच्च भाषेत शिवीगाळ करू लागला याचा राग आर.मनिकंदन याला आला. तो ही ही त्याचप्रमाणे अर्वाच्च भाषेत शिवीगाळ करीत त्याचे अंगावर मारण्यासाठी धावून गेला. दोघे ही एकमेकांच्या अगांवर जात हाणामारी करत होते. त्यातुन रविंद्र याने आर.मनिकंदन याला खाली पाडले. तो त्याचे अंगावर बसून ठोसे मारू लागला होता.त्यामुळे कसे बसे स्वत:ला सावरत तो उठला आणि धावतच जात झोपडीतून काठी घेऊन बाहेर आले आणि रेविंद्र याच्या डोक्यात मारहाण केली त्यामुळे तो खाली पडला.तो त्याला लाथ बुक्कयांनी मारहाण करीत होता. त्याचवेळी रेविंद्र त्याला प्रतिकार करीत उठला.दोघात हाणामारी चालूच होती. कोणी कुणाला मारहाण करीत होते हे समजून येत नव्हते. तसे आर.मनिकंदन याने पळत जात झोपडीतून कोयता आणला आणि सरळ रेविंद्र केलन याच्या डोक्यावर मानेवर असे सपासप वार केले. त्यासरशी रेविंद्र केलन हा रक्ताच्या थारोळ्यात जखमी होऊन जमीनीवर पडला. तो जखमी होऊन निपचिप पडल्याचे बघून आर.मनिकंदन याने मालक पी.मनोज याना मोबाईलवरून फोन करून बोलावून घेतले आणि त्यांना घडलेली सगळी हकीकत सांगितली. पी.मनोज हे तातडीने घटनास्थळी आपल्या केळीच्या बागेत आले. त्यावेळी रात्रीचे ९.३० वाजले होते. त्यांनी सरळ जखमी रेव्रिंद केलन याला उपचारासाठी दोडामार्ग येथील ग्रामीण रुग्णालयात दाखल केले. तेथील डॉक्टरांनी त्याला तपासून त्याचा उपचारापूर्वीच मृत्यू झाल्याचे सांगितले. हा खूनाचा प्रकार असल्याने पी.मनोज यांनी या घटनेची माहिती दोडामार्ग पोलीसांना दिली. पोलीस ही या घटनेची माहिती मिळताच तातडीने घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी घटनेचा पंचनामा करून या घटनेची माहिती पी.मनोज याच्याकडूनद घेतली.संशयीत आरोपी आर.मनिकंदन हा घटनेनंतर तेथेच बसून होता. त्याच्या शेजारीच रक्ताने माखलेला कोयता व काठी होती. पोलीसांनी त्याला ताब्यात घेऊन त्याचेकडे या घटनेची चौकशी केली असता त्याने घडलेला सगळा घटनाक्रम पोलीसांना सांगून किरकोळ कारणातून वाद झाल्याने त्यात माझ्या हातून रेंविंद्र केलन याचा खून झाल्याचे सांगितले.शिवाय झालेल्या भांडणात रेविंद्र याने ही आपल्याला मारहाण केल्याचे सांगितले. या घटनेची लेखी फिर्याद केळीच्या बागेचे मालक पी.मनोज यांनी पोलीसात दिल्याने त्याचे फिर्यादीवरून पोलीसांनी रेविंद्र केलन (वय ५०) रा.मुळ केरळ सध्या गोवा दोडामार्ग याच्या खून प्रकरणी आर. मानिकंदन (वय ४८) रा.केरळ सध्या गोवा याचे विरोधात आयपीसी कलम ३०२ नुसार गुन्हा दाखल करून त्याला न्यायालयात उभे केले असता मा.न्यायालयाने त्याला पाच दिवसाची पोलीस कोठडी सुनावली होती. पोलीस कोठडी दरम्यान पोलीसांनी त्याचेकडून गुन्हयात वापरलेली काठी व कोयता जप्त केला होता. या घटनेची माहिती मयत रेविंद्र केलन याच्या केरळ येथील नातेईकांना देण्यात आली होती. ते गोव्यात येई पर्यत त्याचा मृतदेह सिंधुनगरी येथील शीतगृहात ठेवण्यात आला होता. या घटनेचा पुढील तपास दोडामार्ग पोलीस करीत आहेत.भांडण आणि दारू याचा मेळ जमला की ते भांडण विकोपाला जात असते. त्यातच एखाद्याचा स्वभाव रागीट आणि भांडखोर असला तर काही विचारण्याची सोय नसते ते भांडण मिटण्याऐवजी वाढत जाते शिवाय रागाच्या भरात खूनाची घटना ही घडते हेच या घटनेवरून दिसून येते. गोव्यात परराज्यातून उदरनिर्वाहासाठी अनेकजण येतात पण येथे येवून त्याचेत दारू पिण्यावरून तर कधी अन्य कोणत्या तरी कारणातून भांडणे वाद विवाद होतात.खूनासारख्या घटनेला ही कारणे पुरेसे ठरत असल्याने अशा घटना घडतात.

## एकत्र राहणारा सोबती काळ ठरला...

परप्रांतातून येणारे मजूर याच घरांमध्ये राहून त्या कंपनीत नोकरी करीत असतात. वाद तालुक्यातील खुपरी येथील सनाल्को कंपनीनेही आपल्या कंपनीत काम करणाऱ्या कामगारांसाठी ठाकरे पाडा येथे भाड्याने चाल घेतली होती आणि याच चाळीतील एका खोलीत दिपुकुमार यादव (३४) आणि पप्पू यादव हे दोन बिहारी मजूर राहत असत. कंपनी त्यांना एकवेळचे जेवण देत असे. मात्र संध्याकाळचे जेवण त्यांना बनवावे लागत असे. यातील दिपुकुमार यादव हा नशेडी होता आणि संध्याकाळचे जेवण करायला टाळाटाळ करायचा. त्यावरून या दोन मजुरांची नेहमीच भांडणे व्हायची. त्यातच ज्या भाड्याच्या खोलीत ते दोघे राहायचे त्या खोलीच्या मालकी वरूनही दोघांमध्ये वाद व्हायचे. दरम्यान रविवारी दोघेही एकत्र दारू प्यायले आणि त्यानंतर दारूची नशा होताच दोघांमध्ये भांडणे सुरु झाली. यावेळी चिडलेल्या पप्पू यादव याने बाटली फोडून दिपुकुमार याच्या गळ्यावर वार केले आणि त्याला ठार मारले. त्यानंतर त्याचा मृतदेह जवळच असलेल्या पेव्हर ब्लॉकच्या ढिगाऱ्यात नेऊन टाकला. दरम्यान दुसऱ्या दिवशी गावातल्या लोकांना हा मृतदेह दिसताच त्यांनी पोलीस पाटलांना माहिती दिली आणि पोलीस पाटलाने तत्काळ या घटनेची माहिती वाडा पोलिसांना दिली. मात्र इतके होऊनही आरोपी शांतपणे घरात बसून होता आणि बिहारला पळून जाण्याच्या विचारात होता. मात्र पोलिसांनी त्याची चौकशी करीत असताना मृताचा मोबाईल त्यांना घरात सापडला. याबाबत पप्पू यादव याच्याकडे चौकशी केली असता तो मोबाईल इथे ठेऊन कुठे गेला. हे आपल्याला ठाऊक नाही असे त्याने सांगितले. मात्र मृताचा मोबाईल तपासला असता त्याने शेवटचा कॉल आपल्या गावी केल्याचे दिसून आले. तसेच घरात काही ठिकाणी रक्ताचे डाग दिसले. त्यावरून पप्पू यादवला ताब्यात घेऊन त्याची कसून चौकशी केली असता त्याने गुन्हा कबुल केला. पोलिसांनी अवघ्या १२ तासात या गुन्ह्याचा छडा लावला. या घटनेनंतर वाड्यातील नागरिकांनी पोलिसांचे आणि खास करून पोनि दशरथ पाटील यांचे अभिनंदन केले आहे.

क्राईम संध्या
सोमवार दि. २८ मार्च २०२२ ते रविवार दि. ०३ एप्रिल २०२२
लातूर/पालघर/सोलापूर
www.crimesandhya.com


# वस्तूची ऑनलाईन खरेदी करताना सुद्धा ग्राहकांनी सावधगिरी बाळगायला हवी -तहसीलदार सुरेश घोळवे




**देवणी/प्रतिनिधी**

वस्तू खरेदी करताना कुठल्याही आमिषाला बळी न पडता वस्तूची पारख नीटनेटकी करून घ्यावी. वस्तूची ऑनलाईन खरेदी करताना सुद्धा ग्राहकांनी सावधगिरी बाळगायला हवी. याबाबत जागरूकता निर्माण करण्यासाठी जागतिक ग्राहक दिन साजरा केला जातो. जागतिकीकरणाच्या स्पर्धात्मक युगात ग्राहकांसाठी हा दिन साजरा होणे गरजेचे आहे. ग्राहकांना सेवा पुरवताना होणाऱ्या हलगर्जीपणामुळे १९६० मध्ये अमेरिकेत अध्यक्षीय निवडणुकीमध्ये ग्राहकांच्या प्रश्नांचा निचरा करण्यासाठी एक व्यासपीठ तयार करण्यात आले आणि त्यासाठीचे जागतिक स्तरांवर पाठपुरावेही करण्यात आले. त्याला यूनेस्कोनेही मान्यता दिली. त्यानुसार दरवर्षी १५ मार्च हा दिवस जागतिक ग्राहक दिन म्हणून साजरा केला जातो. असे प्रतिपादन देवणीचे तहसिलदार सुरेश घोळवे यांनी केले.

दि.२२ मार्च रोजी देवणी तहसील कार्यालयाच्या आवारात तहसील कार्यालया च्या वतीने आयोजित जागतिक ग्राहक हक्क दिनानिमित्त अध्यक्षपदावरून ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी देवणीचे तहसीलदार सुरेश घोळवे हे होते. तर उद्धाटक म्हणून संजय गांधी निराधार योजना देवणीचे अध्यक्ष वैजनाथ लुल्ले उपस्थित होते. तसेच प्रमुख पाहुणे म्हणून ग्राहक पंचायत महाराष्ट्र राज्याचे विभागीय अध्यक्ष सतीश माने, ग्राहक पंचायत महाराष्ट्र राज्याचे लातूर जिल्हा अध्यक्ष डॉ.प्रल्हाद तिवारी, ग्राहक पंचायत महाराष्ट्र राज्याचे लातूर जिल्हा संघटक संजय ऊर्फ बालासाहेब गोविंदराव शिंदे अतनूरकर, ग्राहक संरक्षण परिषदेचे अभिजीत आवटे, अखिल भारतीय ग्राहक पंचायतीचे नामदेव कारभारी, संतोष उपासे, देवणी पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक गणेश सोंडारे, ग्राहक पंचायतचे दत्तात्रेय सावरे-पाटील, सहसंघटक शरद सुर्यवंशी, नायब तहसीलदार पुरवठाचे विलास तरंगे, नायब तहसीलदार महसूलचे श्रीमती सविता माडजे, प्रा.डॉ.अनिल इंगोले, अव्वल कारकून माधव सोळुंके, श्रीमती उर्मिला तिडके आदी उपस्थित होते. स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमेचे पूजन व दिपप्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक पुरवठ्याचे नायब तहसीलदार विलास तरंगे यांनी केले. तर सूत्रसंचालन महसूल सहाय्यक सुग्रीव बिराजदार यांनी केले. आभार प्रदर्शन अवल कारकून माधव सोळुंके यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रसाद जाधव, उर्मिला तिडके, तुळशीराम आनंतवाळ, विजयकुमार हांदेश्वर, बाळू मोरे, काशिनाथ म्हेत्रे, व्यंकटेश बिजापुरे, महेश वडले, तुकाराम रामासाने, श्रीमती पानसरे, श्रीमती नागरगोजे, राहुल कासले, पंडित कांबळे, प्रदीप कांबळे, दत्ता कासले, गणपत वाघमारे, सुभाष हणमंते यांनी विशेष परिश्रम घेतले. यावेळी प्रमुख अतिथी व वक्त्यांनी ग्राहक हक्क संरक्षण संदर्भात विशेष असे मार्गदर्शन केले.

# वाड्यातील सुरु असलेल्या रस्त्यांच्या कामात नियोजन नसल्याने मनसे आक्रमक



**वाडा/प्रतिनिधी**

वाडा नगरपंचायतीच्या वतीने वाडा शहरात अंतर्गत रस्त्यांची कामे सुरू असून या कामात कसल्याही प्रकारचे नियोजन नसल्याने या अपूर्ण रस्त्यांचा सर्वसामान्य नागरिकांना त्रास सहन करावा लागत असल्याने मनसेचे कायकर्ते आक्रमक भूमिका घेत पोहचले नगरपंचायत कार्यालयात. एकाच वेळी विविध प्रभागातील रस्ते खोदून ठेवल्याने वाहनचालकांसह नागरिकांनाही याचा त्रास सहन करावा लागत आहे. रस्त्यांच्या खोदकामात पाणी पुरवठ्याचे पाईप तुटल्याने नागरिकांना पाणी मिळेनासे झाले आहे. तर विविध सामाजिक संघटना व सामाजिक कार्यकर्त्यांच्या मागणी नंतरही कामाच्या ठिकाणी अंदाजप्रकाचे फलक लावले नाहीत यासाठी मनसेचे तालुका सचिव देवेंद्र भानुशाली यांच्यासह अनेक कार्यकर्ते नगरपंचायत कार्यालयात अधिकाऱ्यांना भेटून या बाबत जाब विचारत रस्त्यांच्या कामाबाबत सुनियोजितपणा असावा व सर्व कामे नियमानुसार व टिकाऊ करावे अन्यथा मनसेच्या पद्धतीने आंदोलन करावे लागेल असा इशाराही भानुशाली यांनी दिला आहे.

## थोडक्यात वृत्तांत

### युवक कॉंग्रेस शहर जिल्हाअध्यक्षपदी ॲड.शाहरूख पटेल

लातूर : महाराष्ट्र राज्यात नुकत्याच युवक कॉंग्रेसच्या निवडणुका पार पडल्या. या निवडणुकीत लातुर शहर जिल्हाध्यक्षपदी ॲड.शाहरूख पटेल यांची निवड झाली. ॲड. शाहरूख पटेल हे लातूर येथील जिल्हा व सत्र न्यायालयामध्ये विधीज्ञ आहेत. ते एल.एल.बी व एल.एल.एम असुन त्यांचे शिक्षण दयांनद विधी महाविदयालय, लातूर येथे झाले आहे. समाजकारण व राजकारण याचीं आवड असणारे ॲड.पटेल हे महाविदयालयीन जीवनात राष्ट्रीय सेवा योजना या प्रभगा अंतर्गत नॅशनल व स्टेट लेवल चे पारितोषक मिळवले आहे. क्रिडा क्षेत्रात किक बॉक्सिंग व तायकोंदो या प्रकारात राज्य पातळीवर अनेक पारितोषके मिळवली आहेत.कॉग्रेस पक्षामध्ये ते गेल्या ५ वर्षापासुन सक्रीय आहेत. या निवडीबददल त्यांचे नागरिकांतुन व मित्रपरिवारतून अभिनंदन होत आहे.

### विशाल अयाचित यांच्या हस्ते रासेयो शिबिराचे उद्घाटन

लातूर : लातूर येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना शिबीराचे उद्घाटन व्यंकटेश कलासेसचे संचालक रो.विशाल आयाचित यांच्या हस्ते संपन्न झाले.बोकनगाव येथे हे शिबीर आयोजित करण्यात आले होते. उद्धघाटन प्रसंगी अयाचित यांनी विद्यार्थ्यांना विविध विषयाच्या माध्यमातून सेवा कशी करावी याविषयी मार्गदर्शन केले. ग्रामस्वच्छता, वृक्षारोपण यामध्ये प्रत्यक्ष सहभागी होऊन विद्यार्थ्यांना प्रोत्साहन दिले.वृक्षारोपण करण्यासाठी वडाची ७ झाडे अयाचित यांनी भेट दिली. प्रारंभी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.बालाजी कांबळे यांनी अयाचित यांचे स्वागत केले. शिबीराच्या समारोप प्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून विद्याभारती प्रकाशनचे प्रकाशक रो.रवि जोशी उपस्थित होते.याप्रसंगी त्यांनी स्पर्धा परीक्षा कशा द्याव्यात? त्या परीक्षेत यशस्वी कसे व्हावे ? राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातुन स्वंयसेवकाची भूमिका कशी बजावावी? समाजाची सेवा कशी करावी व देशाचा आदर्श नागरिक कसा असावा? याबाबत मार्गदर्शन केले.बोकनगावचे उपसरपंच रो.किशोर दाताळ यांनी त्यांचा सत्कार केला. या कार्यक्रमासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.बालाजी कांबळे, कार्यक्रमाधिकारी डॉ.राजाराम दावणकर, बोकनगावच्या सरपंच सौ.सुरेखा स्वामी, उपसरपंच व अविनाश बेलूरे आदींची उपस्थिती होती.

### जिल्हा विकास समन्वय व सनियंत्रण समितीची बैठक

लातूर :जिल्हा विकास समन्वय व सनियंत्रण समिती (दिशा) समितीची बैठक समितीचे अध्यक्ष तथा खासदार सुधाकर श्रंगारे यांच्या अध्यक्षतेखाली दि.२७ मार्च २०२२ रोजी सकाळी ११.०० वाजता जिल्हा नियोजन समिती सभागृह, नवीन जिल्हाधिकारी कार्यालय, लातूर येथे होणार असल्याचे जिल्हा विकास समन्वय व सनियंत्रण समितीचे सदस्य सचिव तथा जिल्हाधिकारी पृथ्वीराज बी.पी. यांनी प्रसिध्दी पत्रकाव्दारे कळविले आहे.

### काशिविश्वेश्वर मंदिराचा कलशारोहन सोहळा

औसा : औसा तालुक्यातील गुळखेडा येथील काशी विश्ववेश्वर मंदिराची उभारणी ग्रामस्थांच्या सहभागातून करण्यात आली असुन या मंदिराचा कलशारोहण सोहळा उज्जैन पिठाचे श्रीश्रीश्री १००८जगदुरु सिद्धलिंग राजदेशिकेंद्र शिवाचार्य महास्वामी यांच्या अमृत हस्ते दि २८ मार्च रोजी संपन्न होणार आहे. या कार्यक्रमानिमित्त सकाळी ६ वाजता हिरेमठ संस्थानचे शिवभक्त परायण चंद्रशेखर हिरेमठ महाराज यांचा महारुद्र अभिषेक होणार आहे. सकाळी १० वाजता श्रीजगदुरू व कलशाची गावातून भव्य शोभायात्रा काढण्यात येणार आहे. याप्रसंगी हिरेमठ संस्थानचे मार्गदर्शक ष.ब्र.१०८ शांतवीरलिंग शिवाचार्य महाराज तसेच हिरेमठ संस्थानचे पीठाधीपती ष.ब्र. १०८ बाल तपस्वी गुरु निरंजन शिवाचार्य महाराज यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे. गुळखेडा येथील काशिविश्वेश्वर मंदिराच्या कलशारोहन सोहळ्यानिमित्त उज्जैन पीठाचे श्रीमत् जगदुरु यांचे अमृत आशीर्वचन दुपारी २ ते ५ या वेळेत संपन्न होणार आहे. तरी सर्व शिवभक्त आणि काशिविश्वेश्वर मंदिराच्या कलशारोहन सोहळ्यासाठी आयोजित उज्जैन पिठाचे श्रीमत् जगदुरु यांचे आशिर्वचन व महाप्रसादाचा लाभ घेण्यासाठी हजारोच्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन समस्त ग्रामस्थ गुळखेडा यांच्यावतीने करण्यात आलं आहे.

### वाळूची तस्करी रोखण्यासाठी पोलीस विभागाकडून कडक उपाययोजना - शंभूराज देसाई

मुंबई : वाळूची तस्करी रोखण्यासाठी पोलीस विभागाकडून कडक उपाययोजना करण्यात येतील अशी माहिती गृह (ग्रामीण) राज्यमंत्री शंभूराज देसाई यांनी विधानसभेत दिली. बुलढाणा जिल्हयातील गोळेगाव येथे वाळू माफीयांतर्फे वाळू वाहतूक विरोध केल्याने एका व्यक्तीस विष पाजून जिवे मारण्याचा प्रयत्न केल्याप्रकरणी विधानसभा सदस्य सुनिल प्रभु, विरोधी पक्ष नेते देवेंद्र फडणवीस, राधाकृष्ण विखे-पाटील, सदस्य बबनराव लोणीकर यांनी प्रश्न उपस्थित केला.या प्रश्नाला उत्तर देताना गृह (ग्रामीण) राज्यमंत्री देसाई म्हणाले, बुलढाणा जिल्ह्यातील गोळेगाव मध्ये ११ जानेवारी २०२२ रोजी या विषयासंदर्भात गुन्हा दाखल करण्यात आला असून. यामध्ये तीन आरोपीं आहेत.त्यांचा पोलीसांनी तपास केला असता ते कुठेच सापडले नाहीत. हे आरोपी फरार असल्यामुळे पोलीसांनी त्यांना अटक करता आली नाही. त्याचदरम्यान आरोपींनी अंतरिम जामीन घेतला आहे.अंतरिम जामीन रद्द करण्यासाठी पोलीस विभागाकडून सर्वोतोपरी प्रयत्न करण्यात येईल.तसेच वाळू तस्करीच्या घटना घडू नयेत यासाठी पोलीस विभागाकडून नेहमीच महसूल विभागाला सहकार्य केले जाते.पोलीस विभाग व महसूल या दोन्ही विभागांनी वाळू तस्करी रोखण्यासाठी कडक उपाययोजना कराव्यात यासाठी या दोन्ही विभागाची संयुक्त बैठक बोलविण्यात येईल असेही राज्यमंत्री देसाई यांनी सांगितले.

# राज्य उत्पादन शुल्क विभागाने केली गोव्याची ७६ लाखांची दारू जप्त




**सोलापूर/इरप्पा बोरीकरजगी**

होळी व धुलीवंदनाच्या पार्श्वभूमीवर सोलापूर राज्य उत्पादन शुल्क विभागाने महाराष्ट्र-कर्नाटक सीमेवर शुक्रवारी पहाटे गस्ती दरम्यान एका कंटेनरमधून गोवा राज्याच्या विदेशी दारू च्या ८९० पेट्यासह ७५ लाख ८२ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. होळी, धुलीवंदन व रंगपंचमीच्या दिवशी मद्याची मागणी लक्षात घेता गोवा राज्यातून दारूची अवैधरित्या वाहतूक होण्याची शक्यता असल्याने विशेष पथके नेमण्यात आली होती. या पथकाकडून कडक पहारा लावून गस्त घालण्यात येत होती. शुक्रवारी राज्य उत्पादन शुल्कच्या पथकाने जत सांगोला महामार्गावर सोनंदच्या हद्दीत पहाटेच्या सुमारास गस्त घालत असताना सहा चाकी कंटेनर (एमएच ०४ जीआर ७२३७) मधून गोवा राज्य निर्मित व महाराष्ट्र राज्यात विक्रीस प्रतिबंध असलेल्या विदेशी दारूच्या एकूण ८९० पेट्या जप्त केल्या. सदर वाहनात एड्रियल क्लासिक व्हिस्कीच्या ७५० मिलीच्या ३०० पेट्या, रॉयल स्टॅग विदेशी दारूच्या १८० मिलीच्या १०० पेट्या, इम्पेरियल ब्लू विदेशी दारूच्या १८० मिलीच्या २३२ पेट्या, मॅकडॉल नंबर वन व्हिस्की विदेशी दारू १८० मिलीच्या २५८ पेट्या असा ६६ लाख ७६ हजार रूपयांचा दारूसाठा जप्त केला. तसेच दोन मोबाईल व कंटेनर असा एकूण ७६ लाख ८० हजारांचा मुद्देमाल हस्तगत केला. कंटेनरचालक ज्ञानेश्वर अशोक भोसले (वय ३१ रा. पोखरापूर, ता.मोहोळ जि.सोलापूर) याच्याविरुद्ध गुन्हा नोंदविण्यात आला आहे. सदर गुन्ह्यातील मुख्य आरोपी बापू उर्फ सोमनाथ तुकाराम भोसले, बाळू भोसले, शेखर भोसले व कंटेनर मालकासह इतर आरोपी फरार असून त्यांचा शोध सुरू आहे. ही कारवाई सोलापूर राज्य उत्पादन शुल्क अधीक्षक नितीन धार्मिक यांच्या नेतृत्वाखाली उपअधीक्षक आदित्य पवार, दुय्यम निरीक्षक (भरारी पथक) सुरेश झगडे, अंकुश अवताडे, सहाय्यक दुय्यम निरीक्षक जी.आर. होळकर, जवान वेळापुरे, पांढरे, अण्णा कर्चे, व्हनगुंटी, सावंत, लुंगसे, वाघमारे, कुटे यांच्या पथकाने केली आहे.

# मनसे विद्यार्थी सेनेच्या वतीने आयोजित मोफत सर्वरोग निदान शिबीर उत्साहात!

**लातूर/प्रतिनिधी**

अखंड हिंदुस्तानाचे दैवत व अठरापगड जाती धर्मातील लोकांना एकत्र करून हिंदवी स्वराज्याची निर्मिती करणारे आणि माझ्या स्वराज्यातील रयत ही नेहमी सुखी समाधानी आणि आनंददायी राहावी यासाठी स्वतःचे आयुष्य झीजवणारे जाणते राजे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या तिथीप्रमाणे जयंती निमित्त महाराष्ट्र नवनिर्माण विद्यार्थी सेना लातूर जिल्हाध्यक्ष किरण चव्हाण यांच्या वतीने मोफत सर्वरोग निदान शिबीर घेण्यात आले. या मोफत सर्वरोग निदान शिबिराचे उद्धाटन महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे प्रदेश सरचिटणीस संतोषभाऊ नागरगोजे यांच्या शुभ हस्ते करण्यात करण्यात आले या उद्घाटन प्रसंगी मल्टीस्पेशलिटी हॉस्पिटल चे डॉक्टर विजय डॉक्टर सुनील होळीकर मनसे विद्यार्थी सेना जिल्हाध्यक्ष किरण चव्हाण मनसे शेतकरी सेना जिल्हाध्यक्ष भागवत शिंदे मनसे शहराध्यक्ष मनोज अभंग संत गोरोबाकाका प्राथमिक विद्यालय सचिव सखाराम चव्हाण यांच्या उपस्थितीत संपन्न झाले. समाजातील गोरगरीब कष्टकरी लोकांना त्यांच्या आर्थिक दुर्बलतेमुळे विविध अडचणींमुळे स्वतःच्या आरोग्याची काळजी घेणे शक्य होत नाही त्यामुळे त्यांना दवाखान्यात जाता येत नाही हाच उदात्त आणि प्रामाणिक भाव मनात ठेवून छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीचे औचित्य साधून राज साहेब ठाकरे यांच्या आदेशानुसार मनसे विद्यार्थी सेनेचे अध्यक्ष अमित ठाकरे मार्गदर्शनानुसार मनसे विद्यार्थी सेना जिल्हाध्यक्ष किरण चव्हाण यांच्या संकल्पनेतून हे मोफत सर्वरोग निदान शिबिर शेकडो रुग्णांच्या विविध आजाराच्या तपासण्या करून व उपचार करून यशस्वीरित्या संपन्न करण्यात आले.या शिबिराला लातूर शहरातील पूर्व भागातील महादेव नगर बालाजी नगर गवळीनगर इत्यादी भागातील लोकांनी भरभरून प्रतिसाद दिला व आरोग्य शिबिराचा लाभ घेतला.

या शिबिरासाठी व्हिजन मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटलचा स्टाफ डॉ.किरण होळकर डॉ. सुप्रिया कांबळे डॉ. संतोष भडीकर डॉ.अपूर्वा पामलवाड शैलेंद्र गाडे सतीश घनघावे विनोद छोटात हर्षद चिकटे रागिनी गायकवाड देशमुख निकिता निकिता यांचे विशेष सहकार्य लाभले. यावेळी मनसे विद्यार्थी सेना शहराध्यक्ष बालाजी कांबळे मनविसे शहर सचिव योगेश डोंगरे मनसे शहर उपाध्यक्ष वैभव जाधव अजिंक्य मोरे योगेश सूर्यवंशी किरण लवटे तसेच मनसे कार्यकर्ते व पूर्वभागातील नागरिक बंधू-भगिनी उपस्थित होते.

# रस्त्याच्या कामादरम्यान तुटलेल्या पाईप लाईनची पुनरजोडणी करण्याची मागणी



**वाडा/प्रतिनिधी**

वाडा नगरपंचायतीच्या हद्दीत सर्वच प्रभागातील रस्त्याची कामे जोरात सुरू आहेत. रस्ता दुरुस्तीच्या कामात खोदकाम केल्याने जमिनी खालून गेलेली पाणी पुरवठ्याची पाईपलाईन अनेक ठिकाणी तुटल्याने नागरिकांना पाणी पुरवठा तर होतच नाही मात्र खोदकामा ठिकाणी तळे साचले आहेत. या पाईपलाईन तात्काळ जोडून नागरिकांना पाणीपुरवठा पूर्ववत व्हावा यासाठी वाडा शहर सेवादल कॉंग्रेसच्या वतीने नगरपंचायत कार्यलयात निवेदन दिले आहे. तसेच चालू असलेल्या कामाचे अंदाज पत्र, ठेकेदार, एजन्सीच्या नावाचा फलक लावणे व अंदाजपत्रका प्रमाणे व योग्य रितीने काम करुन घेण्या बाबतही निवेदनात म्हंटले आहे. निवेदन देताना वाडा शहर सेवादलचे अध्यक्ष संदिप कराळे, जेष्ठ नेते संजय भानुशाली, पालघर जिल्हा कॉंग्रेस कमिटीचे चिटणीस अनंता वनगा व राजू दिंडे उपस्थित होते.

# सोलापुरात चोरट्याकडून चार लाखांच्या सात मोटरसायकली जप्त

**सोलापूर/इरप्पा बोरीकरजगी**

सोलापूर शहरातील सदर बझार पोलिसांनी एका चोरट्यास अटक केली असून त्याच्याकडून सुमारे चार लाखांचा सात मोटरसायकली हस्तगत करण्यात आलेले आहेत. चंद्रकांत विष्णू गंतेल्लू (३२) असे अटक करण्यात आलेल्या संशयित आरोपीचे नाव आहे. सोलापूर शहरात मोटरसायकल चोरीचे प्रमाण वाढले होते चोरीचे हे गुन्हे उघडकीस आणण्याचे आदेश वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनी दिले होते. त्यानुसार पथकाने फिर्यादी अमरीश प्रकाश पुजारी यांची चोरीस गेलेली दुचाकी (एमएच १३ सीएफ ५५७९) एक इसम घेऊन जात असताना त्यास कुमार चौक येथे पकडले. त्याच्या ताब्यातील मोटरसायकलसह पोलीस ठाण्यात आणून चौकशी केली असता त्याने आणखी सहा मोटारसायकली शहरातून चोरून रेवणसिद्धेश्वर मंदिर परिसरातील झुडपात लपवून ठेवल्याचे सांगितले. तेथून आणखी सहा दुचाकी जप्त करण्यात आल्या. टीव्हीएस कंपनीची ज्युपिटर



स्कूटर (चेसी नंबर एमडी ६२६ इजी ४० एचआयसी ४७३८९), हिरो एचएफ डीलक्स मोटारसायकल चेसी नंबर (एमबीएलएच आर २३९ जे एच एफ १३३५९). हिरो होंडा कंपनीची स्प्लेंडर प्लस मोटारसायकल चेसी नंबर (एमबीएलएच १० झेड एचएल ७३११०), हिरो होंडा स्प्लेंडर प्लस मोटरसायकल चेसी नंबर (०६ के १६ सी २३३८१), हिरो होंडा स्प्लेडर प्लस मोटारसायकल (एमएच १३ आर १४७८ अशी नंबर) चेसी नंबर (एमबीएलएच १० ई १९ एचएफ ०२९६९) लाल सिल्वर पट्ट्याची नंबर प्लेट नसलेली चेसी नंबर व इंजिन नंबर खोडलेली एचएफडीलक्स मोटारसायकल ताब्यात घेण्यात आली आहेत. ही सदरची कारवाई सदर बझार पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक अश्विनी भोसले, पोपटराव धायतोंडे यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक संजय क्षिरसागर, पोलीस अंमलदार औदुंबर आटोळे, इसाक नदाफ, सागर सरतापे, किरण जाधव, सैपन सय्यद, राम भिंगारे, विठ्ठल काळजे यांनी केली आहे.

# राज्यातील 'सेतू सुविधा केंद्र' पुन्हा सुरू होणार

**लातूर/प्रतिनिधी**

राज्यातील तहसील कार्यालयातील 'सेतू सुविधा केंद्र' हे टेंडरची मुदत संपल्याने बंद झाले आहेत. त्यामुळे नागरिकांना इतर ठिकाणी हेलपाटे मारावे लागत आहेत. त्यांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे. याची दखल घेऊन आमदार श्री. धिरज विलासराव देशमुख यांनी राज्यातील 'सेतू सुविधा केंद्र' तातडीने पूर्ववत करा, अशी मागणी अर्थसंकल्पीय अधिवेशनात लावून धरली. त्यानंतर सामान्य प्रशासन विभागाचे राज्यमंत्री दत्तात्रेय भरणे यांनी 'सेतू सुविधा केंद्र' पूर्ववत करण्याबाबत लवकरात लवकर टेंडर प्रक्रिया सुरू केली जाईल, असे आश्वासन दिले. अर्थसंकल्पीय अधिवेशनात आमदार धिरज देशमुख यांनी लातूरसह राज्याच्या वेगवेगळ्या भागात बंद असलेल्या सेतू सुविधा केंद्राकडे लक्ष वेधले.

या केंद्राच्या माध्यमातून एका छताखाली मिळणाऱ्या सर्व सुविधा बंद झाल्याने ग्रामीण भागातील नागरिकांना प्रमाणपत्रांसाठी आता इतर ठिकाणी चकरा माराव्या लागत आहेत. अधिकचे पैसे मोजावे लागत आहेत. अशा विविध अडचणीला जनतेला सामोरे जावे लागत आहे. त्यामुळे 'सेतू सुविधा केंद्र' तातडीने सुरू करा, अशी मागणी आमदार धिरज देशमुख यांनी केली. तहसील कार्यालय हे ग्रामीण भागातील नागरिकांसाठी एक महत्वाचे केंद्र आहे. तिथे आल्यानंतर सेतू सुविधा केंद्राच्या माध्यमातून नागरिकांना विविध प्रमाणपत्रांबाबत ज्या सुविधा मिळत होत्या, त्या सेवा टेंडरची मुदत संपल्याने २१ डिसेंबरपासून बंद आहेत.

त्यामुळे होणारी गैरसोय राज्य सरकारने विचारात घ्यायला हवी आणि नव्याने टेंडर काढायला हवे, असे आमदार धिरज देशमुख यांनी सांगितले. त्यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नासंदर्भात उत्तर देताना सामान्य प्रशासन विभागाचे राज्यमंत्री मा. दत्तात्रेय भरणे यांनी 'सेतू सुविधा केंद्र' पूर्ववत करण्याबाबत लवकरात लवकर टेंडर प्रक्रिया सुरू केली जाईल, असे आश्वासन दिले.

क्राईम Reporter
क्राईम संध्या साप्ताहिक आता लवकरच पश्चिम महाराष्ट्रातील सातारा, सांगली, कोल्हापुर प्रत्येक सोमवारी वाचकांसाठी लवकरच आपल्या शहरातील पेपर स्टॉलवर उपलब्ध होईल.
9 8 9 0 7 1 8 8 7 3

# सरकार आणि विरोधी पक्षाला एसटी कामगारांचा पुळका का?

राज्याचे अर्थसंकल्पीय अधिवेशन संपले. पण त्यात राज्याच्या किती प्रश्नांवर चर्चा झाली आणि त्याचा राज्यातील जनतेला किती फायदा होणार आहे हा संशोधनाचा विषय आहे. या अधिवेशनात सरकारने विलिनीकरण बाबत त्यांची भूमिका स्पष्टपणे मांडली आणि विलीनीकरण होणार नाही हे स्पष्ट केले. पण मग संपकऱ्यांना ३१ मार्चपर्यंत मुदत देण्याची काय गरज होती. हा संप बेकायदेशीर असतानाही सरकारने संपकरी कर्मचाऱ्यांना पगारवाढ दिली. त्यांना अनेक वेळा कामावर परतण्याचे आवाहन केले. पण तरीही ते ऐकत नसतील तर त्या सर्वांना नोकरीची गरज नाही असे समजून बडतर्फ करणे हाच एक शेवटचा पर्याय! मात्र सरकारला आणि विरोधी पक्षाला संपकऱ्यांचा पुळका येतोय म्हणजे बिचारे ग्रामीण भागातले प्रवासी मरत आहेत त्यांच्याशी सरकार आणि विरोधी पक्षाला काहीच घेणेदेणे नाही. फक्त एटी कामगारांवर अन्याय होतोय हेच त्यांना दिसतंय, मग प्रवाशांना वाली कोण? आता निवडणुकीत या सगळ्याचा सरकार आणि विरोधी पक्षाला जाब द्यावाच लागेल. हा देश जर डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या संविधानाने चालतोय, तर मग न्यायालयाच्या निर्णयाची अंमलबजावणी का केली जात नाही. लोकांचे का हाल केले जात आहे. एसटी कामगारांचा संप हा बेकायदेशीर आहे हे औद्योगिक न्यायालयाने या पूर्वीच जाहीर केले आहे. तर उच्च न्यायालयाच्या आदेशाने नेमलेल्या त्रि सदस्यीय समितीने त्यांच्या अहवालात विलीनीकरण शक्य नाही असे स्पष्टपणे सांगून टाकले आहे. तरी सुद्धा सरकार एसटी कामगारांवर कठोर कारवाई का करीत नाही. आज ९२ हजार एसटी कामगारांच्या संपामुळे ४ कोटी प्रवाशांचे हाल सुरू आहेत. काल एक विद्यार्थिनी एटीने प्रवास करताना पाय घसरल्याने खाजगी जीप मधून खाली पडून मेली तिच्या मृत्यूला जबाबदार कोण? औद्योगिक क्षेत्राशी किंवा कामगार चळवळीशी ज्याचा काडीचाही संबंध नाही. असा एक माथेफिरू माणूस गरीब एसटी कामगारांना भडकवत आहे आणि सरकार गप्प आहे. विरोधी पक्ष संपकऱ्यांच्या पाठीशी उभा राहतोय हे सर्व भयंकर आहे. त्यामुळे याच अधिवेशनात सरकारने निर्णायक पण ठाम भूमिका घ्यावी आणि हा बेकायदेशीर संप साम दाम दंड भेद अशा कुठल्याही पद्धतीने चिरडून टाकावा. जर एसटी कामगारांना त्यांचं बर वाईट कशात आहे ते कळत नसेल तर त्यांच्या बाल हट्टासाठी साडेबारा कोटी जनतेचे प्रतिनिधित्व करणारे सरकार किती काळ झुकणार आहे. एसटी कामगारांच्या बेकायदेशीर संपात आज ग्रामीण भागातील जनतेचे जे नुकसान होत आहे त्याची जबाबदारी एकट्या सरकारवर नाही, तर चुकीच्या पद्धतीने बेकायदेशीर सुरू असलेल्या संनपकऱ्यांची बाजू घेणारा विरोधी पक्षही तितकाच जबाबदार आहे. आज शाळा सुरू झाल्या आहे. दहावीच्या परीक्षा सुरू आहेत. परीक्षा केंद्रावर परीक्षेला जाणाऱ्या मुलांचे हाल होत आहेत. काल एक मुलगी मेली उद्या खाजगी वाहनातून गुरेढोरे प्रमाणे चिरडून प्रवास करणाऱ्या आणखी काही मुलांच्या जीवाला धोका होईल. मग त्याची जबाबदारी विरोधी पक्ष घेणार आहे का? या ग्रामीण भागातील चार कोटी प्रवाशांच्या बद्दल फडणवीस यांची काहीच जबाबदारी नाही का? इतर प्रश्नांमध्ये राजकारण करता ठीक आहे. पण आज ग्रामीण जनतेच्या अस्तित्वाच्या प्रश्नांवर सुद्धा राजकारण करताना सत्ताधारी आणि विरोधी पक्षाला जरा सुद्धा लाज लज्जा कशी नाही. एरव्ही संविधानाने देश चालायला हवा अशी बोंब मारणाऱ्या राजकारण्यांनी गेल्या चार महिन्यांपासून सुरू असलेल्या बेकायदेशीर एसटी संपला पाठिंबा कसा काय देत आहेत. तेंव्हा त्यांना कायदा आणि संविधानाचा विसर कसकाय पडतोय? सध्या विधी मंडळाचे अर्थसंकल्पिय अधिवेशन सुरू आहे. त्यामुळे याच अधिवेशनात एटी कामगारांच्या बेकायदेशीर संपाचा सोक्षमोक्ष लावणे गरजेचे आहे. सरकारने त्रिपक्षीय समितीचा अहवाल स्वीकारला आहे. त्याला राज्य मंत्रिमंडळाची मंजुरी सुद्धा मिळाली आहे. मग आता सरकार कशाची वाट बघतेय? या महाराष्ट्रात लाखो बेरोजगार आहेत. त्यात मोठ्या संख्येने ड्रायव्हर सुद्धा आहेत. त्यामुळे तत्काळ नवी भरती सुरू करावी आणि एसटी सेवा पूर्ववत करून ग्रामीण जनतेचे हाल थांबवावेत.

# ‘पॉश’ कायदा नेमका काय आहे?

## दिशायन




‘मी टू’ चळवळीने जगातील अनेक देशांप्रमाणेच भारतातीलही विविध क्षेत्रांना ढवळून काढले. त्यावेळी विशाखा मार्गदर्शक सूचना आणि २०१३ मधील कामाच्या ठिकाणी महिलांचा लैंगिक छळ (प्रतिबंध, मनाई आणि तक्रार निवारण) कायदा (‘पॉश’ कायदा) अंमलबजावणीचा प्रश्न चर्चेत आला. आता पुन्हा एकदा केरळ आणि मुंबई उच्च न्यायालयांच्या आदेशांमुळे या कायद्याच्या अंमलबजावणीचा मुद्दा चर्चिला जात आहे. केरळ उच्च न्यायालयाने गुरुवारी (१७ मार्च) चित्रपट उद्योगाशी संबंधित संघटनांना २०१३ साली लागू झालेल्या कामाच्या ठिकाणी महिलांचा लैंगिक छळ (प्रतिबंध आणि निवारण) कायद्याच्या अनुषंगाने अशी प्रकरणे हाताळण्यासाठी एक संयुक्त समिती स्थापन करण्याबाबत सांगितले. त्याचवेळी चित्रपट निर्मिती कंपन्यांनीही लैंगिक छळविरोधी कायद्याचे पालन केले पाहिजे, असेही न्यायालयाने प्रामुख्याने स्पष्ट केले.

### अखेर १६ वर्षांनी कायदा अस्तित्त्वात आला

कामाच्या ठिकाणी होणाऱ्या लैंगिक छळाची व्याख्या, तक्रार मार्गदर्शन, चौकशीची प्रक्रिया आणि कारवाईची व्याख्या या कायद्यात स्पष्ट करण्यात आली आहे. बालविवाह रोखणाऱ्या सामाजिक कार्यकर्त्या भंवरीदेवी यांच्यावरील सामूहिक बलात्कार खटल्याच्या निमित्ताने विशाखा मार्गदर्शक सूचना अमलात आल्या. तसेच या प्रकरणामुळे कामाच्या ठिकाणी महिलांच्या लैंगिक शोषणाच्या प्रश्नाकडे देशात पहिल्यांदाच समस्या म्हणून पाहिले गेले. परंतु तरीही अधिक गांभीर्याने या मुद्याकडे पाहण्याची गरज होती. त्यामुळेच १९९७ साली सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या विशाखा मार्गदर्शक सूचनांनंतरही कामाच्या ठिकाणी होणारा लैंगिक छळ व शोषणाविरुद्ध स्वतंत्र कायदा होण्यास १६ वर्षांचा काळ जावा लागला. भारतात २०१३ साली असा कायदा अखेर अस्तित्वात आला.

### कायद्याच्या चौकटीत कोण?

या कायद्यात कार्यालयात काम करणाऱ्या महिलांचा समावेश आहेच, त्याचवेळी कचरा वेचक, घरकाम करणाऱ्या असंघटित क्षेत्रातील महिलांचाही समावेश आहे. असंघटित क्षेत्रात काम करणाऱ्या महिला कार्यालयात काम करत नसल्या तरी त्यांचेही काम करण्याचे ठराविक व फिरते क्षेत्र असते. शिवाय कामातून अर्थार्जन करून आपले व कुटुंबाचे पालनपोषण करण्याचा त्यांचा हक्क या कायद्यात संरक्षित करण्यात आला आहे.

### कायद्याचा उद्देश

हा कायदा महिलांना त्यांच्या कार्यक्षेत्रातील निकोप स्पर्धेत जिंकण्यास मदत व्हावी म्हणून नाही, तर महिलांना अशा निकोप स्पर्धेत भाग घेण्यास केवळ त्यांचे महिला असणे आड येऊ नये यासाठी आहे.

### कार्यालये-आस्थापनांना हे करणे बंधनकारक

महिला कर्मचाऱ्यांना सुरक्षित वातावरण उपलब्ध करून देण्याची जबाबदारी नोकरी देणारी कंपनी व मालकांची आहे. प्रत्येक कार्यालयात किंवा आस्थापनेत अंतर्गत तक्रार निवारण समिती स्थापन करणे कायद्याने बंधनकारक आहे. समितीच्या अध्यक्षपदी कार्यालयातील वरिष्ठ महिला नियुक्त केली जावी. समितीत कर्मचाऱ्यांपैकी दोन जण, तर एक व्यक्ती महिलाविषयक सामाजिक संस्थेशी निगडित असलेली तटस्थ सदस्य असावी. समितीत किमान निम्म्या महिला सदस्य असाव्यात. कंपनीच्या प्रत्येक शाखेकरता स्वतंत्र समिती असावी. असंघटित क्षेत्रासाठी शासनाने जिल्हा पातळीवर तक्रार समिती नेमायची आहे.

### लैंगिक छळ म्हणजे काय?

महिला आणि बाल विकास मंत्रालयाने कामाच्या ठिकाणी महिलांच्या लैंगिक छळावर एक पुस्तिका प्रकाशित केली आहे. त्यात कामाच्या ठिकाणी लैंगिक छळ होण्याची तपशीलवार उदाहरणे देण्यात आली आहेत. शरीरसुखाची मागणी पूर्ण केल्यास कामाच्या ठिकाणी खास वागणूक देण्याचे प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे वचन देणे, शरीरसुखाची मागणी पूर्ण न केल्यास कामात वाईट वागणूक देण्याची प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष धमकी देणे, शरीरसुखाची मागणी पूर्ण न केल्यास सध्याची वा भविष्यातील कामाच्या संधी नाकारण्याची प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष धमकी देणे, पीडितेच्या कामात ढवळाढवळ करणे, तिला भीतीदायक, असह्य, तणावपूर्ण वाटेल किंवा तिच्याविरोधी वातावरण कार्यालयात निर्माण करणे, तिच्या आरोग्यावर किंवा सुरक्षिततेवर परिणाम होईल अशी अपमानकारक वागणूक देणे; कृती, वागणूक, लघुसंदेश, समाज माध्यमांद्वारे किंवा हावभावांच्या माध्यमातून प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे छळ झाला असल्यास तोही कायद्यानुसार गुन्हा आहे.

### तक्रार कशी करायची?

पीडित महिलेने गुन्हा घडल्याच्या तारखेपासून तीन महिन्यांत अंतर्गत तक्रार समितीकडे तक्रार करावी. गुन्हे सातत्याने घडत असतील, तर शेवटचा गुन्हा घडल्याच्या तारखेपासून तीन महिने मोजले जातील. काही अपरिहार्य कारणांमुळे पीडितेस तीन महिन्यांत तक्रार नोंदवणे शक्य झाले नाही, तर समितीस विनंती करून तक्रार करण्यास तीन महिन्यांची मुदतवाढ मागून घेता येते. तक्रारदार महिला काही कारणाने स्वतः तक्रार दाखल करू शकत नसेल, तर तिच्या लेखी संमतीने तिच्या वतीने तिचे वारस, नातेवाईक तक्रार दाखल करू शकतात.

### चौकशीची प्रक्रिया

तक्रार दाखल करताना त्यात गुन्ह्याची स्पष्ट माहिती द्यावी. तक्रारदाराचे तसेच ज्याच्याविरुद्ध तक्रार आहे त्याचे नाव, पत्ता, पद याचा स्पष्ट उल्लेख असावा. तक्रार लेखी असावी व तिच्या किमान सहा प्रती पुराव्यांसह दाखल कराव्यात. तक्रार आल्यावर समितीने सर्वप्रथम सामोपचाराने तक्रार मिटवण्यासाठी प्रयत्न करणे बंधनकारक आहे. सामोपचाराचे प्रयत्न करण्यास पीडितेची परवानगी असणे आवश्यक आहे. सामोपचारास पीडितेची परवानगी नसल्यास चौकशी करणे समितीवर बंधनकारक आहे. सामोपचाराने तक्रार मिटल्यास कुणासही कुठल्याही प्रकारे शिक्षा वा नुकसानभरपाई देता येत नाही. तक्रार आल्यापासून सात दिवसांत तक्रारीची एक प्रत प्रतिवादीस दिली जावी. तक्रारीची प्रत मिळाल्यापासून दहा दिवसांत प्रतिवादीने पुराव्यांसह लेखी उत्तर देणे अपेक्षित आहे. त्यानंतर समिती रीतसर चौकशी करून निर्णय देईल. तीन सलग तारखांना तक्रारदार वा प्रतिवादी गैरहजर राहिल्यास एकतर्फी निर्णय देण्याचे समितीला अधिकार आहेत. समितीच्या प्रत्येक बैठकीस अध्यक्ष धरून किमान तीन सदस्य उपस्थित राहणे आवश्यक आहे.

### चौकशीनंतर काय?

चौकशी पूर्ण झाल्यावर समिती सेवाशर्तींमधे दिल्यानुसार शिक्षेची शिफारस करू शकते. त्यानंतर साठ दिवसांत अंमलबजावणी होणे अपेक्षित आहे. तक्रारदार-प्रतिवादींपैकी कुणाला समितीचा अहवाल मान्य नसल्यास ९० दिवसांत सेवानियमांनुसार लवादाकडे किंवा न्यायालयात अपील करता येईल.

### पीडितेस नुकसानभरपाईचीही तरतूद

या कायद्याने पीडितेस नुकसानभरपाईचीही तरतूद करण्यात आली आहे. पीडितेस झालेला त्रास, इजा, मानसिक व भावनिक छळ, लैंगिक छळाच्या घटनेमुळे कामाची गेलेली संधी, शारीरिक वा मानसिक वैद्यकीय उपचारासाठी पीडितेस झालेला खर्च याआधारे नुकसानभरपाई दिली जाऊ शकते. त्यासाठी प्रतिवादीचे उत्पन्न व आर्थिक क्षमता विचारात घेऊन नुकसानभरपाई एकरकमी किंवा मासिक देण्याची तरतूद आहे.

### खोट्या तक्रारीसाठीही शिक्षेची तरतूद

खोटी तक्रार केल्यास सेवा नियमांनुसार समिती कंपनीला तक्रारदार महिलेवर किंवा तक्रार केलेल्या व्यक्तीविरुद्ध कारवाई करण्याची शिफारस करू शकते. असे असले तरी अयोग्य तक्रार आणि अपुऱ्या पुराव्यांच्या कारणास्तव कारवाई केली जाऊ नये, असेही कायद्यात स्पष्ट करण्यात आले आहे.

# लैंगिक शिक्षण आणि समोपदेशन कीट

## संध्या स्ट्रोक

सोनू जाधव




माणसाने काळानुसार बदलायला हवे. मात्र हा बदल घडवताना त्या बदलाला अनुरूप अशी समाजाची मानसिकता सुद्धा बदलणे गरजेचे आहे. पण स्वातंत्र्याला ७० वर्ष उलटून गेली तरी सुद्धा काही गोष्टीत अजूनही सामाजिक बदल झालेला दिसत नाही. परिणामी समाज अजूनही जुनाट आणि बुरसटलेल्या रूढी परंपरा आणि पाप पुण्याच्या डबक्यात घुटमळत आहे. लैंगीक सुरक्षा, लैंगीक सावधानता आणि स्वच्छता याबाबत पौगंड अवस्थेत मुलांना शिक्षण मिळायला हवे. कारण आपले शरीर आणि शारीरिक अवयव याबद्दल माहिती असणे आवश्यक आहे. कारण त्या अवयवांची निगा आणि सुरक्षा जर व्यवस्थित राखता आली नाही. तर त्या अवयवांचा आपल्याला योग्य वापर करता येणार नाही. म्हणूनच हात पाय डोळे तोंड नाक कान आणि अन्य शारीरिक अवयवांच्या बद्दल ज्या प्रमाणे आपण बोलतो, आपल्या अडचणी सांगतो, त्याच प्रमाणे लिंग याबद्दल कुणी फारशी माहिती आणि चर्चा करीत नाही. कारण लिंग या अवयवाला पाप पुण्य रीतीरीवाज, मर्यादा, संकोच या गोष्टींशी जोडण्यात आले आहे. त्यामुळे मूत्र विसर्जन आणि संतती निर्मिती एवढीच या अवयव विषयी आपणास माहिती आहे. पण भविष्यात त्यातून अनेक अडचणी आणि गैरसमज निर्माण होऊन माणसाचे सांसारिक जीवन उद्ध्वस्त होऊ शकते. म्हणूनच लैंगिक शिक्षण आवश्यक आहे. खास करून ग्रामीण भागातील महिलांसाठी हे लैंगिक शिक्षण खूपच महत्वाचे आहे. कारण लैंगिक शिक्षण नसल्यामुळे ग्रामीण भागातील महिला चुकीच्या गोष्टींना बळी पडत आहे आणि हे सर्व ऐवढ्यासाठी सांगायचे आहे की केंद्र आणि राज्य सरकारने मिळून कुटुंब नियोजनाचा जो एक कार्यक्रम हाती घेतला आहे त्या अंतर्गत ग्रामीण भागातील महिलांचे कुटुंबनियोजन बाबत समोपदेशन केले जाते आहे. त्यासाठी एक समोपदेशन कीट देण्यात येणार आहे. त्या कीटमध्ये रबरी लिंगाचा समावेश आहे आणि त्यावरून मोठे वादळ उठलं आहे. आता याबाबत दोन्ही बाजूने विचार करायचा झाल्यास सरकारने ग्रामीण भागातील सामाजिक स्थितीचा आढावा घेऊनच या समोपदेशन कीटमध्ये कोणत्या वस्तू ठेवाव्यात याचा निर्णय घ्यायला हवा होता. तसे पाहता प्रत्येक राजकीय पक्षांकडे मोठ्या संख्येने महिला कार्यकर्त्या आहेत आणि त्यांचा वापर फक्त आंदोलनासाठी केला जातो. याच महिला कार्यकर्त्यांवर जर ग्रामीण भागातील महिलांच्या लैंगिक शिक्षणाची जबाबदारी सोपवली असती. उदरणार्थ एका गावसाठी चार महिला आणि त्यांच्या सोबत एक महिला डॉक्टर असे एक पथक तयार करून जर या पथकाच्या माध्यमातून प्रत्येक गावातील घराघरात जाऊन महिलांमध्ये लैंगिक शिक्षणाचा प्रसार केला असता आणि या मोहिमेला आरोग्य विषयक सुरक्षेची जोड दिली असती, तर ग्रामीण भागातील महिला असोत किंवा अंगणवाडी सेविका यांच्यातील संकोच कमी झाला असता आणि त्यानंतर समोपदेशन कीटमध्ये रबरी लिंग ठेऊन त्याच्याशी संबंधित कुटुंब नियोजन पद्धतीची माहिती देण्याची प्रक्रिया सुरू केली असती, तर अशा गोष्टींना फारसा विरोध झाला नसता कुटुंब नियोजन समोपदेशन कीटमध्ये रबरी लिंगाचा समावेश असणे गैर नाही. तो लैंगिक शिक्षणाचाच एक भाग आहे. पण या मोहिमेच्या पूर्वी जर जनजागृती केली असती किंवा ही मोहीम ज्या अंगणवाडी सेविकांवर सोपवण्यात आली आहे. त्यांच्या मनातील संकोच दूर करण्यासाठी त्यांचे अगोदर समुपदेशन केले असते तर ही मोहीम त्यांनी निःसंकोचपणे राबवली असती. पण सरकारने तसे न करता या मोहिमेच्या माध्यमातून सरळ सरळ ग्रामीण भागातील शालीन सामाजिक व्यवस्थेलाच धक्का लावलाय. त्यामुळे रबरी लिंगाच्या बाबतीत वाद निर्माण झालाय. मुंबई सारख्या महानगरात सुशिक्षित महिलांमध्ये लैंगिक साक्षरता मोठ्या प्रमाणावर आहे. ज्यात लैंगिक स्वच्छता, सुरक्षित लैंगिक संबंध याबाबत शहरी महिला जागरूक आहेत. त्यामुळे त्यांच्यासाठी असे कृत्रिम अवयव आणि त्याची माहिती ही काही नवीन बाब नाही. उलट काही उच्च शिक्षित आणि एकाकी राहणाऱ्या महिला कृत्रिम साधने वापरतात. पण ग्रामीण भागात तसे नाही तिथे आजही देव धर्म रूढी परंपरा पाप पुण्य या सगळ्या गोष्टींना खूप महत्वाचे स्थान आहे. त्यामुळे लैंगिक बाब ही त्यांच्यासाठी मोठी संकोचीत असते. म्हणूनच जन्मदात्या आईलाही आपल्या मुलीसमोर असल्या गोष्टी बोलणे किंवा तिला याबाबत सामोपचाराच्या दोन गोष्टी सांगणे संकोचीतपणाचे वाटत असते. त्यामुळे जिथे असल्या विषयावर आई आणि मुलीचा किंवा मोठ्या अनुभवी विवाहित बहीण आणि लहान बहिणीचा या विषयावर संवाद होत नाही अशा सामाजिक माहोलमध्ये जर सरकार रबरी लिंगाचा समोपदेशन कीटमध्ये समाविष्ट करणार असेल तर ग्रामीण भागातील महिला ते कसे स्वीकारतील. आणि नेमका याच गोष्टीचा सरकारने विचार केला नाही. त्यामुळेच सरकारची एक चांगली योजना वादाच्या भोवऱ्यात सापडली आहे. कारण लैंगिक शिक्षण ही काळाची गरज आहे. आजच्या प्रत्येक मुलीला आणि महिलांनाही लैंगिक शिक्षण मिळायला हवे. लैंगिक शिक्षण म्हणजे व्यभिचार किंवा पाप आहे अशी जी महिलांमध्ये चुकीची समजूत आहे ती त्यांच्या डोक्यातून काढून टाकण्याची गरज आहे. पण आमच्या राजकीय पक्षांना तेवढा वेळही नाही आणि तेवढी सामाजिक परिपक्वता सुधा नाही आणि हेच या देशातील महिलांचे दुर्दैव आहे.

**मोबा.नं. ७०२१४७६१५३**

# खंडित केलेल्या शेतकऱ्यांचा विद्युत पुरवठा त्वरित सुरू करा; स्वाभिमानी शेतकरी संघटनेची मागणी



**औसा/प्रतिनिधी**

औसा तालुक्यातील जावळी येथील विद्युत पुरवठा खंडित केलेल्या शेतकऱ्यांचा विद्युत पुरवठा त्वरित चालू करा, तसेच महावितरणे सुचना न देता विज कनेक्शन तोडू नये या मागणीसाठी दिनांक २६ मार्च शनीवार रोजी मा.उपकार्यकारी अभियंता उपविभागीय कार्यालय किल्लारी, तसेच सहायक अभियंता शाखा कार्यालय लामजना येथे स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या वतीने निवेदन सादर केले आहे. या निवेदनाचे सविस्तर वृत्त असे मौजे जावळी लामजना सप्लायर्स डेपो वरुन महावितरणे शेतकऱ्यांना कोणतीही सूचना न देता दि.१० डिसेंबर २०२१ रोजी विज कनेक्शन तोडले आहे. परंतु अद्याप पर्यत कनेक्शन जोडण्यात आलेले नाहीत. त्यामुळे शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान झालेले आहे. जवळ जवळ ४ महिने शेतकऱ्यांचा विद्युत मोटारी बंद असल्यामुळे शेतकऱ्यांची आर्थिक परिस्थिती खालावली आहे,व शेतकऱ्यांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत आहे.तरी विद्युत पुरवठा खंडित केलेल्या शेतकऱ्यांचा विद्युत पुरवठा त्वरित चालू करण्यात यावा. अन्यथा स्वाभिमानी शेतकरी संघटना उग्र स्वरूपाचे आंदोलन करेल, याची सर्वस्वी जबाबदारी महावितरण राहील.असा इशारा स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष गणेश देवीदास माडजे यांनी दिला आहे. यावेळी स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे रामेश्वर शेषेराव मुळे, सालार महेबुब पटेल, ज्ञानेश्वर बाबुराव चिल्ले, यशवंत ग्यानदेव भोसले, नारायण लक्ष्मण मुळे यांची उपस्थिती होती.

हे साप्ताहिक वृत्तपत्र मालक, मुद्रक व संपादक **धनराज (लक्ष्मणराव) शंकरराव पाटोळे** यांनी एस.आर. पब्लिकेशन, मोहन अर्जुन कंम्पाऊंड, शॉप नंबर ८,९,१० घरटनपाडा, वैशालीनगर बस स्टॉप, दहिसर पुर्व, मुंबई-६८ महाराष्ट्र येथे छापून नव निशीगंधा अपार्टमेंट, मनवेलपाडा रोड, विरार (पूर्व), ता.वसई, जि.पालघर येथून काशित केले. आरएनआय नं. एमएएचएमएआर २०१२/४५५५२. न्यायकक्षा (वसई), वसई कार्यालय, साईद्वारा अपार्टमेंट, शॉप नं.४, विशालनगर, अंबाडी रोड, माणिकपूर पोलिस स्टेशन जवळ, ता.वसई (पश्चिम), जि. पालघर. फोन नंबर ०२५०-२३४५९५९, मोब.: ९८९०७१८८७३, **कार्यकारी संपादक : गणेश मार्तंड चव्हाण,** सहसंपादक (मराठवाडा): राम पाटोळे, कायदेशीर सल्लागार : ॲड.अनिल सांडभोर. न्यायकक्षा-वसई. E-mail : crimesandhyavasai@gmail.com, whatsapp No. 9890718873 Website: www.crimesandhya.com

# गांधी रिसर्च फाऊंडेशनतर्फे व्हॉलींटीयरांना संधी

## गांधी रिसर्च फाऊंडेशन जगभरातून स्वयंसेवकांना केले आमंत्रित

**जळगाव/प्रतिनिधी**

महात्मा गांधीजींच्या सत्य, अहिंसा, शांततापूर्ण सहजीवन आणि सहकारातून चैतन्य यासह विविध विषयांद्वारे गांधी रिसर्च फाऊंडेशनतर्फे गांधी विचाराचा प्रचार-प्रसार केला जात आहे. स्वातंत्र्य संग्रामासह महात्मा गांधीजींच्या जीवनावर आधारित गांधी तीर्थ येथील खोज गांधीजी की हे जागतिक दर्जाचे म्युझियम आहे. या ठिकाणी अनेक अभ्यासक आणि पर्यटकांनी भेट दिली असून गांधी विचार पोहचविण्याचे कार्य सुरूच आहे. गांधी रिसर्च फाऊंडेशनतर्फे शांती, अहिंसा, न्यायपूर्ण विश्व निर्माण करण्यासाठी संपूर्ण जगातील व्हॉलींटीयरांना त्यांना सेवाकार्य करण्याची संधी देत आहे. यातून महात्मा गांधी व विनोबा भावे यांच्या सेवाभावनेच्या विचारांना चालना मिळेल.

सहभागी होण्यासाठी नोंदणी प्रक्रिया सुरू झाली आहे. जागतिक पातळीवर शांततामय आणि वास्तववाला धरून बदल घडविण्यासाठी प्रयत्न करणाऱ्यांसाठी आणि शांतता, न्याय, सुबत्ता आणि श्रमप्रतिष्ठा जपून काम करणाऱ्या व्हॉलींटीयरांसाठी ही उत्तम संधी आहे.

समाजसेवेतून परिवर्तन घडविणाऱ्यांचे स्वप्न पाहणाऱ्यांसाठी गांधी रिसर्च फाऊंडेशन एक संधी देत आहे. या संधीचा लाभ घेतल्यानंतर गांधी रिसर्च फाऊंडेशनच्या समाजोपयोगी प्रकल्पांमध्ये सहभागी होता येईल. यात वाचनालय आणि अभिलेखागार, शैक्षणिक, संशोधन आणि रचनात्मक कार्य यामध्ये सामाजिक विकास, पाणलोट व्यवस्थापन, ग्रामीण आरोग्य कल्याण योजना, आरोग्य आणि ग्रामीण उद्योजकता यासह विविध क्षेत्रातून महात्मा गांधीजींना अपेक्षित असणारी ग्रामस्वराज्य ही संकल्पना साकारता येईल. या सामाजिक कार्यासाठी गांधी रिसर्च फाऊंडेशन जगभरातून स्वयंसेवकांना आमंत्रित करित आहे. यासाठी https://forms.gle/DWTbLiBy3N8Vvg8Y6 लिंकवर नोंदणी करता येईल. अधिक माहितीसाठी http://www.gandhifoundation.net या अधिकृत संकेतस्थळावर भेट देता येईल. व्हॉलींटियरसाठी कालावधी एक ते तीन महिन्यांचा राहिल. स्वयंसेवकांचे वय १८ ते ७० या दरम्यान असावे. स्वयंसेवकांनी काम पुर्ण केल्यावर त्यांना प्रशिस्तपत्र देण्यात येईल. व्हॉलींटियरांची राहण्याची आणि भोजनाची व्यवस्था गांधी रिसर्च फाऊंडेशन करेल. विदेशी व्हॉलींटियरांनी प्रवास खर्च व व्हिसा अर्ज करण्यासाठीचा खर्च स्वत: करावयाचा आहे.

# बोरामणी दरोड्यातील ६ आंतरजिल्हा दरोडेखोरांना सोलापूर स्थानिक गुन्हे शाखेने केले जेरबंद

**सोलापूर/इरप्पा बोरीकरजगी**



सोलापूर जिल्ह्यातील दक्षिण सोलापूर तालुक्यातील बोरामणी येथील दरोडा व हत्या प्रकरणी ६ दरोडेखोरांना सोलापूर स्थानिक गुन्हे शाखेने अटक केली असून दोघे जण अद्याप फरार आहेत, अशी माहिती सोलापूर ग्रामीण पोलीस अधीक्षक तेजस्वी सातपुते यांनी रविवारी झालेल्या पत्रकार परिषदेत दिली आहे. वैभव उर्फ भोरड्या एकनाथ काळे, वाहन चालक संतोष झोडगे, अजय देवगण उर्फ देवगण सपा शिंदे सुनील उर्फ गुल्या सभा शिंदे, ज्ञानेश्वर लिंगू काळे, विकास नागेश भोसले अशी अटक करण्यात आलेल्या ६ जणांची नावे आहेत, तर अक्षय काळे, अनुज उर्फ भैया नागनाथ भोसले हे दोघे अद्याप फरार आहेत. फिर्यादी सुलोचना बाबुराव हिरजे व त्यांचे पती बाबुराव सोमनाथ हिरजे, मुलगा सोमनाथ हिरजे यांच्यासह बोरामणी येथील हिरजे वस्तीत राहत होते. ९ मार्च २०२२ रोजी पहाटे २ वाजण्याच्या सुमारास अनोळखी सहा ते सात इसमाने त्यांच्या घरी सशस्त्र दरोडा टाकून ७५ हजार रुपयांचे सोन्याचे दागिने व रोख रक्कम असा मुद्देमाल लुटून नेला होता. या दरोड्याच्या वेळी दरोडेखोरांनी केलेल्या मारहाणीत बाबुराव यांचा मृत्यू झाला होता तत्पूर्वी दर्गनहळ्ळी शिवारात शरणाप्पा पाटील यांच्या वस्तीवर चोरट्यांनी दरोडा टाकण्याचा प्रयत्न केला. परंतु पाटील कुटुंब व परिसरातील लोक जागे झाल्याने दरोडेखोर तेथून हिरजे वस्तीवर आले होते व तेथे सशस्त्र दरोडा टाकला होता. या घटनास्थळाला कोल्हापूर परिक्षेत्राचे विशेष पोलीस महानिरीक्षक मनोज लोहिया, पोलीस अधीक्षक तेजस्वी सातपुते यांनी भेट दिली होती. हा गुन्हा अत्यंत संवेदनशील व ज्येष्ठ नागरिकांच्या हत्या झाल्याने ग्रामीण पोलिसांनी सहा पथके तपास करीत होती. पोलिसांनी सुरुवातीला नागरिकांनी सांगितलेल्या वर्णनावरून दरोडेखोरांची रेखाचित्रे काढली. त्याचप्रमाणे अशा प्रकारच्या गुन्हा करणाऱ्या रेकॉर्डवरील गुन्हेगारांची माहिती काढली त्यानुसार तपास पथकांना सदरचा गुन्हा उस्मानाबाद व अहमदनगर जिल्ह्यातील आरोपीने केला असल्याची गोपनीय माहिती मिळाली. त्या अनुषंगाने (जवळा ता. जामखेड) येथून एक आरोपी व वाडवान (ता.बीड) येथून मुख्य आरोपीला ताब्यात घेतले त्यांची सखोल चौकशी केल्यानंतर त्यांनी इतर साथीदार समवेत गुन्हा केला असल्याची कबुली दिली तपास पथकाने लोणी काळभोर जिल्हा पुणे येथून दोन आरोपी व जामखेड येथून एका आरोपीस ताब्यात घेतले. त्याचप्रमाणे डोकेवाडी ता भूम येथून एक आरोपी व गुन्हा करताना वापरलेली कार जप्त करण्यात आली आहे. अटक केलेल्या सहा आरोपींपैकी चालक वगळता अन्य आरोपींची गुन्हेगारी पार्श्वभूमी असून त्यांच्यावर दरोडा, घरफोडी, चोरी यासारखे गुन्हे उस्मानाबाद जिल्ह्यातील पोलीस ठाण्यात दाखल आहेत. या पत्रकार परिषदेस सोलापूर ग्रामीण पोलीस अधीक्षक तेजस्वी सातपुते, अप्पर पोलीस अधिक्षक हिंमत जाधव, सोलापूर उपविभागीय पोलीस अधिकारी अमोल भारती, स्थानिक गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुहास जगताप, सोलापूर तालुका पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक अरुण फुगे व सर्व स्थानिक गुन्हे शाखेचे व सायबरचे पोलीस अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

# तहसीलदार सुरेश घोळवे यांनी लेकरासारखी सांभाळलेली अनेक वृक्ष क्षणार्धात भस्मसात!

**देवणी/शकिल मनियार**



वृक्ष वल्ली आम्हा सोयरे वनचरे, हा संदेश देत देवणीचे तहसीलदार सुरेश घोळवे यांनी विविध कार्यक्रमाच्या माध्यमातून तालुक्यातील सर्वच लोकांना वृक्षाचे महत्त्व पटवून देऊन वृक्षाविषयी जनजागृती करून वृक्ष लागवडीची मोठी चळवळ उभी केली. शासनाच्या शतकोटी वृक्ष लागवडीच्या उद्दिष्ट पूर्तीत मोठे योगदान दिले. या चळवळीचा एक भाग म्हणून विविध कार्यक्रमाच्या माध्यमातून देवणी तहसील परिसरात हजारो फळ फुल या सारखी विविध प्रकारचे झाडे लावून आपल्या लेकरा सारखी वाढविली यावर कोणाची वक्र नजर पडली का? बाजूच्या शेतकरी यांनी आपल्या शेतात कशाला तरी आग लावली असावी ती आग दि १३ मार्च २०२२ वार रविवार दुपारी दोन तीनच्या सुमारास आडोसा भिंत मधील वाळलेल्या गवताश पेट घेतली रविवारी सुट्टी असल्या कारणाने कार्यालयात कोणीही कर्मचारी नसल्याने त्या आगीने एवढे रुद्ररूप धारण केले. तहसीलदार सुरेश जी घोळवे यांनी मुलाबाळांसारखी वाढवलेली हजारो झाडे क्षणार्धात नाहीसे झाले. तीन वर्षात तहसील कार्यालयात फुलविलेलं नंदनवन क्षणात उजाड झालं तहसीलदार सुरेश घोळवे यांनी घेतलेले परिश्रम मातीमोल झाले. सोमवारी कार्यालयात आल्याबरोबर आगीमुळे उजाड दृश्य पाहून तहसीलदार यांचे अश्रू अनावर झाले दिवसातून दोन तीन वेळा काळजी घेणारे वृक्ष मित्र तहसीलदार घोळवे यांचे हे दृश्य पाहून काळीज फाटले त्यांनी दिवसभर अन्न त्याग केला ते बेचैन झाले स्वखर्चातून वृक्षसंवर्धनासाठी व त्यांना पाणी देण्यासाठी हजारो रुपये चे पाईप जळून गेले विविध वृत्तपत्रांच्या माध्यमातून निसर्ग रम्य नंदनवन पाहण्यासाठी देवणी तहसील कार्यालयात या असा संदेश दिला मात्र हे नियतीला मान्य नसावं तहसीलदार सुरेश जी घोळवे व देवणीकराचे दुर्दैव म्हणावं तहसीलदार सुरेश घोळवे यांनी फळा फुलांनी डोलणारे वृक्ष पाहून त्यांच्या चेहऱ्यावरील हास्य आम्ही पाहिलं त्याच हिरमुसलेलेल्या चेहऱ्यानी आगीत जळालेल्या झाडांना पाणी घालतांना पाहिलं. जळालेल्या खोडव्यातून अजुनहि पालवी फुटेल का असं स्वप्न वृक्षमित्र सुरेश घोळवे यांनी अजुन पाहत आहेत.

# पालकमंत्री यांच्या वाढदिवसानिमित्त बोरोळ जिल्हा परिषद शाळेत ३६५ विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप



**देवणी/प्रतिनिधी**

वैद्यकीय मंत्री तथा लातुर जिल्ह्याचे पालकमंत्री अमित देशमुख यांच्या वाढदिवसानिमित्त बोरोळ येथील जिल्हा परिषद शाळेत एकुण ३६५ विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले. शालेय साहित्याचे वाटप कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक गजानन भैय्या भोपणीकर, देवणी तालुका अध्यक्ष ॲड.अजित बेळकोणे, संजय गांधी निराधार योजनेचे अध्यक्ष वैजनाथ लुल्ले कॉंग्रेस सेवा दलाचे प्रदेश सचिव धनराज टेकाळे, माझी उपसरपंच कृष्णा पाटील, दत्ता हुरुनाळे, प्रताप कोयले, लासोना गावचे उपसरपंच अंकुश माने, मु.अ.जी आर राठोड सर, शालेय समितीच्या उपाध्यक्षा सुचिता गरड, पुंडलिक सुर्यवंशी, धोंडीबा मुळखेडे, अनिल तेलगावे, सुनील बिरादार, दयानंद चाफे सह शिक्षक आणि विद्यार्थ्यांची उपस्थित होती. शालेय साहित्य वाटपाचा कार्यक्रम कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक गजानन भोपणीकर यांच्यामार्फत ठेवण्यात आला होता. देवणी तालुका युवक कॉंग्रेसचे अध्यक्ष राहुल बालुरे यांनी तर आभार बालुरे सर यांनी केले.

# महिलासाठी मोफत सिटी बस सेवेचा शुभारंभ



**लातूर/प्रतिनिधी**

महाराष्ट्राचे वैद्यकीय शिक्षण व सांस्कृतिक कार्यमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री ना. अमित विलासराव देशमुख यांच्या संकल्पनेतून लातूर शहर महानगरपालीकेची देशातली पहिली महिलासाठी मोफत सिटी बस सेवा सुरू झाली आहे. या सेवेचा लातूर - हरंगुळ बु. येथे लातूर शहर जिल्हा कॉंग्रेसचे अध्यक्ष ड. किरण जाधव यांच्या व विविध पदाधिकारी यांच्या उपस्थितीत शुभारंभ करण्यात आला आहे. लातूर शहर महानगर पालीकेच्या वतीने लातूरशहरा लगत असलेल्या विविध गावाना नागरी सुविधा मनहानगरपालीका पूरवीत आहे. महाराष्ट्राचे वैद्यकीय शिक्षण व सांस्कृतिक कार्यमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री ना. अमित विलासराव देशमुख यांच्या संकल्पनेतून महिलांसाठी मोफत सिटी बस सेवा सुरू करण्यात आली आहे. ही सेवा लातूर शहरालगतच्या गावानाही दिली जात आहे. हरंगुळ बु. येथील महिलांना लातूर येथे येजा करण्यासाठी ही मोफत सेवा मिळावी यासाठी मोफत सिटी बस सेवा सुरू करण्यात आली आहे. गुरूवार दि. २४ मार्च रोजी हरंगुळ बु. येथे लातूर - हरंगुळ बु. सेवेचा शुभारंभ लातूर शहर जिल्हा कॉंग्रेसचे अध्यक्ष ड. किरण जाधव व जिल्हा नियोजन समितीचे सदस्य व ट्रेंटीवन शुगर कारखान्याचे व्हाईस चेअरमन विजय देशमुख यांच्यासह विविध पदाधिकारी यांच्या उपस्थितीत करण्यात आली आहे. या कार्यक्रमास सुर्यकांत सुडे, चंद्रकांत पाटील, रामचंद्र सुडे, सुर्यकांत पाटील, भिमा झुंजारे, मधूकर खरोसे, हंसराज बिर्ले, महालिंग पाटील आदीसह कॉंग्रेस पक्षाचे पदाधिकारी कार्यकर्ते व हरंगुळ बू. येथील ग्रामस्थ उपस्थित होते.

# राष्ट्रीय आदिमुराई मार्शल आर्ट स्पर्धेसाठी विश्वजीत येणकुरे खेळाडूंची निवड

**देवणी/प्रतिनिधी**



तालुक्यातील बोरोळ येथील विश्वजीत तानाजी येणकुरे यांची चौथ्या राष्ट्रीय आदिमुराई इंडियन मार्शल आर्ट स्पर्धेसाठी करपगाम विश्वविद्यालय, कोयंबतूर, तमिलनाडु येथे २८ ते ३१ मार्च २०२२ कालावधीमध्ये राष्ट्रीय स्पर्धेचे आयोजन करण्यात आले असून या स्पर्धेकरिता महाराष्ट्र टीम मध्ये त्यांची निवड झाली असून हे खेळाडू प्रशिक्षक संतोष तेलंगे, विक्रम गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली प्रशिक्षण घेतले असून पुढे मुख्य प्रशिक्षक के.वाय.पटवेकर यांच्या मार्गदर्शनाखाली प्रशिक्षण घेत आहेत. राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड झाल्याबद्दल प्रा.डॉ.फारूक तांबोळी, ऑल महाराष्ट्र सिलंबम असोसिएशनचे कार्याध्यक्ष पी.वाय.आतार, शिवसेनेचे माजी उपजिल्हाप्रमुख लक्ष्मण पेठकर, महाराष्ट्र राज्य शिक्षक कृती समितीचे उपाध्यक्ष अंगद भोसले, प्रा सुनील पाटील बोरोळकर, प्रा नवनाथ खुळे, प्रताप कोयले, माजी ग्रा.पं.सदस्य प्रा.प्रितम कोंगे, युवराज देवणे सह आदिने अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# महाराष्ट्र समृद्धी महामार्गावरील कोपरगाव तालुक्यातील गावांच्या समस्यांचा राज्यमंत्री संजय बनसोडे यांनी घेतला आढावा

**मुंबई/प्रतिनिधी**

महाराष्ट्र समृद्धी महामार्ग हा शासनाचा महत्वाचा प्रकल्प असून दर्जाच्या दृष्टीने देशातील सर्वोत्तम प्रकल्प ठरणार आहे. या प्रकल्पामुळे कोपरगाव तालुक्यातील गावांमधील रहिवाशांना जाणवणाऱ्या समस्यांचा सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) राज्यमंत्री संजय बनसोडे यांनी मंत्रालयात झालेल्या बैठकीत आढावा घेतला. या समस्या सोडविण्यासाठी महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाच्या अधिकाऱ्यांनी स्थानिक लोकप्रतिनिधी, संबंधित अधिकारी, कंत्राटदार तसेच स्थानिक रहिवाशांसमवेत स्थळ पाहणी करावी आणि समस्यांचे तातडीने निराकरण करावे, असे निर्देश त्यांनी यावेळी दिले. हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे महाराष्ट्र समृद्धी महामार्गाचे नागपूर ते मुंबई पर्यंतचे बांधकाम निरनिराळ्या १६ टप्प्यांमध्ये सुरू आहे. त्यापैकी अहमदनगर जिल्ह्याच्या कार्यक्षेत्रातील टप्प्याअंतर्गत कोपरगाव तालुक्यातील एकूण १० गावांचा या प्रकल्पात समावेश आहे.

या गावातील रहिवाशांच्या अडचणींचा आढावा घेण्यासाठी आयोजित या बैठकीस आमदार आशुतोष काळे, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाचे मुख्य अभियंता एस.के. सुरवसे, अधीक्षक अभियंता व्ही.आर. सातपुते यांच्यासह संबंधित अधिकारी, कंत्राटदार आणि संबंधित गावांतील रहिवासी उपस्थित होते. उपरोक्त कामाच्या कोपरगाव तालुक्यातील टप्प्यात रस्त्यापेक्षा लगतची जमीन खोल असणे, विजेची तार जळून वीज बंद होणे, सर्विस रोड, बैलगाडी रस्ता तयार करणे, आरोग्य उपकेंद्राची इमारत बांधणे अशा विविध समस्यांबाबत संजय बनसोडे यांच्या उपस्थितीत चर्चा करण्यात आली. रहिवाशांना वापरण्याजोगे रस्ते तयार करून देण्याचे निर्देशही त्यांनी दिले.

**महाराष्ट्र शासन**

**जलसंपदा विभाग**

**कोंकण पाटबंधारे विकास महामंडळ, ठाणे, जलसंपदा विभाग, कोंकण प्रदेश, मुंबई, ठाणे पाटबंधारे मंडळ, ठाणे, पालघर पाटबंधारे विभाग, मनोर, ता.जि. पालघर**

सुर्या प्रकल्प वसाहत मनोर, ता.जि. पालघर ४०१ ४०३. दुरध्वनी : +९१ ८००७३३५३७३, ई मेल पत्ता : eepidpalghar@gmail.com

**निविदा सूचना क्रमांक ०३ / सन २०२१-२२**

कार्यकारी अभियंता, पालघर पाटबंधारे विभाग, मनोर, ता.जि. पालघर हे खालील कामांच्या सीलबंद निविदा ब-१ नमुन्यात, फक्त सा.बां. विभाग, महाराष्ट्र शासनाकडील नोंदणीकृत सक्षम कंत्राटदारांकडून मागवित आहेत.

कोऱ्या निविदांचे नमुने कार्यकारी अभियंता, पालघर पाटबंधारे विभाग, मनोर, ता.जि.पालघर यांचे कार्यालयात दि. २४/०३/२०२२ ते दि. ०७/०४/२०२२ या कालावधीत कार्यालयीन कामकाजाच्या वेळेत विकत मिळतील व भरून पाठविलेल्या सीलबंद निविदा कार्यकारी अभियंता, पालघर पाटबंधारे विभाग, मनोर, ता.जि. पालघर ४०१४०३ यांचे कार्यालयात दि. ०८/०४/२०२२ रोजी दुपारी ०३.०० वाजेपर्यंत स्वीकारण्यात येतील, आणि शक्यतो त्याचदिवशी उपस्थित कंत्राटदार/प्रतिनिधी यांचे समक्ष उघडण्यात येतील.

| अ. क्र. | कामाचे नाव | कामाची अंदाजित किंमत (रु. लक्ष) | इसारा रक्कम (रु.) | कोऱ्या निविदा नमुन्याची किंमत (रु.) | कामपूर्ण करण्याचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| १. | धामणी धरण माध्यावरील वक्राकार दरवाजांसाठीच्या पाईप रेलींगची दुरुस्ती/नुतनीकरण करणे व पायऱ्यांजवळ बांधकाम करणे, धामणी धरण कार्यक्षेत्रावरील प्रवेशद्वारे व धामणी मुख्य धरण व कटक बंधारा क्र. २,३ व ४च्या माथ्यावरील संरक्षक भिंतीचे रंगकाम करणे. | ८.४०/- | ८४५०/- | २००० + १८% वस्तू व सेवाकर (GST) = २३६०/- | ०२ महिने |
| २. | सुर्या मोठा प्रकल्प, ता. विक्रमगड, जि. पालघर, धामणी धरणाच्या निरीक्षण सज्ज व तळपायातील सज्जामध्ये तुटफुट झालेले उभे सच्छिद्र पाईप नव्याने बसविणे. | ४.५०/- | ५०००/- | २००० + १८% वस्तू व सेवाकर (GST) = २३६०/- | ०२ महिने |

टिप :

१) कार्यकारी अभियंता, पालघर पाटबंधारे विभाग, मनोर ता.जि. पालघर यांचे कार्यालयात सविस्तर निविदा सूचना पहावयास मिळेल. कार्यकारी अभियंता यांनी लिखित स्वरूपात विनंती केल्यास निविदा सूचना प्रत मिळू शकेल.

२) कोणतीही अथवा सर्व निविदा, कोणतेही कारण न देता नाकारण्याचा अधिकार निम्नस्वक्षारीकार यांनी राखून ठेवला आहे.

३) सदरची निविदासूचना जलसंपदा विभागाच्या http://wrd.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर निविदा या मोड्यूल्समध्ये पहावयास उपलब्ध करून देण्यात येत आहे.

४) कंत्राटदाराने Geo-Tagging हे कार्यक्षेत्रावर भेटीच्या ठिकाणी Drop Box मध्ये टाकणे व लिफाफा क्र. १ मधून सादर करणे अनिवार्य आहे. अन्यथा सदर कंत्राटदाराची निविदा ग्राह्य धरली जाणार नाही. Geo-Taggingचा कालावधी दिनांक २४/०३/२०२२ ते ०१/०४/२०२२.

५) कंत्राटदाराने Geo-Tagging हे लिफाफा क्र. १ मधून सादर करणे अनिवार्य आहे. अन्यथा सदर कंत्राटदाराची निविदा ग्राह्य धरली जाणार नाही.

जा.क्र. पापावि/लेशा-३/८०४/सन २०२२, दि. १९/०३/२०२२

**कार्यकारी अभियंता, पालघर पाटबंधारे विभाग, मनोर ता.जि. पालघर यांचे कार्यालय**

सही/-
(र.भा. पवार)
कार्यकारी अभियंता,
पालघर पाटबंधारे विभाग, मनोर

जिमाका/पालघर/जाहि १३०/१५६/२०२२ दिनांक : २३/०३/२०२२

28 MARCH TO 03 APRIL 2022 - Page 6 (CRIME SANDHYA):Layout 1 26/03/2022 10:53 PM Page 1



पान १ वरून...

## चारित्र्याच्या संशयाने पतीचे डोके ...

परपुरूषाबरोबर संबंध आहेत. तुझे आणि त्याचे लफडे बऱ्याच वर्षापासून चालू आहे तु त्याची रखेल आहेस असले नको ते घाणेरडे आरोप तिच्यावर करीत होता. त्याच्या त्या आरोपांनी ती ही त्याचेवर चिडत होती. माझे कुठे लफडे कोणाबरोबर आहे तर तुम्ही मला का ठेवून घेतले आहे असा उलटा जाब ती त्याला विचारीत होती. तो कामावर गेला की ती दिवसभर घरीच एकटी असल्याने त्याच्या संशयला जागा उरत होती. त्यातच त्याला बाहेरच्या लोकाकडून समजले होते की त्याच्या घराकडे दुपारच्या वेळी कोणी तरी इसम येतो आणि त्याच्या घरचा दरवाजा बंद होतो. आता हा घरचा दरवाजा बंद का होतो आणि त्या बंद दरवाज्या आड त्या दोघांचे काय चालते हे न समजण्या इतपत तो काही वेडा नव्हता. म्हणून त्याने या ही गोष्टीची शहनिशा करून घेण्याचे ठरविले. तो तिच्या पाळतीवर होता पण त्याच्या हाताला काहीच लागत नव्हते. तरी ही तो तिच्यावर संशय घेत होता. पत्नी बाहेर ख्याली स्वभावाने वागत आहे म्हणून तो या कारणातून दारू ही पित होता. दिवस रात्रक्ष दारू पिऊन राहयाचे मनात आले तर कामावर जायचे नाही तर घरी बसून दारूच्या नशेत पत्नीला शिवीगाळ करीत मारहाण करीत राहयचे एवढाच याचा उदयोग बनला होता. काही केल्या त्याच्या मनातून संशयाचा किडा जात नव्हता. त्याचे मन आणि डोके तिच्या विचाराने त्रस्त झाले होते. ती सरळ वागर्त नाही म्हणून याची व्रकार त्याने सासु सासऱ्याकडे ही केलेली होती. त्यांनी मुलगी विद्याला समजावून सांगण्या ऐवजी त्यांनी राहुललाच तु दारू पितोस कामावर जात नाहीस तिच्या पोटाला काय घालतोस अशी उलट विचारणा केली होती. त्यामुळे तो जास्तच सासुरवाडी च्या लोकावर आणि पर्यायाने पत्नी विद्यावर चिडला होता. आता तर त्या दोघातील भांडणे वाढली होती. दररोज रात्री दारू पिऊन यायचे आणि विद्याला शिवीगाळ करीत मारहाण करायचे आणि लोकांना तमाशा दाखवायचे एवढेच त्याचे काम झाले होते. त्यामुळे शेजाऱ्याच्या लोकांना ही त्यात काही नवीन वाटत नव्हते. नवरा बायको दोघे भांडतात आणि एक होतात हे त्यांना चांगले माहित असल्याने त्यांनी त्याच्या भांडणात मध्यस्थी करायचे सोडून दिले होते. पत्नी त्याला काही रंगेहात सापडली नाही. तरी ही तो तिच्या चारित्र्यावर संशय घेत होता. त्याच्या मनाची तर खात्री झाली होती की तिचे बाहेर कुठल्या तरी पुरूषासोबत संबंध आहेत ती त्यालाच शरीर सुख देते आणि आपल्याला अंगाला हात ही लावू देत नाही. म्हणून तर तो तिला भांडणात जा तू तुझ्या यजमानाकडे आणि झोप जा.त्यालाच पाहिजे ते दे मला कशाला जवळ करशील तू असे म्हणत तिच्यावर तोंड सुख घेत होता. त्या दोघांची भांडणे काही केल्या मिटता मिटत नव्हती. त्यातच राहुलचा स्वभाव हा चिडखोर आणि भांडखोर होता.त्याला एखाद्या गोष्टीचा राग लवकर येत होता. तो राग काही शांत होत नसायचा. बुधवार दि.२३ मार्च २०२२ रोजी त्याचे विद्याशी या कारणातून सकाळ पासूनच भांडणे लागली होती. रात्रीपर्यंत ती भांडणे चालूच होती. सकाळ पासून तो दारूच्या नशेतच होता. दारू उतरली की परत जावून पिवून यायचा आणि तिच्याबरोबर भांडण काढून मारहाण करून तिचा जीव तिला नकोसा करून टाकला होता. रात्रीच्या भांडणात ती त्याचा मार खावून गप्प होती परंतु तो काही गप्प बसत नव्हता.तिला अर्वाच्च भाषेत शिव्या देऊन तिच्या माहेरच्या लोकांचा उद्दार तो करीत होता. तुझे लफडे आहे बघ. तु काय मला सुख देत नाहीस तुझी तहान तो भागवत असल्याने तुझी गरज पुर्ण होते आणि मला मात्र उपाशी ठेवतेस काय म्हणत तो तिच्या अंगावर मारायला जात होता. यावेळी ही तिने त्याच्याशी वाद घालीत माझे लफडे आहे बघ. जर तुझ्यात दम असता तर मी काय कोणाचा हात धरत होते म्हणून त्यालाच प्रतिप्रश्न केला होता.तु माझ्यातील दम काढतेस काय म्हणत त्याने रागाने लालबुंद होत तिचा गळा जोरात आवळून धरला. ती बिचारी त्याच्या तावडीतून सुटण्याचा प्रयत्न करीत होती. पण त्याने आपल्या दोन्ही हाताची ताकद लावली असल्याने तिला काहीच हालचाल करता येत नव्हती .तिला त्याने ओरडण्याची ही संधी दिली नाही, ती तडफडत खाली कोसळली तिचा श्वास गुदमरला गेला होता. त्यातच तिचा जागीच मृत्यू झाला. आपल्या पत्नीचा आपल्या हातून खून झाल्याचे लक्षात आल्यावर तो शुध्दीत आला भानावर आल्यावर तो काही वेळ तसाच तिच्या मृतदेहाशेजारी बसून राहिला.काही वेळ विचार केल्यावर त्याने तिच्या मृतदेहाची विल्हेवाट लावण्याचा विचार केला. तिचा मृतदेह त्याने साडीत गुंडाळला आणि बाईकवर ठेवून रात्रीच्या अंधारात बाईकवरून तो मृतदेह त्याने केगत्र बायपास रोडवरील एका निर्जन स्थळी नेवून टाकला. त्या साडीत त्याने तिचे तोंड ही पुर्णपणे झाकलेले होते. आपण केलेला गुन्हा कसा पचवायचा या विचारात तो होता.म्हणून तो सरळ कात्रज पोलीस स्टेशनला गेला. तेथे जावून त्याने आपली पत्नी विद्या राहुल फडतरे (वय २६) ही सकाळपासून बेपत्ता आहे अशी तक्रार दाखल केली. पोलीसांनी त्याच्या तक्रारीवरून त्याची लेखी फिर्यात दाखल करून घेतली आणि त्याला तुझ्या पत्नीचा शोध लागल्यावर तुला कळवितो असे सांगितले. दुसऱ्या दिवशी सकाळी त्याने परत पोलीस स्टेशनला फोन लावून आपली बेपत्ता पत्नी विद्या फडतरे हिचा मृतदेह कात्रज बायपास रोडवर मला आढळून आला असून तिचा कोणी तरी गळा आवळून खून केला आहे असे पोलीसांना सांगितले. त्याने दिलेल्या माहितीवरून पोलीस ही तातडीने घटनास्थळी गेले. घटनास्थळाचा आणि मयताचा पंचनामा केला. पंचनाम्यावेळी पोलीसांना काही गोष्टी घटखत होत्या. मयत विद्याच्या गळ्यावर गळा आवळल्याच्या खुणा दिसत होत्या. पोलीस या घटनेचा तपास करीत असताना त्यांना राहुल फडतरे विषयी वेगळीच माहिती समजली होती. पोलीसांनी मयताचा आणि घटना स्थळाचा पंचनामा करून मृतदेह पुण्याच्या ससुन रुग्णालयात शवविच्छेदनसाठी पाठवून दिला. त्यानंतर पोलीसांनी चौकशीसाठी म्हणून राहुल याला पोलीस स्टेशनला बोलावून घेतले. पोलीसांचा त्याचेवरच संशय जास्त होता. त्याला पोलीस स्टेशनमध्ये आणून त्याच्याकडे त्याची पत्नी विद्या विषयी चौकशी करीत असताना त्याचेवर त्यांनी उलट सुलट प्रश्नाचा भडिमार सुरू केला होता. तो काही त्याना समाधानकारक उत्तरे देत नव्हता अखेरीस पोलीसांनी त्याला बोलते करण्यासाठी म्हणून एक गुगली टाकली. तुला तुझ्या बायकोचा मृतदेह कात्रज बायपास रोडवर पडला असल्याचे कसे काय कळाले? तो मृतदेह तर साडीत गुंडाळून त्याचा चेहरा ही झाकलेला होता. मग तुला तुझी बायको आहे हे कसे काय कळाले? या प्रश्नावर तो काहीच उत्तर देवू शकला नाही.त्यामुळे पोलीसांचा संशय त्याचेवर जास्तच बळावला. अखेर त्याने आपला गुन्हा कबुल करून तो का आणि कशासाठी केला याची माहिती दिली. तो तिच्यावर नेहमी चारित्र्याचा संशय घेवून तिला मारहाण करीत होता. घटनेच्या रात्री ही २३ मार्चला त्या नवरा बायकोत याच कारणातून जोरदार भांडणे झाली होती. त्यात रागाच्यां भरात त्याने तिचा गळा आवळून खून केल्याचे व आपल्यावर कोणाचा संशय येवू नये म्हणून तिचा मृतदेह साडीत गुंडाळून कात्रज बायपास रोडवर नेऊन टाकल्याचे कबुली दिली. मयत विद्याच्या माहेरच्या लोकांनी दिलेल्या तक्रारीनुसार पोलीसांनी विद्या राहुल फडतरे (वय २६) हिचा खून करून पुरावा नष्ट केल्याप्रकरणी तिचा नवरा राहुल ज्ञानोबा फडतरे (वय ३२) याच्या विरोधात भादंवी कलम ३०२,२०१ प्रमाणे गुन्हा नोंद करून त्याला कोर्टासमोर उभे केले असता मा.कोर्टाने त्याला तीन दिवसाची पोलीस कोठडी सुनावली होती. या घटनेचा पुढील तपास कात्रज पोलीस करीत आहेत. संशयाने मनात घर केले की तो संशय काही केल्या मनातून जात नाही खरे तर यात सत्य कधी लपून राहत नाही पण उगाच साप साप म्हणून काठी बडवत राहिल्याने खूनासारखी अघटित अशी घटना घडते हेच या घटनेवरून दिसून येते.

## उसन्या पैशावरून मोठा वाद झाला...

एजन्सीवर कामाला जाण्या-येण्यासाठी तो मोटार सायकलचा वापर करत होता. बोदवड या गावातच शुभमचा मामेभाऊ पवन अशोक माळी हा देखील रहात होता. पवन हा टँकर चालवण्याचे काम करत होता. पवन हा देखील कुठेही पर जिल्ह्यात पर राज्यात माल वाहतुककामी टँकर घेऊन जात असे. अडी अडचणीत नात्याने आतेभाऊ आणि मामेभाऊ असलेले शुभम आणि पवन एकमेकांच्या मदतीला धावून जात असत. एकदा शुभमने मामेभाऊ पवनकडून ४५ हजार रुपये उधार घेतले होते. मात्र आर्थिक अडचणीमुळे शुभम ते पैसे पवन यास वेळेवर परत करु शकत नव्हता. त्यामुळे पवन हा शुभमवर त्रागा करत होता. पैशामुळे आतेभाऊ आणि मामेभाऊ यांच्यातील नातेसंबंध बिघडले होते. पवन हा शुभमसोबत बघून घेण्याची भाषा करत होता. पैशांच्या देवाणघेवाणवरुन दोघातील वाद संपुष्टात येण्याची चिन्हे दिसत नव्हती. २६ जानेवारी २०२२ रोजी मालवाहतुकीसाठी अहमदाबाद येथे आयशर घेऊन जाण्याचे शुभमचे नियोजन झाले होते. त्यामुळे तो दुपारी मोटार सायकलने पहुर येथे ट्रान्सपोर्ट एजन्सीत जाण्यासाठी निघाला. ३१ जानेवारी रोजी तो आपल्या गावी परत येणार होता. अहमदाबाद येथे गेल्यावर शुभमने त्याची आई प्रमिलाबाईला फोन करुन ३१ जानेवारी रोजी परत येणार असल्याचे सांगितले. तसेच मामेभाऊ पवन याने माझ्यासोबत पैशावरुन वाद घातला असून जीवे ठार करण्याची धमकी दिली असल्याचे देखील त्याने आईजवळ कथन केले. आपल्या मुलाकडून मिळालेली माहिती ऐकून प्रमिलाबाई चिंतेत पडली. दरम्यान पवनला देखील गुजरात राज्यातच टँकर घेऊन जाण्याचे काम निघाले. ३१ जानेवारीचा दिवस उजाडला तरी शुभम घरी परत आला नाही. त्यामुळे त्याची आई प्रमिलाबाई जास्तच चिंतेत पडली. तिने त्याला फोन लावला असता तो लागत नव्हता. तिचे शुभमसोबत शेवटचे फोनवर बोलणे झाले तेव्हा पवन याने आपल्यासोबत पैशांवरुन वाद घातल्याचे तिला सांगितले होते. तसेच पवन याने आपल्याला जीवे ठार करण्याची धमकी दिल्याचे देखील सांगितले होते. त्यातच त्याचा फोन लागत नसल्यामुळे प्रमिलाबाई चिंताग्रस्त झाली. काय करावे हे तिला सुचत नव्हते. शुभम तिचा एकुलता एक मुलगा असल्यामुळे तिला त्याची मोठी चिंता लागत असे. जोपर्यत तो घरी येत नसे तिला चैन पडत नसे. तो घरी आला व त्याचा चेहरा पाहिला म्हणजे प्रमिलाबाईचा जीव भांड्यात पडत असे. दरम्यान त्याच दिवशी ३१ जानेवारी रोजी सकाळी साडे नऊ वाजेच्या सुमारास बोदवड रस्त्यावरील कांग नदीच्या पुलाखाली एका तरुणाचा मृतदेह पडून असल्याची माहिती जामनेर पोलिस स्टेशनचे पो.नि. किरण शिंदे यांना समजली. माहिती मिळताच पो.नि. किरण शिंदे यांनी आपल्या सहका-यांसह घटनास्थळ गाठले. जामनेर - बोदवड रस्त्यावरील कांग नदीच्या पुलाखाली एका अनोळखी तरुणाचा मृतदेह पडलेला होता. काही अंतरावर एक पल्सर मोटर सायकल देखील तुटफुट झालेल्या अवस्थेत पडलेली होती. नदीपात्रात ज्या ठिकाणी तरुणाचा मृतदेह पडलेला होता त्याच पुलावर आणि कठड्यावर रक्ताचे डाग देखील पडलेले होते. याचा अर्थ मयत अनोळखी तरुण खाली पडण्यापूर्वीच त्याच्या डोक्याला मार लागलेला होता हे स्पष्ट दिसत होते. खिशातील काही सुटे पैसे पुलावर पडलेले होते. कठडे चार फूट उंच असताना तरुण खाली कसा पडला? असा प्रश्न उपस्थित झाला. याचाच अर्थ मयत तरुण खाली पडण्यापुर्वी त्याची पुलावर कुणासोबत तरी झटापट झाली असावी. मयत तरुणाच्या डोळ्याजवळ, डोक्याला व तोंडाजवळ जखमा झालेल्या होत्या. एकुणच सदर प्रकार संशयास्पद असल्याचे पो.नि. किरण शिंदे यांनी हेरले. फॉरेन्सीक टीम, श्वान पथक आणि स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाला घटनास्थळावर पाचारण करण्यात आले. पोलीस निरीक्षक किरण शिंदे यांनी घटनास्थळावर पडून असलेल्या मोटार सायकलच्या क्रमांकावरुन त्या गाडीमालकाचा शोध घेण्यास सुरुवात केली. दुचाकीचा क्रमांक (एमएच १९ डीएस २६४१) ॲपवर टाकताच ती बोदवड तालुक्यातील वरखेड येथील शंकर ईश्वरसिंग पाटील यांच्या नावावर असल्याचे दिसून आले. शंकर पाटील यांच्या मोबाइल क्रमांकावर संपर्क साधला असता ती दुचाकी शुभम माळी याच्याकडे ३० हजार रुपयात गहाण ठेवली असल्याचे समोर आले. त्यावरुन मयत हा शुभम माळी असल्याचे निष्पन्न झाले. मयत शुभम माळी हा बोदवडच्या दत्त नगरातील रहिवासी असल्याचे अधिक तपासात स्पष्ट झाले. अशा प्रकारे मयताची ओळख पटली. इकडे बोदवड येथे मयत शुभमची आई प्रमिलाबाई आपल्या मुलाच्या विचारात बसून होती. काही वेळाने वार्डातील नगरसेवक देवा खेवलकर यांनी येऊन प्रमिलाबाईची भेट घेतली. तुमच्या मुलाचा अपघात झाला असून तो कांग नदीच्या पुलाजवळ पडून असल्याचा निरोप त्यांनी प्रमिलाबाईला दिला. सदर बातमी समजताच प्रमिलाबाई काही वेळ सुन्न झाली. नातेवाईकांच्या मदतीने प्रमिलाबाईने कसेबसे घटनास्थळ गाठत आपल्या मुलाला पाहताच हंबरडा फोडला. त्यामुळे मयत हा शुभम माळी असल्याचे पुन्हा एकवेळा स्पष्ट झाले. सुरुवातीला या संशयास्पद घटनेप्रकरणी जामनेर पोलिस स्टेशनला ९/२२ या क्रमांकाने सीआरपीसी १७४ नुसार अकस्मात मृत्यूची नोंद घेण्यात आली. शुभमच्या मृत्युचा तपास करत असतांना घटनेच्या वेळी आणि घटनास्थळानजीक बोदवड रस्त्यावरील सीसीटीव्ही फुटेजाची तपासणी करण्यात आली. त्या कालावधीत टँकर चालक पवन अशोक माळी (३५) रा. मनुर रोड स्वामी विवेकानंद नगर बोदवड हा कॅमे-यात कैद झाला होता. शुभमचा अंत्यविधी आणि दशक्रिया विधी आटोपल्यानंतर त्याची आई प्रमिलाबाई यांनी नातेवाईकांसह जामनेर पोलिस स्टेशन गाठले. आपल्या मुलाच्या हत्येप्रकरणी संशयीत आरोपी म्हणून भाचा पवन अशोक माळी याच्याविरुद्ध त्यांनी खूनाचा गुन्हा दाखल केला. प्रमिलाबाई माळी यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार १३ फेब्रुवारी २०२२ रोजी भाग ५ गु.र.न. ७७/२२ भा.द.वि. ३०२ नुसार सदर गुन्हा जामनेर पोलिस स्टेशनला दाखल करण्यात आला. पोलिस अधिक्षक डॉ. प्रविण मुंढे यांच्या मार्गदर्शनाखाली या गुन्ह्याचा समांतर तपास स्थानिक गुन्हे शाखेचे पो.नि. किरणकुमार बकाले यांनी सुरु केला. या तपासकामी पो.नि. किरणकुमार बकाले यांनी पोलीस उप निरीक्षक अमोल देवढे, सहायक फौजदार अशोक महाजन, पोलिस हवालदार सुनिल दामोदरे, लक्ष्मण पाटील, पोलिस नाईक किशोर राठोड, रणजीत जाधव, श्रीकृष्ण देशमुख, पो. कॉ. विनोद पाटील, चालक पो.ना. मुरलीधर बारी, संदिप सावळे, ईश्वर पाटील यांचे एक पथक तयार केले. सलग तेरा दिवसांच्या कालावधीत संशयीत शुभमच्या हालचालींवर खबऱ्यांमार्फत आणि तांत्रिक पद्धतीने बारकाईने लक्ष ठेवण्यात आले. त्याच्यावर संशय असला आणि त्याच्याविरुद्ध ठोस पुरावा अद्याप समोर आलेला नव्हता. त्यामुळे त्याच्या हालचालींवर पुरेपुर लक्ष ठेवले जात होते. अनेकांसोबत गोपनीय चर्चा करुन तसेच खबऱ्यांकडून माहिती घेण्याचे काम पथकाकडून सुरु होते. मयत शुभम आणि संशयीत असलेला त्याचा मामेभाऊ पवन यांच्या संभाषणाचे कॉल डीटेल्स मागवण्यात आले. घटनेच्या एक दिवस अगोदर त्यांच्यात बोलणे झाले होते. प्रत्यक्ष घटनेच्या वेळी पवनचा मोबाईल बंद होता. त्यामुळे त्याच्यावरील पोलिस पथकाचा संशय बळावला होता. संशयीत पवन हा टँकर घेऊन कुठे गेला आहे याचा शोध सुरु होता. त्याच्या ताब्यातील टँकरच्या क्रमांकावरुन ते कुठे आहे याचा शोध घेत असतांना तो अंकलेश्वर येथे असल्याची माहिती तपासात पुढे आली. तो अंकलेश्वर येथून जिल्ह्यात आला असल्याची माहिती मिळताच एलसीबी पथक सजग झाले. पवनच्या मागावर पोलिस पथक असतांना तो भुसावळ येथे असल्याची माहिती पुढे आली. त्यामुळे त्याच्या मागावर असलेले पोलिस पथक त्याचे लोकेशन घेत होते. तो भुसावळ येथून जामनेरच्या दिशेने जाणाऱ्या बसमधे बसल्याची माहिती पथकाला समजली. पथक त्याच्या मागावर होतेच. चोरवड चौफुलीवर बस थांबताच तो बसमधून उतरला. बसमधून उतरल्यानंतर तो बोदवडच्या दिशेने जाणाऱ्या रिक्षात बसला. याचा अर्थ भुसावळाहून वरणगावमार्गे बोदवडला न जाता तो आडमार्गाने रिक्षात बसून बोदवडला जात होता. तो रिक्षात बसताच त्याच्या मागावर असलेल्या स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने त्याला आपल्या ताब्यात घेतले. त्याला चौकशीकामी जळगावला आणले गेले. पोलिसी खाक्या बघताच त्याने आपला गुन्हा कबुल केला. पवनचे ४५ हजार रुपये शुभमकडे घेणे होते. घटनेच्या दिवशी दोघेही गुजरात येथून जामनेरकडे येत होते. बोदवडमार्गे जाताना वाटेत दोघे एकमेकांना भेटले. पैशांच्या उसनवारीतून दोघांमध्ये कडाक्याचा वाद झाला. वादाचे रुपांतर हाणामारीत झाले. पवनने शुभमला मारहाण सुरु केली. त्यानंतर कांग नदीच्या पुलावरुन शुभमला खाली फेकण्यात आले. त्यानंतर पुलाच्या दुसऱ्या बाजुने पवनने शुभमची दुचाकी खाली फेकली. नेमका हाच मुद्दा पोलिस तपासात संशयास्पद आणि महत्त्वाचा ठरला. अपघात झाला असता तर दुचाकी व मृतदेह एकाच जागेवर पडले असते. त्यामुळे पोलिसांनी तर्कशास्त्राचा वापर करत तपास सुरु केला. घटनेच्या एक दिवस आधी दोघांमध्ये मोबाइलवर बोलणे झाले होते. मात्र प्रत्यक्ष घटनेच्या वेळी पवनचा मोबाइल स्विच ऑफ होता. त्यामुळे संशयाला बळकटी मिळाली. १३ फेब्रुवारी २०२२ रोजी संशयीत पवन माळी यास अटक करण्यात आली. त्याला पुढील तपासकामी जामनेर पोलिस स्टेशनच्या ताब्यात देण्यात आले. अंत्यत क्लिष्ट आणि गुंतागुतीचा तपास स्थानिक गुन्हे शाखा आणि जामनेर पोलिस यांच्या संयुक्त परिश्रमातून उघडकीस आला. जामनेर पोलिस स्टेशनचे पो.नि. किरण शिंदे व त्यांचे सहकारी पोलिस उप निरीक्षक किशोर पाटील, पो.हे.कॉ. रमेश कुमावत, सुनिल राठोड, पो.हे.का. श्याम काळे, संदीप पाटील पो.ना, सुनिल माळी , चंद्रकात पाटील, पो.कॉ. तृषार पाटील, निलेश घुगे तसेच स्थानिक गुन्हे शाखेचे पो.नि. किरणकुमार बकाले व त्यांचे सहकारी पोलीस उप निरीक्षक अमोल देवढे, सहायक फौजदार अशोक महाजन, पोलिस हवालदार सुनिल दामोदरे, लक्ष्मण पाटील, पो. ना. किशोर राठोड, पो. ना. रणजीत जाधव, पो.ना. श्रीकृष्ण देशमुख, पो. कॉ. विनोद पाटील, चालक पो. ना. मुरलीधर बारी, संदिप सावळे, ईश्वर पाटील आदींनी या तपासकामी सहभाग घेतला.

## सरला नव्हती सावित्री म्हणूनच पाप झाले...

कुपवाडमधील प्रशांत पवार याच्याबरोबर विवाहबाहय संबंध असल्याची माहिती मिळाली. त्यामुळे तो याकारणातून पत्नीशी सारखा भांडण करू लागला होता. त्यामुळे त्याच्या पत्नीला त्याचा अपाल्या संबंधात अडसर वाटू लागला होता. याच कारणातून तिने आपल्या प्रियकराकरवी सत्यवान याचा खून केला. बुधवार दि.९ मार्च रोजी पहाटे एक वाजण्याच्या सुमारास शिवणगी येथे त्याचा संशयास्पद मृत्यू झाला. त्याचा मृतदेह घरातील पंख्याला लटकविलेल्या स्थितीत आढळून आला होता. मंगळवेढा पोलीसात या घटनेची नोंद झाली होती. पोलीस या घटनेचा तपास करीत असताना या घटनेविषयी पोलीसाना वेगळीच माहिती मिळाली होती. त्यातच सांगली स्थानिक गुन्हे अन्वेषणचे पोलीस गस्त घालत असताना पंढरपूर रोडवरील तांनग पेट्रोल पंपाजवळ तिघे जण संशयीत उभे असल्याची माहिती मिळाली असता पोलीसांनी त्याचेकडे चौकशी केली असता मंगळवेढा शिवनगी येथील खूनाचा उलघडा झाला. सरला हिचे माहेर सांगलीजवळील कुपवाड येथील असून गेल्या सहा सात वर्षापूर्वी शिवनगी येथील सत्यवान कांबळे याच्याबरोबर झाला होता. त्या दोघांचा संसार सुरळीत सुरू असताना सरला हिचा पाय घसरलेला होता.ती एका परपुरूषाच्या संबंधात अडकली होती. प्रशांत पवार असे तिचे नांव होते.तो ही तिच्या माहेरचा म्हणजे कुपवाड येथीलच होता. प्रशांतचे आणि तिचे संबंध हे तिच्या लग्नाअगोदरपासून होते. ती त्याच्या संपर्कात सारखी होती.माहेरला ती सारखी येत जात होती. ती माहेरला आली म्हणजे आठ पंधरा दिवस राहत होती. प्रशांत पवार हा तिला आवडत असल्याने ती नवऱ्याला किंमत देत नव्हती. नवऱ्याच्या माघारी ती त्याच्याबरोबरच गुलछर्रे उडवित होती.प्रशांत देखील विवाहित होता. त्याला देखील बायको मुले होती. पण सरलाच्या प्रेमात तो वेडा झाला होता. त्या दोघांना ही एकमेंकाशिवाय चैन पडत नव्हती. ती माहेरी आली म्हणजे तो तिला घेऊन बाहेर फिरत होता. तिच्याबरोबर मारत होता. त्या दोघांच्या विवाह बाहय संबंधाची चर्चा दोघांच्या नातेवाईकात होत होती. पण ते दोघे कोणालाच घाबरत नव्हते. ही चर्चा सरलाचा नवरा सत्यवान याच्या कानावर आली होती.तो अगोदरच तिच्यावर संशय घेत होता. त्यातच ही माहिती मिळाल्याने तो तिच्यावर जास्तच चिडला होता. तशी सरला ही दिसायला देखणी सुंदर असल्याने तिला आपल्यां सौदर्याचा अभिमान होता. त्यातच ती प्रशांतच्या संबंधात अडकल्याने ती नवऱ्याला काहीच किंमत देत नव्हती. त्यामुळे ज्यावेळी याचा जाब त्याने तिला विचारला त्यावेळी तिने त्याला सरळ सरळ उडवून लावले. माझे त्याचेबरोबर संबंध आहेत तुला काय करायचे ते कर असा बेधडक धमकी त्याला दिली. तिने आपले संबंध मान्य केल्याने तो हतबल झाला होता. तो तिच्याबरोबर या कारणातून सारखा भांडण काढत होता. भांडणात तो तिला त्याचेबरोबरचे संबंध तोडून सांगण्यास सांगत होता. पण ती इतकी चालू आणि हुशार होती की, अलिकडे तर ती सारखे भांडण काढून आपल्या माहेरी जात होती. तिला तेच निमित्त सापडले होते. तिचे नवऱ्याबरोबर फारसे पटत नव्हते. दोघातील कुरबुर इतकी वाढली होती की, ती त्याला त्या कामासाठी जवळ घेत नव्हती. रात्री बेडवरून ती त्याला आपल्यापासून ढकलून देत होती. त्याला तिच्यापासून ते सुख मिळत नसल्याने तो जास्तच वैतागलेला होता. ती सुख प्रशांतला देत असल्याने तिची ती भूक भागत होती. पण तो मात्र तडफडत होता. तिला आपल्या माहेरचा यार जास्त जवळचा वाटत होता.त्याच्यावरच ती आपली जवानी लुटत होती. तो ही तिची कमसीन जवानी ओरबाडून तिच्या पोटाला ही चोटाला ही देत होता. दोघे ही एकमेकांची ती गरज ओळखून एकत्र आल्याने दोघांचे ही भागत होते. इकडे ती सासरी कमी आणि माहेरी जास्त राहत असल्याने त्या दोघा नवरा बायकोची भांडणे वाढली होती. ही भांडणे विकोपाला गेली होती. नवरा आपल्याला प्रशांतच्या कारणातून मारहाण करीत असतो शिवीगाळ करीत घालून पाडून बोलत असतो म्हणून तिला ही आता आपल्या त्या संबंधात नवऱ्याचा अडसर वाटू लागला होता. आपल्याला नवऱ्याचा होणारा त्रास तिने प्रियकर प्रशांत याला सांगितला होता. माझ्या नवऱ्याला संपव आणि माझ्याकडे ये असे तिने त्याला सांगितलेले होते. तिच्या राणीची चटक त्याला लागलेली असल्याने तो ही तिने सांगितलेले काम करायला तयार झाला होता. आता त्या दोघांनी मिळून सत्यवानला संपविण्याचा घाट घातला. त्यासाठी त्यांनी प्लॅन केला. प्रशांतने याकामासाठी आपल्या आणखी दोन मित्रांची मदत्त घेण्याचे ठरविले. कुपवाडमधीलच शाहरूख शेख आणि समडोली येथील अजय घाडगे याच्याशी त्याने या कामासंदर्भात संपर्क साधला. ते दोघे ही त्याचे जवळचे मित्र असल्याने आणि त्यांना प्रशांतचे सरलाबरोबरचे संबंध माहित असल्याने त्यांनी ही सरलाचा नवरा सत्यवान याला संपविणेसाठी मदत करण्याचे वचन दिले.आता त्या सर्वानी मिळून एक प्लॅन केला. सरलाने त्यांना शिवनगी येथील आपल्या घरी बोलविले. मंगळवार दि.८ रोजी प्रशांत शाहरूख आणि अजय हे तिघेजण शिवनगी येथे गेले. ठरल्याप्रमाणे ते तिघे बुधवार रात्री म्हणजे पहाटे १ वाजणेच्या सुमारास सरलाच्या घराकडे गेले.त्यावेळी सत्यवान हा दारूच्या नशेत ढाराढुर झोपला होता. त्याला कशाचीच शुध्द नव्हती. नेमकी हिच संधी साधून प्रशांत, शाहरूख आणि अजय हे त्याच्या घरात शिरले. त्यावेळी ते येण्या अगोदरच सरलाने आपल्या घराचा दरवाजा त्याचेसाठी उघडा ठेवलेला होता. ते आल्यांनतर तिने त्यांना सत्यवान झोपलेल्या खोलीत नेले. सरलाने आणि अजयने सत्यवानचे पाय दाबून धरले तर प्रशांत आणि सरलाने मिळून त्याचा गळा आवळून धरला. ते दोघे त्याचा गळा आवळत असताना त्याला जाग आली तसा तो तडफडत उठण्याचा प्रयत्न करीत असताना त्या चौघांनी त्याला परत दाबून धरले. त्याचा त्या दोघांनी जोरात गळा आवळून धरला रात्रीच्या अंधारात आपल्याला कोण मारत आहेत हे त्याला समजले नाही. ते त्याच्या तावडीतून निसटण्याचा प्रयत्न करीत असताना त्या चौघांनी त्याला मारहाण करीत त्याचा गळा आवळून धरला. त्याची हालचाल मंदावली. तो काही वेळातच निपचिप पडला. तो गार झाल्याचे त्याच्या लक्षात येताच आता त्याचे ठरलेल्यां प्लॅनप्रमाणे त्यांनी त्याचा मृतदेह खोलीतील पंख्याला लटकवून सोडला. जेणे करून त्याने दारूच्या नशेत आत्महत्या केल्याचे वाटावे हा त्याचा प्लॅन होता. सत्यवानचे काम तमाम केल्यावर ते तिघे ही अर्ध्या रात्री तेथून निघाले. आता त्या दोघांना रान मोकळे झाले होते. सत्यवानचे काम तमाम झाल्याने सरला आणि प्रशांत यांना काम करायला मोकळे झाले होते. प्रशांतने त्या रात्री आपल्या काम करून मजा मारली होती दुसऱ्या दिवशी ते शिवनगी सोडून मंगळवेढ्याला आले. तेथे त्या तिघांनी दिवसभर दारू पिली. त्यानंतर ते संध्याकाळच्या सुमारास सांगलीला यायला निघाले. तर इकडे त्या दिवशी दारुच्या नशेत नवऱ्याने पंख्याला गळफास घेऊन आत्महत्या केल्याची बोंब सरलाने ठोकली. सत्यवानच्या नातेवाईकांना ही त्याने दारूच्या नशेत आत्महत्या केल्याचे वाटले होते. कुणी तरी या घटनेची माहिती मंगळवेढा पोलीसाना दिली. पोलीस ही तातडीने घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी घटनेचा पंचनामा करून मृतदेह शवविच्छेदनासाठी सरकारी रुग्णालयात पाठवून दिला. आपण केलेले कृत्य पचले असे त्याना वाटत होते. दुसऱ्या दिवशी पोलीसांना मयताचा शवविच्छेदनाचा रिपोर्ट मिळाला होता. त्यात गळा आवळ्याने श्वास गुदमरून मृत्यू अशी नोंद होती. पोलीसांनी मयत सत्यवानची पत्नी सरलाकडे या घटनेची चौकशी केली असता ती पोलीसांना उडवाउडवीचे उत्तर देत होती. सांगली स्थानिक गुन्हे अन्वेषणचे पोलीस गुरूवार राथी गस्त घालत असताना त्यांना पंढरपूर रोडवरील तांनग फाट्यावर तिघेजण संशयीत उभे असल्याची माहिती मिळाली. पोलीसांनी त्याचेकडे चौकशी केली असता त्याचेविषयी पोलीसांना शंका आली. त्याना चौकशीसाठी सांगली पोलीस स्टेशनला आणून त्याना पोलीसी खाक्या दाखविला असता त्यांनी मंगळवेढाजवळील शिवनगी येथे सत्यवान कांबळे याचा गळा आवळून खून केल्याचे सांगितले. पोलीसांनी त्यांना ताब्यात घेऊन त्यांना मंगळवेढा पोलीसाच्या ताब्यात दिले.

मयत सत्यवान कांबळे याच्या नातेवाईकांनी दिलेल्या फिर्यादीनुसार पोलीसांनी सत्यवान मच्छिंद्र कांबळे याचा गळा आवळून पुरावा नष्ट केल्याप्रकरणी त्याची पत्नी सरला तिचा प्रियकर प्रशांत पवार त्याचे मित्र शाहरूख शेख, अजय घाटगे याचे विरोधात भा.दं.वी. कलम ३०२,२०१ प्रमाणे गुन्हा नोंद करून त्यांना मा.कोर्टासमोर उभे केले असता मा.कोर्टाने त्यांना पाच दिवसाची पोलीस कोठडी सुनावली. पोलीस कोठडी दरम्यान पोलिसांनी त्याचेकडून गुन्हयात वापरलेले दोरी जप्त केली. या घटनेचा पुढील तपास मंगळवेढा पोलीस करीत आहेत. विवाहबाहय संबंधात पत्नी जर भरकटली तर ती कोणाचीच राहत नाही. ती फक्त प्रियकराचाच विचार करते ती त्याचसोबत गुलछर्रे उडवित मजा मारत असते. त्यातून तिला नवरा नकोच असतो. हेच या घटनेवरून दिसून येते.

पान ८ वरून...

## पोद्दार हॉस्पिटलच्या वतीने आयोजित...

आजच्या या अस्थिरोग शिबिराचे उद्घाटन लातूर शहर मनपाचे आयुक्त अमन मित्तल यांच्या हस्ते दीप प्रज्वलन करून करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी राज्य उत्पादन शुल्कचे पोलीस अधीक्षक गणेश बारगजे हे होते. आयएमएच्या अध्यक्षा डॉ.सुरेखा काळ, युवा नेते अभिजीतभैय्या देशमुख यांची यावेळी प्रमुख अतिथी म्हणून उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या प्रारंभी सर्व मान्यवरांच्या हस्ते धन्वंतरी पूजन करण्यात आले. पोद्दार हॉस्पिटलच्या वतीने सर्व मान्यवरांचे डॉ. अशोक पोद्दार, डॉ. इमरान कुरेशी यांनी स्वागत केले. यावेळी आपले विचार व्यक्त करताना आयुक्त अमन मित्तल यांनी डॉ.अशोक पोद्दार यांचे आरोग्य क्षेत्रातील कार्य अत्यंत नेत्रदीपक असून कायम रुग्णसेवेत तत्पर असतात, हे आपण या शिबिराच्या निमित्ताने त्याचा प्रत्यक्ष अनुभवही घेतल्याचे सांगितले. डॉ. सौ. सुरेखा काळे यांनी आपले मनोगत व्यक्त करताना लातुरात आरोग्य शिबिराचा आगळा वेगळा पॅटर्न निर्माण करण्याचे काम डॉ. पोद्दार यांनी केल्याचे सांगितले. युवा नेते अभिजीतभैया देशमुख यांनी यावेळी आपले विचार व्यक्त करताना पोद्दार हॉस्पिटल आणि परिवाराच्या वतीने प्रतिवर्षी अशा प्रकारच्या शिबिराचे आयोजन करण्यात येत असल्याचे सांगितले. देशमुख आणि पोद्दार परिवारातील स्नेहाचे संबंध अशा उपक्रमांमुळे आणखी दृढ होत गेल्याची भावनाही अभिजित देशमुख यांनी व्यक्त केली. डॉ.अशोक पोद्दार यांनी आपले मनोगत व्यक्त करताना मागच्या सलग अकरा वर्षांपासून आपण हा मोफत आरोग्य शिबिराचा उपक्रम राबवत असल्याचे नमूद केले. गोरगरीब व गरजू रुग्णांची सेवा करण्याच्या उद्देशाने आपण असे उपक्रम सातत्याने करीत असल्याचेही डॉ. पोद्दार यांनी सांगितले. यावेळी डॉ. पोद्दार यांनी पालकमंत्री अमित देशमुख यांना वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा दिल्या. या शिबिरात सहभागी झालेल्या रुग्णांची मोफत अस्थिरोग, फिजिओथेरपी, मशीनद्वारे हाडांच्या ठिसूळपणाची तपासणी करण्यात आली. गरजू रुग्णांना रुग्णांना उपलब्धतेनुसार मोफत औषधीही वितरित करण्यात आली. या शिबिरात सहभागी झालेल्या एकूण रुग्णांपैकी २७ रुग्णांची रक्त तपासणी व ५५ रुग्णांची सवलतीच्या दरात डिजिटल एक्सरे काढण्यात आले. ख्यातनाम अस्थिरोग तज्ज्ञ डॉ. अशोक पोद्दार, डॉ. इम्रान कुरेशी, डॉ. तुषार पिंपळे, डॉ. अतुल उरगुंडे या अस्थिरोग तज्ज्ञांनी रुग्णांची तपासणी करून उपचार केले. याप्रसंगी डॉ .चेतन सारडा, डॉ. दरडे, डॉ. संदीप कवठाळे, डॉ. दीपक गुगळे, डॉ. शिवपूज, नगरसेवक कैलास कांबळे, प्रवीण घोटाळे, प्रसाद उदगीरकर, जयेश बजाज, लक्ष्मीकांत कर्वा यांसह अनेक मान्यवर उपस्थित होते. शिबिरात फिजियोथेरपीस्ट डॉ.पल्लवी जाधव, डॉ. रेणूका पंडगे, डॉ. मयुरी शिंदे, निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ. भोसगे, डॉ. आशुतोष काटकळंबकर यांसह पोद्दार हॉस्पिटलच्या स्टाफने आपले योगदान दिले. या शिबिरास रुग्णांचा अत्यंत उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

## वाड्यातील ३ प्राथमिक आरोग्य केंद्रांना ...

कामगार आणि आशा यांनी खूप परिश्रम घेतले. संघटितपणे केलेले काम आणि प्रामाणिक पणे दिलेली आरोग्य सेवा या मुळे हे शक्य झाले असल्याची माहिती प्राथमिक आरोग्य केंद्र कुडूसचे वैद्यकीय अधिकारी डॉ.समाधान पगारे यांनी दिली.

## दोन शातीर चोरट्यांना अटक; आठ ...

अहमदपूर, किल्लारी, उदगीर ग्रामीण, विवेकानंद चौकच्या हद्दीमध्ये घरफोडीचे ०८ गुन्हे केल्याचे कबूल करून ०६ गुन्ह्यात चोरलेला मुद्देमाल हजार केला. नमूद आरोपींना पोलीस स्टेशन विवेकानंद चौक येथे दाखल असलेल्या गुन्हा रजिस्टर क्रमांक १४२/२०२२ कलम ४५४, ४५७,३८० भादंविमध्ये अटक करण्यात आली असून गुन्ह्याचा पुढील तपास पोलीस स्टेशन विवेकानंद चौक चे पोलीस अधिकारी व अंमलदार करीत आहेत. सदरची कामगिरी वरिष्ठांचे मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक गजानन भातलवंडे यांचे मार्गदर्शनात सहाय्यक पोलीस निरीक्षक राहुल बहुरे, सहाय्यक फौजदार संजू भोसले, पोलीस अमलदार राम गवारे, सुधीर कोलसुरे, बंटी गायकवाड, माधव बिलापटे, सिद्धेश्वर जाधव, नाना भोंग सचिन धारेकर, जमीर शेख, नकुल पाटील, केंद्रे यांनी पार पाडली.

## अक्कलकोट गटविकास अधिकारी आणि...

नियम व अटीचे तसेच शासन परिपत्रक याचे उल्लंघन केले आहे. त्यामुळे त्यांच्यावर शासकीय कर्तव्य पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम अन्वये शिस्तभंगाची कारवाई करण्यासाठी ११ एप्रिल २०२२ रोजी जिल्हा परिषद सोलापूर पूनम गेट येथे लोकशाही मार्गाने उपोषणाला बसत आहेत, तरी होणाऱ्या परिणामास आपण व शासन-प्रशासन सर्वस्वी जबाबदार राहील कृपया याची गांभीर्याने नोंद घ्यावी असे आवाहन या निवेदनात अशोक ढोणे यांनी केले आहेत.

## वाडा नागरी सहकारी पतसंस्थेत प्रगती...

नगरपंचायातच्या नगराध्यक्षा गितांजली कोलेकर, उपनगराध्यक्षा नयना चौधरी, जि.प. सदस्य अरुण ठाकरे राष्ट्रवादी नेते वैभव ठाकरे यांनी विजयी उमेदवारांचे स्वागत केले.

28 MARCH TO 03 APRIL 2022 - Page 7 (CRIME SANDHYA):Layout 1 26/03/2022 10:54 PM Page 1



# संपूर्ण उपचाराने क्षयरोग बरा होतो -डॉ.शितल पाटील

**लातूर/प्रतिनिधी**




क्षयरोग हा संसर्गजन्य आजार असून त्याचा प्रसार हवेतून होतो. क्षय रोगाच्या रुग्णांपासून इतरांना या रोगाचा संसर्ग होतो. अपूरा औषधोपचार अथवा उपचाराअभावी क्षय रोग्याचा मृत्यूही होऊ शकतो. मात्र लवकर निदान होऊन क्षय रोगावर वेळेत उपचार घेतल्यास त्याला नियंत्रित करुन संपूर्ण उपचाराने क्षयरोग बरा करता येतो, असे मत छातीविकार तज्ज्ञ डॉ. शितल पाटील यांनी व्यक्त केले. येथील एमआयएमएसआर वैद्यकीय महाविद्यालयातील क्षय आणि छाती विकार विभागाच्या वतीने गुरुवार, दि. २४ मार्च रोजी यशवंतराव चव्हाण ग्रामीण रुग्णालयात आयोजित कार्यक्रमात डॉ. शितल पाटील बोलत होते. या वेळी प्रशासकीय व शैक्षणीक संचालिका डॉ. सरिता मंत्री, छाती विकार तज्ज्ञ डॉ. गणेश नरवाडे, डॉ. शशिकांत कौळाजकर, वैद्यकीय अधिकारी डॉ. ए. एस. जाधव, डॉ. विश्वनाथ पावडशेट्टी यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी पुढे बोलताना डॉ. शितल पाटील म्हणाले की, मायक्रोबॅक्टेरिअम ट्युबरक्यूलॉसिस या अतिसुक्ष्म जंतूमुळे क्षयरोग होतो. एकूण क्षयरोग्यांपैकी ८५ ते ९० टक्के रुग्णांना फुफ्फुसाचा क्षयरोग होतो. फुफ्फुसाचा क्षयरोग झालेल्या व्यक्तीच्या खोकल्यातून शरीरातील जंतू हवेत पसरतात. हे जंतू श्र्वासाद्वारे निरोगी व्यक्तीच्या शरीरात गेल्यास फुफ्फुसाचा क्षयरोग होतो. दोन आठवड्यापेक्षा अधिकचा खोकला, छातीत दुखणे, दम लागणे, ताप येणे, भूक कमी लागणे, वजण कमी होणे, बेडक्यातून रक्त पडणे अशी लक्षणे फुफ्फुसाच्या क्षयरोगात दिसून येतात. फुफ्फुसा व्यतिरिक्त पाठीचा मणका, हाड, मूत्रपिंड, यकृत, मेंदू, लसिका ग्रंथी, गर्भाशय या अवयवांनाही क्षयरोग होऊ शकतो. पाठदुखी, पोटात दुखणे, सांधेदुखी, लसिका ग्रंथीना सूज येणे, डोकेदु:खी, बेशुध्द होणे, वंधत्व अशी संशयीत लक्षणे असलेल्या रुग्णांनी क्षयरोगाची तपासणी करुन घ्यावी. क्षयरोगाचे निदान झाल्यानंतर वैद्यकिय सल्ल्यानुसार संपूर्ण उपचार घ्यावेत. क्षयरोगाचे समुळ उच्चाटन करण्यासाठी शासनाच्या वतीने गेल्या अनेक वर्षापासून विविध योजना राबविल्या जात असून सध्या केंद्र शासनाच्या वतीने राष्ट्रीय क्षयरोग दूरीकरण कार्यक्रम राबविला जात आहे. या योजनेंतर्गत शासकीय व निवडक खाजगी रुग्णालयात क्षय रोगावरील सर्व उपचार मोफत दिले जातात. तसेच क्षयरोग प्रतिबंधासाठी संशयीत अथवा संक्रमीत व्यक्तींनी लवकर निदान व संपूर्ण उपचार घ्यावेत, जन्मता बालकांचे बी. सी. जी. लसीकरण करावे, खोकताना तोंडासमोर रुमाल धरावा, क्षय रोग्याच्या सहवासितांची तपासणी करुन प्रतिबंधात्मक उपचार घ्यावेत. त्याचबरोबर एच.आय.व्ही. बाधित रुग्णांमध्ये क्षयरोगाची बाधा लवकर होऊ शकते. त्यामुळे अशा व्यक्तीने क्षयरोग तपासणी साठी जागरुक राहावे, असे डॉ. पाटील म्हणाले.

यावेळी डॉ. सरिता मंत्री म्हणाल्या की, देशात दर दिवशी पाच हजार लोकांना क्षयरोगाची लागन होत असून दररोज जवळपास एक हजार व्यक्तींचा या आजाराने मृत्यू होत आहे. क्षयरोगामुळे लाखो मुले शिक्षणापासून दूरावत असून या रोगामुळे हजारो स्त्रिया कुटूंबापासून विस्थापीत होत आहेत. क्षयरोग्यापासून कुटूंबातील व समाजातिल निष्पाप लोकांना या रोगाची लागत होत आहे. लोकांतील अज्ञान यास कारणीभूत असून या रोगाला रोखण्यासाठी लोकांनी अधिक जागरुक राहून आजाराची लक्षणे दिसल्यास निदान करुन वेळेत उपचार घ्यावेत. या वेळी जागतिक क्षय रोग दिनानिमीत्त पोस्टर प्रदर्शन घेण्यात आले. या प्रदर्शनात एमआयपी फिजीओथेरपी महाविद्यालय व एमआयएनएस नर्सिंग महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी क्षय रोगाविषयी माहिती असलेले पोस्टर्स सादर केले. या प्रदर्शनात प्रियंका जाधव प्रथम, भाग्यश्री सुर्यवंशी व्दितीय, आकांशा सोनकांबळे तृतीत, तर विलास कांदे व सिध्देश्र्वर हालकुडे यांनी उत्तेजनार्थ चौथा क्रमांक पटकावला. विजेत्यांना मान्यवरांच्या हस्ते प्रशस्तीपत्र व पुष्पगुच्छ देऊन गौरविण्यात आले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. राजशेखर कुदमुड यांनी केले तर आभार डॉ. ए. एस. जाधव यांनी मानले. या कार्यक्रमासाठी डॉ. गणेश नरवाडे, डॉ. ए. एस. जाधव, डॉ. राजशेखर कुदमुड, तंत्रज्ञ सुभदा नाईक, लिपीक सुनिता कराड यांनी पुढाकार घेतला. यावेळी एमआयएमएसआर वैद्यकीय महाविद्यालयातील व यशवंतराव चव्हाण ग्रामीण रुग्णालय, एमआयपी फिजिओथेरपी महाविद्यालय व एमआयएनएस नर्सिंग महाविद्यालयातील डॉक्टर, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

# लातूर आरोग्य खात्यातील नर्सचे ऑनलाईन फसवणुकीत गेलेले पैसे मिळाले परत



**लातूर/करकरे आंबादास**

दिनांक २५ फेब्रुवारी २०२२ रोजी लातुर आरोग्य खात्यात काम करणाऱ्या एका महिला नर्सच्या स्टेट बँक ऑफ इंडियाचा खात्यातून रक्कम ४० हजार रुपयेची फसवणूक झालेली होती. सदर महिलेला एका अनोळखी व्यक्तीने फोन करून त्यांच्या मोबाईल मध्ये स्क्रीन शेअर होणारे एनीडिक्स, टीमविवर अप्लिकेशन डाउनलोड करण्यास सांगितले व त्या प्लिकेशनच्या माध्यमातून आरोपींनी तक्रारदार महिलेच्या मोबाईल मध्ये येणाऱ्या ओटीपी तथा गोपनीय माहितीचा आधार घेत त्यांची चाळीस हजार रुपयांची फसवणूक केली होती. तक्रारदार महिला यांनी तात्काळ सायबर सेल, लातूर येथे संपर्क साधला. पोलीस अधीक्षक निखील पिंगळे, अपर पोलीस अधीक्षक अनुराग जैन यांचे मार्गदर्शनात सायबर सेलचे पोलिस निरीक्षक रामेश्वर तट, सपोनि सुरज गायकवाड, पोलीस अमलदार गणेश साठे, संतोष देवडे, शैलेश सुडे, महिला पोलीस अमलदार अंजली गायकवाड यांनी सदर तक्रारीवर तात्काळ कार्यवाही करीत संबंधीत वॉलेटच्या नोडल अधिकारी यांच्याशी संपर्क साधून सदरचे फ्रॉड ट्रांजेक्शन थांबविले. त्यावरून सदर महिलेचे चाळीस हजार रुपये वाचवण्यामध्ये सायबर सेल लातूर यांना यश मिळाले आहे. सदरची रक्कम संबंधित तक्रारदार महिलाच्या खात्यात जमा झाली आहे. आज रोजी नमूद प्रकरणातील तक्रारदार यांनी पोलीस अधीक्षक कार्यालयात येऊन सायबर सेल प्रभारी अधिकारी पोलीस निरीक्षक रामेश्वर तट यांचे व त्यांच्या टीमचे पुष्पगुच्छ देऊन कृतज्ञता व्यक्त केली. अशा प्रकारच्या सायबर गुन्ह्यांचे प्रमाण दिवसेंदिवस वाढलेले असून नागरिकांनी जागरूक होणे अत्यंत गरजेचे आहे. आपल्या बँक खात्याशी निगडित कोणतीही संवेदनशील माहिती अनोळखी व्यक्तींना देऊ नये असे आवाहन सायबर सेल लातूर यांच्यामार्फत करण्यात आलेले आहे.

## उदगीर तालुक्यात राज्य उत्पादन शुल्क विभागाची होळी व रंगपंचमीला धडक कारवाई

# तब्बल ७२ हजार ७५० रुपयांचा हातभट्टीचे रसायन जप्त



**लातूर/करकरे आंबादास**

उदगीर तालुक्यात विविध ठिकाणी राज्य उत्पादन शुल्क विभागाने धडाकेबाज कारवाई करीत ७२ हजार ७५० रुपयांचे हातभट्टी दारूचे रसायन जप्त करून कारवाई केली आहे. या कारवाईमुळे तालुक्यातील अवैध हातभट्टी विक्री करणाऱ्याचे धाबे दणालेले आहेत. थोडक्यात माहिती अशी की उदगीर तालुक्यातील हकनकवाडी राठोड तांडा येथे दोन ठिकाणी हातभट्टी गळण्याचे १४०० लिटर रसायन एकूण किंमत ३५ हजार ७०० रुपये, डोंगरशेळकी तांडा येथे दोन ठिकाणच्या धाडीत १२०० लिटर हातभट्टीचे रसायन एकूण ३४ हजार ३०० रुपयांचा मुद्देमाल, जप्त करण्यात आला असून आय. टी. आय. कॉलेज जवळ ५५ लिटर गावठी हातभट्टी २ हजार ७५० रुपये असे एकूण ७२ हजार ७५० रुपयाचे हातभट्टीचे रसायन व गावठी दारू जप्त केली आहे. ही कारवाई राज्य उत्पादन शुल्कचे अधीक्षक गणेश बारगजे यांच्या मार्गदर्शनाखाली २० मार्च २०२२ रोजी रविवारी विशेष मोहीम राबविण्यात आली.

या विशेष मोहिमेत निरीक्षक आर. एम. चाटे उदगीर, निरीक्षक राहुल बांगर लातूर, दुय्यम निरीक्षक विजय राठोड, दुय्यम निरीक्षक पाचपोळे, दुय्यम निरीक्षक अमोल शिंदे, दुय्यम निरीक्षक माटेकर, सहाय्यक दुय्यम निरीक्षक गणेश गोळे, अनंत कारभारी, कॉन्स्टेबल श्रीकांत साळुंके, सुरेश काळे, बाजीराव पवार, कॉन्स्टेबल देशपांडे, कॉन्स्टेबल मुंडे, कॉन्स्टेबल गोसावी यांनी होळी धुलीवंदनाच्या पार्श्वभूमीवर मोठया प्रमाणावर गावठी हातभट्टीचे रसायन जप्त करून कारवाई केली.

# मुळेगाव तांडा परिवर्तन पॅटर्न युनोत पाठवा; विशेष पोलीस महानिरीक्षक मनोज लोहिया

**सोलापूर/प्रतिनिधी**



सोलापूर जिल्ह्यातील दक्षिण सोलापूर तालुक्यातील प्रोजेक्ट परिवर्तनाचा मुळेगाव तांडा पॅटर्न युनोमध्ये पाठवण्यात यावा असे आवाहन कोल्हापूर परिक्षेत्राचे विशेष पोलीस महानिरीक्षक मनोज लोहिया यांनी व्यक्त केले. सोमवारी दक्षिण सोलापूर तालुक्यातील मुळेगाव तांडा येथे परिवर्तन उद्योग समूहाचे उद्घाटन विशेष पोलीस महानिरीक्षक मनोज लोहिया यांच्या हस्ते करण्यात आले त्यावेळी ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर सोलापूर ग्रामीण पोलीस अधीक्षक तेजस्वी सातपुते, अप्पर पोलीस अधीक्षक हिंमत जाधव, जिल्हा परिषदेचे मुख्यकार्यकारी अधिकारी दिलीप स्वामी, प्रशिक्षणार्थी पोलीस अधीक्षक सत्यसाई कार्तिक, प्रिसिजन फाउंडेशनच्या अध्यक्षा सुहासिनी शहा यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी मनोज लोहिया म्हणाले महिलांना सन्मानाने जगता यावे यासाठी सोलापूर ग्रामीण पोलीस अधीक्षक तेजस्वी सातपुते यांनी सकारात्मक पावले उचलून पराक्रम घडवला आहे. दारू गाळणाऱ्या हातांना सन्मान जनक उद्योग सुरू करून देऊन समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्याचे काम केले. त्यामुळे मुळेगावात मोठे परिवर्तन घडले आहे. या प्रोजेक्ट फक्त परिवर्तनाचा रिसर्च पेपर प्रसिद्ध करावा. त्यामध्ये या प्रकल्पासाठी कोणी व कशी मदत केली यामध्ये लोक कसे जोडले गेले गावातील लोक सरपंच यांनी यात कसा सहभाग नोंदवला याची संपूर्ण माहिती यामध्ये घ्यावी जगाच्या कानाकोपऱ्यातील अवैद्य व्यवसायाच्या दलदल मध्ये अडकलेल्या सर्वांना यातून बाहेर येण्याचा मार्ग दिसेल असेही लोहिया म्हणाले, यावेळी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी स्वामी म्हणाले मागील आर्थिक वर्षात जिल्ह्यात १६० कोटी रुपयांचे कर्जवाटप केले. यातून बचत गटाचे उत्पादन वाढेल व खऱ्या अर्थाने महिला सक्षमीकरण होईल याचा विचार करण्यात आला. परिवर्तन मोहिमेच्या माध्यमातून मुळेगावच्या आदर्श निर्माण झाला आहे ही एक परिवर्तनाची नांदी आहे. या कार्यक्रमास उप जिल्हाधिकारी मनीषा आव्हाळ, तहसीलदार अमोल कुंभार मोहम्मद आझम, अमित जैन, त्याचप्रमाणे पोलीस उपअधीक्षक सूर्यकांत पाटील, पोलीस उपविभागीय अधिकारी अमोल भारती, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक सुहास जगताप, अरुण फुगे, स्थानिक गुन्हे शाखेचे तत्कालीन निवृत्त पोलीस निरीक्षक सर्जेराव पाटील यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अप्पर पोलीस अधीक्षक हिंमत जाधव यांनी केले, तर आभार मुळेगाव तांडा चे सरपंच विजय राठोड यांनी मानले.

### १८ शिलाई मशीन खरेदी

सोलापूर जिल्हा उद्योग केंद्र व मिटकॉन च्या माध्यमातून मुळेगाव तांडा येथील ४१ महिलांचे प्रशिक्षण जय गारमेंट्स होटगी येथे पूर्ण केल्यानंतर प्रशिक्षित महिलांनी स्वतःच्या गावात स्वतःचा उद्योग उभा करण्याची इच्छा व्यक्त केली होती हाच धागा पकडून पोलीस अधीक्षक तेजस्वी सातपुते यांनी या महिलांना गारमेंट व्यवसाय सुरू करण्यासाठी मुख्यमंत्री रोजगार योजनेच्या माध्यमातून कर्ज उपलब्ध करून दिले त्यातून अत्याधुनिक १८ शिलाई मशीन खरेदी केल्या हॉलची गरज असल्याने बालाजी अमाईन्सच्या माध्यमातून ग्रामपंचायतीच्या मागील पडीक हॉलची दुरुस्ती करून तेथे हा उद्योग व्यवसाय सुरू करण्यात आला आहे.

# अवैध शस्त्र बाळगणाऱ्या इसमास अटक तीन गावठी कट्टे, ११ जिवंत काडतुसे जप्त






**लातूर/प्रतिनिधी**

लातूर जिल्हा पोलीस अधीक्षक निखिल पिंगळे यांनी जिल्ह्यात अवैध शस्त्र बाळगणाऱ्या इसमावर कारवाई करण्याबाबत आदेशित केले होते याच अनुषंगाने पोलीस अधीक्षक निखिल पिंगळे, अप्पर पोलीस अधीक्षक अनुराग जैन सहाय्यक पोलीस अधीक्षक अभयसिंह देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक गजानन भातलवंडे यांच्या नेतृत्वात स्थानिक गुन्हे शाखेचे टीमने लातूर येथील एका इसमास ताब्यात घेऊन तीन गावठी कट्टे ( पिस्टल) सह अकरा जिवंत काडतुसे, दोन एक्स्ट्रा मॅगझीन असा एकूण ०१ लाख ८१ हजार रुपयांचा मुद्देमाल हस्तगत केला आहे. याबाबत सविस्तर माहिती अशी की, स्थानिक गुन्हे शाखा पोलिसांना गुप्त बातमीदार मार्फत मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारावर स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने लातूर शहरातील समीर सत्तार शेख (पांढरे)रा. इंडिया नगर लातूर यास ताब्यात घेऊन त्याच्याकडून एक गावठी पिस्टल आणि नऊ जिवंत राऊंड जप्त केली. त्याच्याकडे पिस्टल आणि राउंड विषयी सखोल चौकशी केली असता. त्याने दिलेल्या माहितीच्या आधारावर स्थानिक गुन्हे शाखा पोलिसांनी अधिक तपास करून आणखीन एका व्यक्तीच्या घरातून दोन गावठी कट्टे पिस्टल, दोन मॅगझीन आणि दोन जिवंत काडतुसे असा एकूण ०१ लाख ८१ हजार रुपयाचा अवैध शस्त्र साठा जप्त केलेला आहे याप्रकरणी पोलिस नायक खुर्रम काझी यांच्या फिर्यादीवरून पोलीस ठाणे एमआयडीसी येथे गुन्हा रजिस्टर नंबर १६१/२०२२ कलम ३(२५) भारतीय हत्यार कायदा अन्वये गुन्हा नोंद झालेला असून एमआयडीसी पोलिस पुढील तपास करीत आहेत सदरची कारवाई ही स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक गजानन भातलवंडे यांचे नेतृत्वात सहाय्यक पोलीस निरीक्षक राहुल बहुरे, पोलीस अंमलदार खुर्रम काझी, विनोद चिलमे, बालाजी जाधव, रवी गोंदकर, दिनेश देवकते, प्रमोद तरडे, अंगद कोतवाड, यशपाल कांबळे, संपत फड, राजेश कंचे, प्रदीप चोपण यांनी केली आहे.

# आदर्शमैत्री फाउंडेशनची मातोश्री वृद्धाश्रमात रंगपंचमी

**लातूर/प्रतिनिधी**



आदर्श मैत्री फाउंडेशनच्या वतीने लातूर येथील मातोश्री वृद्धाश्रम येथे रंगपंचमी साजरी करून येथील पन्नास आजी-आजोबांना आपण समाजापासून वेगळे नाहीयेत. आपल्या कुटुंबातील मुलं- नातवंडा प्रमाणे त्यांच्यासोबत रंगपंचमी साजरी करून त्यांचा आनंद द्विगुणित करण्याचं काम आदर्श मैत्री फाउंडेशन चे अध्यक्ष संतोष बिराजदार व सर्व संचालक मंडळाच्या वतीने करण्यात आले. आपण समाजात राहत असताना प्रत्येक सण उत्सव अगदी आनंदात, थाटात आपल्या कुटुंबियांसमवेत साजरा करत असतो. परंतु समाजातील असे काही घटक असतात ते सण उत्सव यापासून खूप दूर असतात. आशा मातोश्री येतील ५० आजी-आजोबांसोबत आजचा रंगपंचमीचा सण साजरा करून त्यांचा आनंद द्विगुणित करण्याचा प्रयत्न केला. यावेळी तेथील आजी-आजोबांनी आमच्या कुटुंबातील मुलं नातवंड यांच्यासोबतच हा आजचा सण साजरा झाला आम्ही समाजापासून वेगळे नाही येत याची जाणीव आदर्श मैत्री फाऊंडेशनच्या या उपक्रमामुळे झाली असल्याचे मत आजी-आजोबानी व्यक्त करत आज आम्ही खूप आनंदी आहोत असे दिवस आमच्या आयुष्यात वारंवार यावेत असे मत व्यक्त केले. यावेळी आदर्श मंत्री फाउंडेशनचे अध्यक्ष संतोष बिराजदार यांनी सर्व आजी-आजोबांना उपस्थित मित्र परिवाराला रंगपंचमीच्या शुभेच्छा देत आदर्श मैत्री फाउंडेशन चे हे नवनवीन सामाजिक उपक्रम वारंवार चालूच राहतील आम्ही वेळोवेळी सतत आपल्या मध्ये येत राहूत. समाजातील प्रत्येक सण उत्सव -आनंदाचा क्षण आम्ही तुमच्यासोबत साजरा करू, आपण एकटे वाटून घेऊ नये. आदर्श मैत्री परिवार आपलाच परिवार आहे. आम्ही सर्वजण आपलीच लेकर आहोत. असे मत यावेळी बोलताना व्यक्त केले. यावेळी फाऊंडेशनचे संचालक तुकाराम पाटील, शशिकांत पाटील, निलेश राजमाने, दत्ता पाटील, राजेश मित्तल, प्रवीण सूर्यवंशी, अशोक तोगरे, तेजस शेरखाने, संपत जगदाळे, मदन भगत, आकाश जाधव यांनी आजी-आजोबांना रंग लावला व तेवढ्याच आपुलकीने कुटुंबातील नातवं प्रमाणे आम्हा सर्वांनाआजी-आजोबांनी रंग लावला आम्हा सर्वांसोबत गाण्याच्या तालावर थिरकले. यातून आमच्या बालपणीची आठवण आली असही मत यावेळीआजी-आजोबांनी व्यक्त केले.

# वर्तमान स्थितीत गांधी विचारांची अपरिहार्यता-दलुभाऊ जैन

## गांधीतीर्थच्या दशकपूर्ती सोहोळ्यात २४ सहकाऱ्यांचा सन्मान



**जळगाव/प्रतिनिधी**

मानवनिर्मित संकटांना सामोरे जाण्याची क्षमता गांधी विचारांमध्येच आहे. वर्तमान परिस्थितीत गांधी विचारांची अपरिहार्यता असून मोठ्या भाऊंनी दूरदृष्टीने या विचारांचा प्रचार व प्रसार करण्यासाठीच गांधीतीर्थची निर्मिती केली असल्याचे प्रतिपादन गांधी रिसर्च फाऊंडेशनचे संचालक दलूभाऊ जैन यांनी केले. गांधीतीर्थच्या दशकपूर्ती निमित्ताने आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. याप्रसंगी संस्थेच्या सुरुवातीपासून कार्यरत असलेल्या २४ सहकाऱ्यांचा मान्यवरांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. गांधी रिसर्च फाउंडेशनचे संचालक अशोकभाऊ जैन, डॉ. सुदर्शन अय्यंगार, संचालिका ज्योतिभाभी जैन, सल्लागार डॉ. के.बी. पाटील, गांधी संशोधन विभागाच्या अधिष्ठाता डॉ. गीता धर्मपाल व जैन फार्म फ्रेश फुडस् लि. चे संचालक अथांग जैन यांची विशेष उपस्थिती होती.

आपल्या मनोगतात दलूभाऊ पुढे म्हणाले कि, गांधीजींच्या सत्य व अहिंसेचा पुरस्कार करीत व्यवसायातील साधनशुचिता सांभाळत मोठ्या भाऊंनी आपल्या जीवनाचा उत्तरार्ध व्यतीत केला. गांधीतीर्थ म्हणजे माझ्या आयुष्याच्या उत्तरार्धात सामाजिक सद्भावापोटी निर्माण झालेले अक्षरलेणे आहे, असे मोठे भाऊ म्हणत असत. गांधी विचारांचे त्यांचे स्वप्न आज गांधीतीर्थमुळे प्रत्यक्षात साकारलेले आहे. आपण सर्व या संस्थेच्या वाटचालीतील प्रमुख घटक आहात आणि आम्हास त्याचा सार्थ अभिमान आहे. डॉ. के. बी. पाटील यांनी गांधीतीर्थच्या वाटचालीच्या आठवणींना उजाळा दिला व जैन परिवाराच्या कार्यसंस्कृतीमुळेच हे अद्भूत कार्य शक्य झाले असे गौरवोद्गार काढले. अशोकभाऊ जैन यांनी कोरोना पश्चातच्या कालखंडात आपण अधिक जोमाने कार्य करीत मोठ्या भाऊंचे स्वप्न साकारण्यासाठी कटिबद्ध होऊ या असे आवाहन केले. अथांग जैन यांनी समयोचित भाषण केले. प्रमोद जैन, निलेश पाटील, अनिलेश जगदाळे, तुषार बुंदे, विश्वजित पाटील, संतोष भिंताडे, प्रदीप मराठे, डॉ. अश्विन झाला, चंद्रशेखर पाटील, सुधीर पाटील, निवृत्ती वाघ, श्रीराम खलसे, नामदेव धनगर, अमोल भोलाणकर, राजेंद्र माळी, दगडू पाटील, निलेश कोल्हे, सुभाष भंगाळे, अमोल पाटील, सविता महाकाळ, दुर्वास नलगे, सुरेश पाटील, अशोक चौधरी व उदय महाजन या सहकाऱ्यांचा कृतज्ञता सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन गिरीश कुळकर्णी यांनी केले. यावेळी गांधी रिसर्च फाउंडेशनचे सहकारी उपस्थित होते.

### उच्च पातळी व मध्यम प्रकल्पावरील कामगारांचा वाली कोण?

# आपल्या न्याय हक्कासाठी कामगारांचा सोमवारपासून बेमुदत उपोषणाचा इशारा



**लातूर/प्रतिनिधी**

लातूरसह बीड, उस्मानाबाद जिल्ह्यातून वाहणाऱ्या मांजरा, तेरणा नदीवर शासनाने पाटबंधारे खात्यामार्फत बांधलेल्या बॅरेजेस वर गेल्या १० ते १५ वर्षापासून काम करणाऱ्या कामगारांना कसल्याच प्रकारची सुरक्षा, कायदेशीर वेतनहमी याबरोबरच कोणत्याही प्रकारच्या सुविधा मागणी करूनही मिळत नाहीत. संबंधित प्रशासनाचा निषेध करत आम्हाला आमचा न्याय हक्क मिळावा यासाठी कामगारांनी सोमवार २८ मार्चपासून प्राधिकरण कार्यालयासमोर बेमुदत उपोषणाचा इशारा दिला आहे. कामगारांना कामाचे तास ठरवून द्यावे. वेतनपत्रक वाटपाचे रजिस्टरवर स्वाक्षरी घेण्यात याव्यात. कोणत्याही सुरक्षा हमी शिवाय पुराच्या पाण्यात उतरवू नये. कामाप्रमाणे हुद्दा आणि त्यानुसार वेतन देण्यात यावे. इ.पी.एफ. कपात करण्यात यावे. वेतन दरमहा मिळावे. प्रकल्प स्थळावर निवारा, लाईट व इतर सुरक्षेच्या सोयी उपलब्ध करून देण्यात यावे, कामगारांना किमान वेतन नियमानुसार वेतन मिळावे, प्रकल्पाशिवाय वसुली, जमीन मोजणीसारखे इतर कामे कामगारांना लावण्यात येऊ नये, कामगारांना गणवेश, बॅटरी, सुरक्षा बूट आदी साहित्य मिळाले पाहिजे. कामगारांना मिळणाऱ्या वेतनाची नोंद असावी यासह अन्य मागण्या मान्य करण्यात याव्यात, यासाठी कामगार मागील १५ वर्षापासून प्रशासनाकडे विविध लोकशाही मार्गाने मागणी करत आहेत. परंतु याकडे कोणत्याही प्रकारचे लक्ष संबंधित विभाग देत नसल्याने या भूमिकेचा निषेध नोंदवत कामगारांनी लाभ क्षेत्राच्या प्राधिकरण कार्यालयासमोर बेमुदत उपोषणाचा इशारा निवेदनाद्वारे दिला आहे. निवेदनावर महाराष्ट्र राज्य रस्ते व पाटबंधारे कर्मचारी संघटनेचे राज्य सचिव कॉ.राजेंद्र विहिरे, लातूर जिल्हाध्यक्ष सिद्धेश्वर शिंदे, गणेश सोनटक्के, बालाजी बिराजदार, विनोद मोगरगे, देवानंद अडसूळ यांची नावे आहेत.

# पोद्दार हॉस्पिटलच्या वतीने आयोजित अस्थिरोग शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद!




**लातूर/प्रतिनिधी**

लातूर जिल्ह्याचे पालकमंत्री अमित देशमुख यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून येथील सिग्नल कॅम्प परिसरातील पोद्दार हॉस्पिटल अक्सिडेंट अँड ट्रॉमा केअर सेंटर मध्ये आयोजित करण्यात आलेल्या मोफत अस्थिरोग शिबिरास अत्यंत उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. या शिबिरात एकूण १९१ रुग्णांची तपासणी व उपचार करण्यात आल्याचे रुग्णालयाचे संचालक डॉ. अशोक पोद्दार यांनी सांगितले. पोद्दार हॉस्पिटलच्या वतीने प्रतिवर्षी पालकमंत्री अमित देशमुख यांच्या वाढदिवसानिमित्त अशा प्रकारच्या अस्थिरोग शिबिराचे आयोजन करण्यात येते. आरोग्य सेवेत स्वतःला वाहून घेतलेल्या डॉ. अशोक पोद्दार यांच्या हॉस्पिटलच्या माध्यमातून घेण्यात आलेले हे १३१ वे आरोग्य शिबिर आहे. नेहमी कोणत्या ना कोणत्या उपक्रमाचे औचित्य साधून डॉ. पोद्दार अशा प्रकारच्या अस्थिरोग व आरोग्य शिबिराचे आयोजन करून रुग्णसेवेचा आपला हा उपक्रम चालूच ठेवतात. दिवंगत लोकनेते विलासराव देशमुख यांच्या जयंतीदिनाचे औचित्य साधूनही ते दरवर्षी अशाच प्रकारच्या शिबिराचे नियमितपणे आयोजन करण्याकामी पुढाकार घेतात. कोरोनाच्या काळातही डॉ.अशोक पोद्दार व त्यांच्या टिमने रुग्ण तसेच सामान्य नागरिकांसाठी मोफत आरोग्य शिबीर तसेच सॅनिटायझरची सुविधा उपलब्ध करून देऊन कोरोनापासून संरक्षण करण्याकामी अतुलनिय योगदान दिले आहे, हेही सर्वज्ञात आहे. गोरगरीब रुग्णांना आरोग्य सुविधा उपलब्ध करून देण्याकामी डॉ. पोद्दार कायम अग्रेसर असतात. ...पान ६ वर

# वाड्यातील ३ प्राथमिक आरोग्य केंद्रांना जिल्हास्तरीय कायाकल्प पुरस्कार प्रदान!



**वाडा/प्रतिनिधी**

स्वच्छ भारत अभियान अंतर्गत कायाकल्प कार्यक्रमाद्वारे स्वच्छ, सुंदर, सुरक्षित व हरित आरोग्य संस्था आणि त्यांचे बळकटीकरण करून उत्कृष्ठ कार्य केल्याबद्दल सन २०२०-२१ साठी प्राथमिक आरोग्य केंद्र कुडूस, गोऱ्हे व परळी यांना जिल्हास्तरीय उत्तेजनार्थ पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. जिल्हा परिषद पालघरचे जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. दयानंद सुर्यवंशी यांच्या हस्ते हा पुरस्कार प्राथमिक आरोग्य केंद्राचे वैद्यकीय अधिकारी डॉ. समाधान पगारे यांच्याकडे देण्यात आला. राष्ट्रीय आरोग्य अभियाना अंतर्गत गुणवत्ता आश्वासन कायाकल्प कार्यक्रम राबवला जातो. या उपक्रमांतर्गत जी प्राथमिक आरोग्य केंद्र रुग्णालयांची देखभाल, स्वच्छता, जैविक व्यवस्थापन, जंतुसंसर्ग व्यवस्थापन, सपोर्ट सर्व्हिसेस, स्वच्छता प्रसार, रुग्णालया बाहेरील स्वच्छता आदी निकष पूर्ण करतात त्यांना या पुरस्काराने गौरविले जाते. गुणवत्ता आश्वासन कायाकल्प कार्यक्रमासाठी प्राथमिक आरोग्य केंद्रातील सर्व आरोग्य अधिकारी, आरोग्य सेविका, आरोग्य सेवक, शिपाई, सफाई ...पान ६ वर

# दोन शातीर चोरट्यांना अटक; आठ घरफोडीचे गुन्हे उघडकीस




**लातूर/करकरे आंबादास**

लातूर, पोलीस अधीक्षक निखिल पिंगळे यांचे आदेशान्वये अपर पोलीस अधीक्षक अनुराग जैन, उपविभागीय पोलिस अधिकारी लातूर शहर जितेंद्र जगदाळे यांचे मार्गदर्शनात पोलीस निरीक्षक स्थानिक गुन्हे शाखा गजानन भातलवंडे यांचे नेतृत्वात लातूर जिल्ह्यात विविध पोलीस स्टेशनला घडलेले मालाविषयक गुन्हे उघडकीस आणण्याकरिता पोलीस अधिकारी व अंमलदार यांना सूचना व मार्गदर्शन करण्यात आले होते. पोलीस स्टेशनला दाखल असलेल्या चोरीचे गुन्हे उघडकीस आणण्याकरिता विशेष पथके स्थापन करून गुन्हे उघड करण्याचे प्रयत्न सुरू होते. त्या अनुषंगाने माहिती घेत असताना स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाला माहिती मिळाली की, पोलीस ठाणे विवेकानंद चौक येथे दाखल असलेल्या घरफोडीच्या गुन्ह्यातील आरोपी हा त्यांचे राहते घरी येणार आहे. अशी खात्रीशीर बातमी मिळाल्याने सदर पथक तात्काळ औसा तालुक्यातील भादा या ठिकाणी पोचून तेथे सापळा लावला. थोड्याच वेळात त्याचे राहते घरातून संशयित आरोपी नामे आकाश उर्फ बाबूराव कांबळे, वय २१ वर्ष, यास ताब्यात घेऊन विचारपूस केली असता त्याने त्याच्या इतर साथीदारांसह लातूर जिल्ह्यातील विविध पोलिस स्टेशनच्या हद्दीत घरफोडीचे गुन्हे केल्याचे कबूल केले. त्यावरून त्याचे साथीदार नामे माणिक बालाजी नरवटे, वय ३५ वर्ष, राहणार तांबटसांगवी तालुका अहमदपूर येथून ताब्यात घेऊन त्यांनी विविध पोलीस स्टेशनच्या हद्दीत घरफोडी चोरी करून मिळवलेले सोन्याचे दागिने अंदाजे किंमत ०२ लाख ९७ हजार ४०० रुपयांचे दागिने त्यांच्याकडून जप्त करण्यात आले आहेत तसेच त्याचे इतर साथीदारांचा शोध सुरू आहे. नमूद आरोपींनी त्याच्या इतर साथीदारांसह पोलीस ठाणे जळकोट, ...पान ६ वर

# अक्कलकोट गटविकास अधिकारी आणि विस्तार अधिकारी यांची चौकशी करा - अशोक ढोणे

**सोलापूर/इरप्पा बोरीकरजगी**



अक्कलकोट पंचायत समितीचे गटविकास अधिकारी आणि ग्रामपंचायत विभागाचे विस्तार अधिकारी हे लोकसेवक असून त्यांनी कर्तव्यात कसूर करून हेतू पुरस्कार गैरकारभार करण्यात सामील असल्याचे सिद्ध होत असल्याने आणि आपण मागणी केलेली, चौकशी करण्यासाठी टाळाटाळ करीत असल्यामुळे गटविकास अधिकारी व विस्तार अधिकारी पंचायत समिती अक्कलकोट यांच्यावर (शिस्त व अपील) अधिनियमान्वये शिस्तभंगाची कारवाई करण्यात यावी, या मागणीसाठी आपण ११ एप्रिल २०२२ रोजी जिल्हा परिषद सोलापूर पुनम गेट (आंदोलन गेट) समोर उपोषणाला बसणार आहे असे निवेदन अशोक ज्योतिबा ढोणे यांनी सोलापूर जिल्हा परिषदेचे मुख्यकार्यकारी अधिकारी डॉ.दिलीप स्वामी व यांच्या इतर वरिष्ठांना दिले आहे. या निवेदनात त्यांनी म्हटले आहे की, सोलापूर जिल्हा परिषद अंतर्गत अक्कलकोट पंचायत समिती येथे कार्यरत असलेले ग्रामसेवक ए.एम. नेलुरे यांच्या नियुक्तीमुळे घोषित केलेले स्वग्राम वडगाव तालुका दक्षिण सोलापूर असून महाराष्ट्र शासन निर्णय बदलीने नेमणूक देताना बेकायदेशीररित्या बदली केले आहेत. ए.एम.नेलुरे हे सन २०१३ ते २०१८ बोरगाव येथे नेमणुकीस असताना ग्राम निर्मल योजनेअंतर्गत प्रत्येक कुटुंबास शासन निधीतून १००% शौचालय बांधून झाले असे कागदपत्रे दाखवून ग्राम निर्मल गाव हे पारितोषिक घेतले आहेत. प्रत्यक्षात मात्र २०% शौचालये बांधून झाले आहेत. ग्रामसेवक नेल्लुरे हे ज्या ग्रामपंचायतमध्ये कार्यरत होते. तेथील १ ते ३३ विषयाची व शासनाकडून आलेल्या प्रत्येक योजनेसाठी आलेल्या निधीची सर्व योजनेच्या झालेल्या कामकाजाची चौकशी करण्यात यावी. ग्रामसेवक ए.एम. नेलुरे हे शासन सेवेत रुजू होताना त्यांची जंगम व स्थावर मालमत्ता किती होती आता सध्या जंगम व स्थावर मालमत्ता किती आहे, त्यांनी आपल्याकडे मालमत्ता व दायित्व यांची वार्षिक विवरणे सादर केली आहेत का? याची चौकशी करण्यात यावी सखोल चौकशी करून त्यांना तात्काळ निलंबित करण्यात यावे अशी मागणी केली आहे. या मागणीचे निवेदन २२/११/२०२१ रोजी गटविकास अधिकारी पंचायत समिती अक्कलकोट व उप मुख्यकार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद ग्रामपंचायत विभाग सोलापूर यांना दिले आहे. गैरकारभार, गैरव्यवहार, भ्रष्टाचार झाला असल्यामुळेच गटविकास अधिकारी व विस्तार अधिकारी पंचायत समिती अक्कलकोट यांनी संबंधित ग्रामसेवकाची चौकशी करीत नाहीत. त्यांनी आपल्या कर्तव्यात कसूर केले आहेत. संबंधित लोक सेवकांनी कर्तव्यात कसूर करून हेतुपुरस्कर विलंब केला आहे. गटविकास अधिकारी व विस्तार अधिकारी पंचायत समिती अक्कलकोट यांनी शासनाचे ...पान ६ वर

# भातांगळी येथे ३५० रुग्णांची मोफत मौखिक आरोग्य तपासणी




**लातूर/प्रतिनिधी**

येथील एमआयडीएसआर दंत महाविद्यालयातील सार्वजनिक दंत आरोग्य विभाग, राष्ट्रीय सेवा योजना विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक मौखिक आरोग्य दिनानिमित्त लातूर तालुक्यातील भातांगळी येथे मोफत मौखिक आरोग्य तपासणी शिबिर घेण्यात आले. या शिबिरात ३५० रुग्णांची मोफत मौखिक आरोग्य तपासणी करण्यात आली. तसेच मौखिक आरोग्य दिनानिमित्त भातांगळी गावात रॅली काढून जनजागृती करण्यात आली. या आरोग्य शिबिरास एमआयडीएसआर दंत महाविद्यालयातील सार्वजनिक दंत आरोग्य विभाग प्रमुख डॉ. अश्विनी बिरादार, डॉ. भागवत केंद्रे, डॉ. विलास धुमाळ, पं. स. सदस्य पांडूरंग बालवाड, भातांगळीचे सरपंच परमेश्वर पाटील, उप सरपंच मारुती शिंदे, चेअरमन व्यंकटराव जटाळ, लिंबराज बोळंगे, विठ्ठल बोजे, डिगंबर पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती. ग्रामीण भागातील लोकांमध्ये मौखिक आरोग्याविषयी जागृती निर्माण करण्यासाठी मोफत मौखिक आरोग्य तपासणी शिबिर घेण्यात आले. या मौखिक आरोग्य तपासणी शिबिरात दंत रोग तज्ज्ञांकडून रुग्णांची मुख व दंत रोग, मुख कर्करोग, तोंडात उद्भवणारे पांढरे-लाल चट्टे, हिरड्या व त्यासबंधी आजार अशा ३५० रुग्णांची तपासणी करुन आजाराचे योग्य निदान करण्यात आले. दिर्घ आजाराच्या रुग्णांना पुढील उपचारासाठी एमआयडीएसआर दंत महाविद्यालयात पाठविण्यात आले. या दंतरोग शिबिरात डॉ. भागवत केंद्रे, डॉ. विलास धुमाळ, डॉ. महिमा हरियानी, डॉ. स्नेहा होपळे, डॉ. नितीन जाधव, डॉ. शिवानी तडवळकर, डॉ. पवन जाधव, डॉ. प्रियांजली जाधव, डॉ. प्रियंका जाधव यांनी सेवा बजावली. यावेळी बोलताना डॉ. अश्विनी बिरादार म्हणाल्या की, निरोगी मुख हे संपूर्ण शरीर निरोगी राहण्यासाठी मदत करते. निरोगी मुखासाठी दररोज सकाळी, झोपण्यापुर्वी योग्य पध्दतीने दात व हिरड्यांची स्वच्छता करणे आवश्यक आहे. त्यासोबत वर्षातून दोन वेळा दंतरोग तज्ज्ञांकडून तपासणी करुन घ्यावी व मुखरोग उद्भवल्यास त्वरीत उपचार घ्यावेत. तंबाखू व तंबाखुजन्य पदार्थांचे सेवन टाळावे, असे त्यांनी सांगितले. यावेळी डॉ. भागवत केंद्रे यांनी दंत रचना, हिरड्यांचे आरोग्य व त्यावरील विविध उपचार पध्दती या विषयी माहिती दिली. डॉ. पवन जाधव यांनी मौखिक आरोग्य दिना विषयी व दातांचे आरोग्य, दातांचा संच, दंत उपचार पध्दती या बाबत पीपीटीच्या माध्यमातून माहिती दिली. या वेळी मौखिक आरोग्य दिनानिमित्त भातांगळी गावात रॅली काढून मौखिक आरोग्याबाबत जनजागृती करण्यात आली. या रॅलीत एमआयडीएसआर दंत महाविद्यालयातील विद्यार्थी, जिल्हा परिषद भातांगळी येथील शालेय विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. विलास धुमाळ यांनी केले तर आभार उप सरपंच मारोती शिंदे यांनी मानले.

# वाडा नागरी सहकारी पतसंस्थेत प्रगती पॅनलचे सर्व उमेदवार विजयी



**वाडा/प्रतिनिधी**

वाडा नागरी सहकारी पतसंस्थेच्या संचालक मंडळाची निवडणूक रविवार दिनांक २० मार्च रोजी पार पडली. या निवडणूकीत प्रगती पॅनलचे वर्चस्व पुन्हा एकदा दिसून आले आहे. वाडा नगरपचांयतचे विद्यामान नगरसेवक आणि नियोजन व स्वच्छता सभापती रामचंद्र भोईर यांचा जयेश थोरात यांनी ७३१ मताधिक्य मिळवून विजय प्राप्त केल्याने त्यांचे सर्व स्तरातून स्वागत होते आहे. जयेश थोरात यांनी प्रगती पॅनल मधून निवडणूक लढविली होती. प्रगती पॅनलमधील उमेदवार दिलीप म्हात्रे ७०५ मते, डॉ. दिपक आंबवणे ७९८ मते, मिलन पातकर ८६६ मते, किशोर गंधे ८०३ मते, भानुदास भानुशाली ७३९ मते, वैभव ठाकरे ७६८ मते, संदिप पातकर ७९६ मते, संतोष पातकर ८०३ मते, मिळवून निवडून आले आहेत तर मिलिंद वाडेकर, अनिता मनोरे, सिध्दी भाऊ भोपतराव हे बिन विरोध निवडून आले आहेत. भाजपा जेष्ठ नेते बाबाजी काठोळे, हेमंत सवरा सरचिटणीस भाजपा अनुसुचित जमाती महाराष्ट्र प्रदेश भाजपा नेते संदिप पवार, शिवसेना नेते निलेशजी गंधे, तुषार यादव, शिवसेना शहर प्रमुख प्रमोद घोलप, वाडा ...पान ६ वर


## स्वराज्य राज्यव्यापी कामगार संघटना

नोंदणी क्रमांक - काउआ/ठाणे/१९८०/२०२२ स्थापना : २०२२



संस्थापक अध्यक्ष

**श्री. प्रशांत आर. धोंडे**

संपर्क : ७३५०३१६४८७

कार्यालयीन पत्ता : शॉप नं. ५१८, टेंभी, कोल्हापूर, आगाशी, बाजार पेठ, विरार (प.),ता. वसई, जि. पालघर

संपर्क कार्यालय : महात्मा फुले नगर, चक्रेश्वर अपार्टमेंट समोर, सोपारा रोड, नालासोपारा (प.), ता.वसई, जि. पालघर, Email - prashantdhonde14@gmail.com


CMYK